
साप्ताहिक

# माणूस

१३ एप्रिल ८५ / २ रुपये

## शेतकरी चळवळ

### रयतवारीतली-जमीनदारीतली



साप्ताहिक

**माणूस**

¤

वर्ष : चोविसावे

अंक : सेहेचाळीसावा

¤

१३ एप्रिल १९८५

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

**साठ रुपये**

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर

# सप्रेम नमस्कार, माणूस

¤ 'माणूस' चा ग्रामायन विशेषांक (२३ मार्च ८५) मिळाला. स्वयंसेवी संस्थांच्याद्वारे जे काही जनजागरण होते तेच थोडेफार चिरस्थायी होते. या दृष्टीने ग्रामायनचे कार्य अत्यंत मोलाचे आहे. सांगवी सांडसची गोष्ट वाचून अनेक खेड्यांना आपल्या दुर्दशेतून बाहेर पडण्याची प्रेरणा मिळेल व मार्गही दिसेल.

२७ मार्च १९८५ — **श्रीपाद जोशी**, पुणे

¤ 'गोष्ट सांगवी सांडसची' (माणूस २३।३।८५) वाचला व ग्रामायनचे खास अभिनंदन करावेसे वाटले. म्हटले तर एकादे साधे काम. परंतु ते चालू होण्यास व मूळ पदावर येण्यात कितीएकांचे कष्ट–घाम–अश्रू गाळावयास लावतात याची गणतीच नाही.

ग्रामायनच्या सर्व निष्ठावान कार्यकर्त्यांना धन्यवाद व या सामाजिक परिवर्तनाच्या कार्यास शुभेच्छा.

२७ मार्च ८५ — **शरद जोशी**, डोंबिवली

¤ ग्रामायन विशेषांक मिळाला. 'गोष्ट सांगवी सांडसची' मनापासून आवडली.

ही गोष्ट मी सध्या जिथे रहातो त्याच्या इतक्या जवळ घडावी याचं आधी आश्चर्य वाटलं. पण ती जवळ घडत असूनही माहीत नसावी याची लाजही वाटली.

'श्रीग्रामायन' चे धडे गिरवणाऱ्या आमच्यासारख्या पोरांसाठी ग्रामायन विशेषांक आणि त्यातली गोष्ट हा पुढचा धडा आहे.

'माणूस' अशा आमच्या मनातल्या गोष्टी छापतं म्हणून अभिनंदन.

२८ मार्च ८५ — **राजन खान**, केडगाव

¤ ३० मार्चच्या अंकात 'दलित रंगभूमी'-वरचा श्री. गिरीश प्रभुणे यांचा लेख वाचून फार आनंद झाला. यापूर्वी, दलित चळवळीवरचा, बहुदा त्यांचाच लेख, असाच आवडला होता. काही गैरसमज दूर झाले. श्री. टेक्सास गायकवाड यांची 'आयोग' नाटकावरची धर्मांतराची भूमिका वाचली. ती वाचून कोणाही देशभक्ताला संतोषच होईल. तरी या सर्वांचा ब्राह्मणांवर, ते ब्राह्मण्यवाद म्हणतात ते ब्राह्मण्य कोठले कोण जाणे– एवढा राग, द्वेष इ. का ? हे कळणे कठीण आहे. त्यातही सर्व समाजाला समजून घेऊ शकणारी, घेणारी व वैचारिक जागृती करणारी व त्याप्रमाणे वर्तणूक करणारी जात ब्राह्मणांचीच असावी हे त्यांच्या मित्रपरिवारावरूनही सिद्ध होते. तरीही सर्वांना एकत्र आणणारा व शुद्ध राष्ट्रवादी दृष्टिकोन असणारा पुढारी दलितांमधून न येता तो प्रो. जोगेंद्र कवाड्यांसारखे हाजी मस्तानशी हातमिळवणी करणारे व DS-4 चा नारा लावणारे दलित नेते निपजावेत हे दलितांचे तसेच देशाचे दुर्दैव म्हणायचे. अनेकत्वातून एकात्मतेचा मार्ग दलित नाट्य व साहित्याच्या प्रांतातून निघावा ही इच्छा.


२८ मार्च ८५ — **ग. दि. आपटे**, वालचंदनगर

¤ आपला दि. ३० मार्च १९८५ च्या 'दलित रंगभूमीचं वेगळेपण काय ?' या लेखात माझ्या मुलाखतीत थोडासा गैरसमज करणारी माहिती आहे, जिच्यामुळे माझ्या नागपूर आणि औरंगाबाद येथील सहकारी मित्रांचा फार मोठा गैरसमज होण्याची शक्यता आहे. कृपया ती माहिती दुरुस्त करून 'चुकीची दुरुस्ती' या नावे प्रसिद्ध केल्यास दलित रंगभूमीच्या चळवळीस आपले मोलाचे सहकार्य लाभेल.

वरील अंकात पान नं. १४ कॉलम नं ३ मध्ये ' आमच्या प्रयत्नाने नागपूर, औरंगाबाद इकडे रंगभूमीची चळवळ सुरू झालीय ' असे चूकून छापले गेले आहे. त्या ऐवजी, सोलापूर, कोपरगाव, नगर या गावांचा उल्लेख असावा. औरंगाबाद, नागपूर आणि पुणे इथे जवळ-जवळ एकाच वेळी ही चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीला समृद्ध करण्यासाठी सुरू झाली आहे. औरंगाबाद आणि नागपूर इथे आमच्या प्रयत्नांनी चळवळ सुरू करणे म्हणजे आमच्या तेथील सहकारी मित्रांचा अपमान करण्यासारखे होईल.

२९ मार्च ८५ — **टेक्सास गायकवाड**, दलित रंगभूमी, पुणे

---




### □ धोक्याची घंटा !

विधान सभेचं अधिवेशन दोन–चार दिवस आधी आटपलं म्हणून काऊन्सिल हॉलमधल्या सगळ्या सुरक्षा अधिकाऱ्यांनी सुटकेचा निश्वास टाकलाय असं ऐकतोय.

अधिवेशन आणखी चाललं असतं तर या सुरक्षा अधिकाऱ्यांना याची देही, याचि डोळा काय काय पहावं लागलं असतं कोण जाणे.

आता या मधल्या सुट्टीच्या काळात या सुरक्षा अधिकाऱ्यांनी पुन्हा व्यायामशाळेत जाऊन बॉडी सुधारण्याचा निर्णय घेतलाय असं म्हणतात. कारण दोन आठवड्यापूर्वी सदनात आमदारांनी आपापला जो शक्ती परिचय दिला तो ध्यानात घेता मार्शलमंडळी अगदीच ' किस झाडकी पत्ती ' वाटतात. निदान, या आमदारांना नीट कह्यात ठेवण्यासाठी तरी या मार्शलमंडळींना पुन्हा एकदा व्यायामशाळेत जाऊन कराटे, ज्युडो वगैरेची उजळणी करून घ्यायलाच हवी. नाही तर पोलीस कमिशनर रिबेरो म्हणतातच ना की, अपराधी हा आज पोलिसांपेक्षा जास्त पटीने हुशार आणि वाकबगार झालाय. म्हंजे पोलिस लोक चोर–चिलटांपेक्षा मारामारीत वगैरे जास्त बॅकवर्ड आहेत. म्हणून तर रिबेरोसाहेबांनी पोलिसांना कराटे, कुंग–फू वगैरे जपानी पद्धतीच्या मारामाऱ्या शिकवण्यासाठी खास गुरुजी नेमला होता.

तसंच, आता विधानसभेत हैदोस घालणाऱ्या आमदारांपासून मार्शलमंडळींना काही त्रास होऊ नये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून सभापतींनी लागलीच या सुरक्षा अधिकाऱ्यांसाठी एक विशेष अभ्यास वर्ग काढावा. म्हंजे या सुरक्षा अधिकाऱ्यांना किमानपक्षी स्वतःचा बचाव तरी करता येईल. राजदंड वगैरे वाचवण्याच्या भानगडीत कुणी पडणारच नाही. पहले खुदको बचाओ!

तसंच, सदनात भावना आस्ते आस्ते तापताहेत. असं ध्यानात आलं की,सभापतींनी एक धोक्याची घंटा वाजवावी. कारण ऐन घुमश्चक्रीत खुर्च्या, ध्वनिवर्धक वगैरेची सर्रास फेकाफेक होते. त्यामुळे वरच्या गॅलरीत बसलेल्या पत्रकारांना इजा होण्याचा संभव दिसतो. गोरगरिबांच्या न्याय्य मागण्यासाठी सदनात क्रांतिकारी घटना घडत असताना एखाद दुसरा पत्रकार धारातीर्थी पडला तर तशी काही हरकत नाही. पण उगीच ध्वनिवर्धकाच्या दांड्याने कपाळाला खोक पडणंही बरोबर नाही. तेव्हा जर एखादी धोक्याची घंटा असल्यास त्याचा आम्हाला उपयोग होईल. घंटा वाजली रे वाजली की आम्ही बाकाखाली. हसण्याचं काही कारण नाही. दुसऱ्या महायुद्धात अनेक अतिरथी महारथी पाश्चात्य पत्रकारांनी असंच लपत–छपत, युद्ध अंगावर अक्षरशः झेलत, रिपोर्टिंग केलय.

### □ दादा--पवारांचा ' गेम '

विधानसभेचं हे अधिवेशन लक्षणीय वाटतं ते एकाच कारणासाठी. दोन्ही दिग्गज नेते- वसंतदादा आणि शरद पवार--एकमेकांना धक्का न लावता बाजी खेळताहेत, हे या गेल्या दोन आठवड्यात दोन–तीन वेळा प्रकर्षानं जाणवलं.

याचा अर्थ पवार कांग्रेस (आय) मध्ये जाणार असं नव्हे. दोघेही भिडू एकमेकांचं बलाबल जोखून–पडताळून पाहताहेत असा आम्ही याचा अर्थ लावतो. अधिवेशनाच्या सुरुवातीला कॉन्फ्रंटेशनचं वातावरण आहे, असं खुद्द दादा आणि नंतर पवारांनीही, सूचित-ध्वनित वगैरे केलं. उपसभापतीपदावरून झंझट होईल असा कयास आम्ही लोक बांधत होतो आणि दादांनी लगोलग ते पद विरोधी पक्षाला कन्सीड करून टाकलं.

ज्वारीच्या प्रश्नावरून विरोधी पक्षांनी आणि कॉंग्रेसवाल्यांनी जो दहिकाला दोन दिवस घातला तो काही एका मूलभूत मतभेदाच्या मुद्द्यावर झालेला जाज्वल्य उद्रेक वगैरे नव्हता. इट वॉज अ स्मॉल गेम आणि हा गेम दादा–पवार दोघांच्या पथ्यावर पडेल

शरद पवार सारखा तगडा ऑपोझिशन लीडर माझ्याशी झुंजणार आहे.तो सदनात जर इतका गोंधळ घालू शकतो तर बाहेर काय करेल याचा आपण अंदाज घ्या आणि नीट राज्य करायला मिळावं म्हणून मला पक्षात अधिकाधिक लीवरेज द्या असा गर्भित अल्टिमेटम दादांनी कॉंग्रेसश्रेष्ठींना दिला आहे. त्याचा त्यांना तात्काळ फायदाही मिळालाय. विधानपरिषदेवर राज्यपालांचे नियुक्त सदस्य म्हणून नासिकराव तिरपुड्यांना आणि प्रतिभा पाटलांना धाडण्याचं दिल्लीत घाटत होतं. त्याला दादांनी शह दिला आहे.

शरद पवारांनीही यात स्वतःला बळकट करून घेतलंय. एकमेव विरोधी नेता म्हणून त्यांनी या दोन आठवड्यात आपली छाप जबरदस्त ठोकली आहे. शेवटच्या दिवसापर्यंत उपसभापतीसाठी विरोधी पुलोदगटाचा उमेदवार म्हणून पी. के. अण्णा पाटलांचं नाव असताना ऐनक्षणी हातचलाखीनं कमलकिशोर कदम यांचं नाव पुढे कसं आलं याचं आश्चर्य, ज्यांना पवारांची मोडस ऑपरेंन्डी ठाऊक आहे त्यांना तरी वाटणार नाही.

येते महिने, दोन महिने तरी हा बलाबल अजमावण्याचा खेळ होत राहील. ज्वारीच्या किंवा एकूणच शेतमालाच्या प्रश्नावरून पवार महाराष्ट्र पेटवतात का ते पाहायचं. तसं झालं तर पवार इज टेकिंग हिज जॉब सिरीयसली असं म्हणावं लागेल. नाहीतर पुढच्या अधिवेशनात पवार दादांच्या गळ्यात गळा टाकून 'यह दोस्ती हम नही तोडेंगे' गात बसतील. हो, महाराष्ट्र राज्याला या वर्षी जशी पंचवीस वर्षे पूर्ण होताहेत त्याचप्रमाणे 'शोले' या चित्रपटाला एक दशक पूर्ण होतेय.

### □ थ्री चियर्स !

दि. वि. गोखले 'महाराष्ट्र टाइम्स'मधून गेल्या आठवड्यात निवृत्त झाले हे केवळ निमित्त झालं. दि. विंवर पाच मिनिटे अगत्याने बोलायला केव्हाही आवडेल असा हा माणूस आहे.

खरं तर दि. विंच्या हाताखाली काम करण्याचा योग कधीच आला नाही. तेव्हा 'दुरून डोंगर साजरे' असं खुद्द दि. विंच म्हणून पुढचा मजकूर अर्धवट वाचून सोडून देतील.

पण खरं सांगतो. 'म. टा.'मध्ये अनेकदा जाणं–येणं होत असतं. खूपदा तर काहीही कारणाशिवाय. फक्त धर्तिंग करायला; पण आम्हा उनाडटप्पूंच्या घोळक्यात कुणीही दि. विंची थट्टा–कुचेष्टा केलेली निदान मला तरी आठवत नाही.

एरवी कुणाचंही रेप्यूटेशन आम्ही इन्टॅक्ट ठेवत नाही. सिनिसिझमच्या बुरख्याखाली प्रत्येकाच्या चिंध्या उडवायच्या. त्याला अपवाद गोखले आणि दिनू रणदिवे. ही या दोघांचीही फार मोठी कमाई आहे.

दि. वि. संघाच्या विचारसरणीत वाढलेले पण कुठेही तत्त्वाची झापडं लावून वागले नाहीत. आपल्यापेक्षा सर्वस्वी भिन्न अशा अगदी दुसऱ्या टोकाच्या विचारसरणीत वाढलेल्यांचं भान ठेवणे, त्यांनी केलेल्या उमेदीच्या कार्याची अगत्याने नोंद घेणे यासाठी मनाचा मोठेपणा लागतो. पत्रकार दिवसेंदिवस आपल्या कोतेपणाचीच खूण देत असतात. त्याला रिफ्रेशिंग अपवाद तो दि. विंचा.

दि. विंनी कप्तानपदाची वल्कले काढून ठेवली आहेत. याचा अर्थ ते आता सेवानिवृत्त झाले आहेत; पण दि. विंच्या मनात दडून बसलेला हिरव्यागार मनाचा सैनिक त्यांना स्वस्थ बसू देणार नाही याची आम्हाला खात्री आहे. तेव्हा दि. विंना तीन दणदणीत चियर्स देऊन आम्ही पुढच्या व्यूहरचनेची उत्सुकतेने वाट पाहात बसतो.

### □ खायचं तरी काय ?

मुंबईत सध्या जाम उकडतंय. नीट श्वासही घेता येत नाही. श्वास घ्यायला गेलो तर नाकाचं चेंबूर होऊन जाईल म्हणून चोरून–मारून श्वास घ्यायचा. पाणी प्यायचीही भीती. कुठे क्रूड तेल-बिल असलं तर काय घ्या ?

लहानपणी भावनगरी शेव-गाठ्या म्हणजे आमचा कोण जीव की प्राण. आता या शेवेवरही संक्रांत आली आहे. या शेवेत येलो मेटॅनिल नावाचा रंग मिसळण्यात येतो त्यामुळे जीवाला धोका आहे असं परवा सदानंद वर्दे म्हणत होते. मग आता खायचं तरी काय ?

गिरगावातल्या वेलणकरांकडे जाऊन मस्त कोल्हापुरी संगीत चिवडा अन् काजूची उसळ इतके दिवस हाणत होतो. पण आता त्या हॉटेलची सगळी रयाच गेली हो. त्या जुन्या इराण्यांच्या हॉटेलात असतात तशा गोल, शिसवी पॉलिशच्या खुर्च्या अन् फरशीच्या दगडाची अंडाकार टेबलं गेली. वेलणकरांनी शेट्टीच्या हॉटेलात असतात तशी सनमायकाची बाकं टाकलीयेत. काजूच्या उसळीत अधूनमधून शेंगदाणे असतात असं कुणी म्हणून जखमेवर अधिक मीठ चोळू नये म्हणून आम्ही सांप्रत वेलणकरांचा नाद सोडलाय.

लॅमिंग्टन रोडवरचा पंजाबी हलवाईही आता समोश्यात सुकं खोबरं भरतो. पूर्वी छोले-भटूरे कुलाब्याला किती सुरेख मिळत. तेही दीड रुपयात. आता अगदी भाव तिप्पट घेऊनसुद्धा मालात फसवतात, लेकाचे. सगळीकडे कावळेच कसे जमतात.

हे सगळं आम्ही आमच्या जिवलग 'राजमहाल' हॉटेलात बसून खरडतो आहोत. काय सुरेख कॉफी करतात. सध्या तरी आमचं इथं बरं चाललंय. पण हे आपलं तुमच्या-आमच्यात. सुरेश शेट्टीला कळता कामा नये. नाहीतर कॉफीचे दोन रुपये झालेच म्हणून समजा.

—विष्णू जयदेव


ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

**डॉ. आयडा स्कडर**

सौ. वीणा गवाणकर

बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

**एक होता कार्व्हर**

सौ. वीणा गवाणकर

तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

# राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा

मेजर मु. दि. आपटे (निवृत्त)

प्रज्ञावंत विद्यार्थी भारतात कोठेही शिकत असला तरी त्याचा शोध घेऊन राष्ट्रीय शिष्यवृत्ती देण्यासाठी नव्या पद्धतीतील पहिली परीक्षा रविवार दिनाक १२ मे १९८५ रोजी होत आहे. १९६४ मध्ये जेव्हा ही परीक्षा प्रथम सुरू केली गेली किंवा १९७७ मध्ये काही बदल केला गेला, यापेक्षा नवीन परीक्षेत जवळजवळ मूलभूत स्वरुपाचे बदल केले असल्यामुळे यावर विचार प्रकट होणे आवश्यक आहे. १९६४ मध्ये फक्त शास्त्र व तंत्र याच विषयात प्रज्ञा शोध घेतला जाई १९७७ पासून हे बंधनही दूर केले गेले व कला विषयातही प्रज्ञेचा राष्ट्राला फायदा होतो याची जाणीव राजमान्य झाली. या दोन्ही प्रकारात केंद्र सरकारच अभ्यासक्रम ठरवून परीक्षा घेणे, निर्णय लावणे, यशस्वी विद्यार्थ्यांना मुलाखतीस बोलावणे आदी योजना राबवीत होते. शिक्षण हे क्षेत्र राज्यसरकार व केंद्रसरकार या दोघाच्याही जबाबदारीचे असल्यामुळे राज्यसरकाराच्यावर याची काहीच जबाबदारी मागील वर्षापर्यंत नव्हती.

१९६४ नतर दरवर्षी या परीक्षेस बसणाऱ्यांची सख्या हळुहळू वाढत गेली राष्ट्रीय शैक्षणिक सशोधन आणि प्रशिक्षण परिषद NCERT या केंद्र सरकारने १९६१ मध्ये उभारलेल्या स्वायत्त संस्थेतर्फे ही योजना राबवली जाऊ लागली. त्याच्याकडून आवेदनपत्र मागविणे, शाळातर्फे ती योग्य ठिकाणी व वेळेवर पूर्ण करून दाखल करणे व योग्य वेळी व जागीया परीक्षेला बसणे या प्रकारातही एकूण ४०० शिष्यवृत्त्यासाठी एक लाखाचे वर विद्यार्थी आपली प्रज्ञा पणाला लावण्याचा प्रयत्न करू लागले त्यामुळे परिषदेवर प्रशासन बोजा फारच वाढू लागला. १९८० जूनपासून मिळणारी शिष्यवृत्ती जाहीरच मुळी १९८० डिसेंबरमध्ये होऊ लागल्यामुळे, या प्रकाराला एक प्रकारचे नैमित्तीक स्वरुप येऊ लागलेसे वाटले. शिवाय तौलनिक दृष्ट्या जास्त शिष्यवृत्ती दिल्ली या केंद्रशासित प्रदेशातील विद्यार्थीच पटकावताना दिसू लागल्यामुळे हळूहळू राज्यसरकाराची अस्मिता जागृत होऊ लागली, व या शिष्यवृत्ती प्रकारात आपलाही हातभार असावा अशी जाणीव दाखवली गेली. त्यातच या शिष्यवृत्त्या देताना आर्थिक मागासवर्गांना प्रोत्साहन मिळत नसल्याची सामाजिक तक्रारही करण्यास राज्यांना जागा सापडली व मग त्यातून १९८५ पासून सुरू झालेले नवे धोरण निर्माण झाले.

आता राज्याराज्यात १० वीत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या राज्यस्तरावरील NTS च्या धर्तीवरच घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षेस बसावे लागते. यासाठी जुलै, ऑगस्टमध्येच आवेदनपत्रे मागवून पूर्णपणे भरून ती राज्यशासनाच्या (जिल्हा शिक्षणमंडळामार्फत) शिक्षण सचालनालयाकडे पाठवावी लागतात नोव्हेंबरमध्ये घेतलेल्या परीक्षाचे निकाल साधारणपणे जानेवारीत लागतात व त्यात स्पर्धेप्रमाणे प्रथम ३५० क्रमाकात आलेल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेस बसण्यास पात्रता मिळते. सर्व भारतभर यामुळे आता एकूण १०००० पेक्षाही कमी विद्यार्थी या परीक्षेला बसतील व NCERT ला निर्णय लवकर व ठरावीक वेळेत लावणे शक्य होईल. त्यातही ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न पुरेसे आहे त्या यशस्वी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम अधीच मिळणार आहे. त्यामुळे केंद्रसरकारचा खर्चही थोडा वाचण्याची शक्यता आहे शिवाय आता फक्त दहावीचेच विद्यार्थी असणार त्यामुळे एकूण शिष्यवृत्तीच्या रकमेपैकी बारावीवाल्यांच्या शिष्यवृत्तीपैकी काही रक्कमही वाचू शकते यामुळे केंद्रसरकारनेही राज्यसरकारांच्या सहभागाला विरोध दर्शवलेला नाही.

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून या नव्या धोरणाचे पृथ:करण केल्यास पुढील गोष्टी ध्यानात येतात.

१. राज्यसरकारच्या S.S.C. चे वेगवेगळ्या विषयाचे अभ्यासक्रम तेथे पोचण्यासाठी वेगवेगळ्या स्तरावरील अभ्यासक्रम हे केंद्रसरकारने NCERT मार्फत ठरवलेल्या अभ्यासक्रमाच्या मानाने निकृष्ट दर्जाचे आहेत. शिक्षणाचा प्रसार व्हावा, S. S. C. राज्याच्या अगदी अंतर्गत भागात रहाणाऱ्यासही होता यावे, तसेच आणखी सामाजिक आणि राजकीय कारणे या परिस्थितीला आहेत, पण अभ्यासक्रम NTS च्या स्तराचा नाही हे सर्वमान्य आहे. राज्यस्तरीय स्पर्धापरीक्षेत उच्चश्रेणीने उत्तीर्ण होणाऱ्या S.S.C. विद्यार्थ्यासही त्यामुळे NTS परीक्षा जड जाणार यात शका नाही. या पूर्व परीक्षेमुळे राज्यातील NTS मिळवणारे विद्यार्थी वाढावेत ही इच्छा व अपेक्षा पूर्ण होणे कठीणच आहे. जे NTS मिळवतील ते बव्हंशी CBSC अभ्यासक्रम पूर्ण करीत असणारेच रहातील ही शक्यता नाकारता येणार नाही.

(२) या पूर्वपरीक्षेला काही कारणानी बसू न शकलेले पण प्रज्ञावान विद्यार्थी या प्रज्ञापरीक्षेस व पर्यायाने शिष्यवृत्तीस उगीचच आचवतील व राज्य आणि केंद्रसरकार ही प्रज्ञा ओळखू शकणार नाहीत.

३) NTS चा अभ्यासक्रम जास्त असल्यामुळे राज्यस्तरावरील परीक्षा उत्तीर्ण होऊनही एप्रिल महिन्याच्या काळात त्या विद्यार्थ्यास S. S. C. पेक्षावरील अभ्यासक्रम खाजगीरित्या पूर्ण करून NTS परीक्षेस बसावे लागल. त्यायोगे S S C. सारख्या महत्वाच्या परीक्षेनतरही या हुशार विद्यार्थ्यास अभ्यासापासून विश्राती मिळू शकणार नाही. बुद्धीवरचा सतत ताण प्रज्ञावानालाही थोडाफार त्रासाचा होणारच.

४) राज्यसरकाराच्या आग्रहामुळे यापुढे कितीही प्रज्ञावान विद्यार्थी आढळला तर त्याची शिष्यवृत्ती त्याच्या पालकाच्या उत्पन्नाशी जोडली जाईल व उत्पन्न जास्त असेल तर शिष्यवृत्तीची रक्कम कमी होईल. वास्तविक या धोरणाच्या हेतूशी पालकाच्या उत्पन्नाचे नाते असण्याचा काहीएक संबंध नाही, पण राजकीय धोरणाचा सार्वत्रिक संचार झाल्यामुळे असे विद्यार्थी या मदतीचा

पूर्ण लाभ घेऊ शकणार नाहीत.

५) आतापर्यंतच्या NTS च्या परीक्षेसाठी परीक्षामूल्य काहीएक नव्हते पण आता राज्यसरकार चालवीत असलेल्या पूर्वपरीक्षेसाठी प्रत्येक विद्यार्थ्यास २० रु. परीक्षामूल्य भरावे लागते व ते आवेदनपत्रही खरेदी करावे लागते. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा उगीचच वाढलेला खर्च आहे.

६) राज्यसरकारला ही पूर्वपरीक्षा घेण्यासाठी प्रशासकीय भार खूपच उचलावा लागतो व गुणानुक्रमे पहिल्या ३५० विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे फेब्रुवारीत केंद्राकडे पाठवावी लागतात हा खटाटोप वास्तविक आपल्या S.S.C. विद्यार्थ्यांनीही NTS मिळवावेत या अपेक्षेने केला जातो. पण वरील सर्व अडचणीमुळे याचा उपयोग त्या प्रमाणात होणे जवळजवळ अशक्यच आहे. उलट प्रज्ञावान विद्यार्थ्यांच्या मार्गात ही पूर्वपरीक्षा व त्यातील गुणवत्ता यादीत नाव येणे, पालकाचे उत्पन्न कमी असणे, हे उगीचच आणलेले अडथळे वाटतात.

७) प्रत्येक विद्यार्थ्यास S. S. C. च्या वेळीच फक्त म्हणजे एकच संधी मिळते. या एकाच संधीसाठीही पूर्वपरीक्षा अत्यावश्यक आहे व १० वीत शिकत असताना या पूर्वपरीक्षेसाठी दहावीचा पूर्ण अभ्यासक्रम तयार करणे आवश्यक आहे. खाजगीरित्या हे करायचे असल्यास खाजगी शिकवणी अत्यावश्यक ठरते. हाही खर्च उगीचच होतो.

नवीन पद्धतीप्रमाणेही NTS ची परीक्षा पुन्हा एकदा आकर्षक व उपयुक्त करता येईल व राज्यसरकारानाही आपल्या राज्यातील प्रज्ञाशोध घेता येईल. त्यासाठी खालील सूचना उपयुक्त ठरतील.

१) जर ही परीक्षा एकदाच घ्यायची तर दहावीच्या वर्षीच न घेता ११ वी च्या वर्षी घ्यावी. विद्यार्थ्यांची अभ्यासाची सवय ११ वीतही त्यामुळे कायम टिकू शकेल व पूर्वपरीक्षेसाठीही दहावीचा पूर्ण अभ्यासक्रम ठेवता येईल. पूर्वपरीक्षेतून विद्यार्थी लवकर मोकळा झाला तर मुख्य NTS परीक्षेसाठी त्याला तयारी करायला पुरेसा वेळ मिळू शकेल.

२) S.S.C. व HSC चा अभ्यासक्रम NCERT ने ठरवलेल्या CBSE च्या X व XII या अभ्यासक्रमाबरोबरच असावा. S. S. C. जर कमी असेल तर राज्यसरकाराच्या पूर्वपरीक्षेत जरी एखादा S. S C. विद्यार्थी पहिला आला तरी त्याला NTS मिळणे कठीण जाईल. दिल्लीतील सान्या शाळा NCERT ने आखून दिलेल्या अभ्यासक्रमानुसार चालतात. त्यांच्या विद्यार्थ्यांना तौलनिकदृष्टया NTS मिळवणे सोपेच रहाणार व महाराष्ट्र राज्यसरकारची अपेक्षा पुरी होणे कठीणच राहील.

३) सर्व शाळाप्रमुख, पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांना या परीक्षेसंबंधी योग्यवेळी व संपूर्णपणे माहिती होणे आवश्यक आहे. सरकारच्या पदरी असलेल्या सर्व प्रचार माध्यमाचा वापर करून राज्यसरकारांनी ही जाणीव संपूर्ण राज्यभर वाढवली तर पुरेसे प्रज्ञावान विद्यार्थी या परीक्षेत आपल्या प्रज्ञेची कसोटी लावू शकतील व पर्यायाने प्रज्ञाशोधात कोणी योग्य विद्यार्थी माहितीअभावी सुटणार नाही.

४) आपण निवडलेल्या ३५० गुणवत्ता यादीतील प्रज्ञावान् विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांना NTS मिळू शकणार नाही त्याना राज्यस्तरावर प्रज्ञा शिष्यवृत्ती राज्यसरकारानी द्यावी नाही तर अशा विद्यार्थ्यांना एका प्रमाणपत्राव्यतिरिक्त (त्याचाही त्यांना उपयोग काहीच होत नाही) आपल्या हुशारीविषयी काहीही दाखवता येण्यासारखे नाही. हीच परिस्थिती राहिली तर S. S. C. च्या विद्यार्थ्यांना काही काळानतर वैफल्य येऊन याही परीक्षेचा परिणाम हवा तो होणार नाही. आपण निवडलेल्या प्रज्ञावान विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन प्रोत्साहन देणे राज्यसरकारांचे कर्तव्य आहे.

५) या प्रज्ञाशोध शिष्यवृत्तीच्या धोरणात पालकाच्या उत्पन्नाची बाब येता कामा नये. त्याचा आणि विद्यार्थ्यांच्या, सरकारने शोधून काढलेल्या प्रज्ञेशी काही एक संबंध नाही व तो आणताही कामा नये. राज्यसरकारानी कमी उत्पन्नाच्या पालकांच्या विद्यार्थ्यांना परीक्षामूल्य माफ करावे वा इतर मार्गाने ह्या सामाजिक प्रश्नाची उकल करावी. पण एकदा प्रज्ञावान विद्यार्थ्यास NTS शिष्यवृत्ती मिळाल्यावर दोन विद्यार्थ्यास मिळणाऱ्या शिष्यवृत्तीत फरक असता कामा नये.

६) S. S. C. व H. S. C. चा अभ्यासक्रम NCERT च्या अभ्यासक्रमाप्रमाणे होईपर्यंत म्हणून मुंबईच्या BTS, पुण्यातील ज्ञानप्रबोधिनी व इतर NTS साठी मार्गदर्शन करणाऱ्या संस्थाना महाराष्ट्र सरकारने प्रोत्साहन देत राहिले तरीही राज्यातील प्रज्ञाशोधात सहभागी होण्याचा अभिमान सरकारला मिळू शकेल.

या पद्धतीने NTS परीक्षा घेतल्यास विद्यार्थ्यांचे व पर्यायाने देशाचे कल्याण होण्याचा संभव जास्त आहे. □


## परसूच्या पशुकथा

**वसंत सबनीस**

**किमत १२ रुपये**

परसू म्हणजेच परशुराम. बुटका, पहेलवानी देहाचा, बारीक डोळ्याचा आणि पिसाट केसाचा परसू, अचानक शाळा सोडून गेला तो वीस वर्षांनी भेटला. या काळात तो सारं जग भटकला. प्राणिसंग्रहालयातील नोकरी, संस्थानिकांबरोबरच्या शिकारी, मलायात हिंस्र श्वापदांचा व्यापार व शेवटी सर्कसबरोबर केलेली भटकंती असा त्याचा हा प्रवास होता. या प्रवासातील त्यानी सागितलेल्या शिकारीच्या, जंगलातील वास्तव्याच्या व वन्य प्राण्यांच्या अनेक स्वभाववैशिष्ट्यांच्या या कथा...

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.

सांस्कृतिक दिल्ली

# भारतीय कविता ही एकच वस्तू आहे. तसंच आता नाटकाचं झालं आहे– डॉ. दास

मुलाखत : निशिकांत मिरजकर

'तुम्ही माझ्याबरोबर 'मेडिआ' पहायला याल का? मला तुमच्याशेजारी बसून 'मेडिआ' पाह्यचं आहे. म्हणजे मला ते अधिक चांगलं समजेल.' प्रा. डॉ. शिशिरकुमार दास मला म्हणाले, तेव्हा मी अगदी चटकन होकार दिला.

*डॉ. दासच्या सोबतीने नाटक पाहणे, हा* मलाही हवासा वाटणारा अनुभव होता.

विद्यापिठात आमच्या आधुनिक भारतीय भाषा विभागात बंगालीचे प्रोफेसर असलेले डॉ. शिशिरकुमार दास म्हणजे अभिजात रसिकता आणि विदग्ध ज्ञानलालसा यांचा समन्वय असलेले एक प्रसन्न व्यक्तिमत्त्व आहे. केवळ बंगालीच नव्हे, तर सर्व भारतीय भाषामधील साहित्याचा त्यांचा गाढा व्यासंग आहे. तौलनिक साहित्याभास (Comparative Literature) या समीक्षाशाखेचा प्रणेता डॉ. रेने वेलेक याच्याबरोबर काही महिने काम करण्याचा अनुभव त्यांना लाभलेला आहे. तौलनिक साहित्याभ्यासाची समीक्षापद्धती भारतीय साहित्याला लावून वेगवेगळ्या भारतीय भाषांमधील साहित्यांतून भारतीय साहित्याची एक बहुरंगी; परंतु एकजिनसी आकृती कशी शोधता येईल, याचा यशस्वी प्रयत्न करणाऱ्या साहित्य-समीक्षकाची जी काही मोजकी नावे भारतात सर्वत्र आणि भारताबाहेरही माहीत आहेत, त्यापैकी डॉ. शिशिरकुमार दास हे एक प्रमुख नाव आहे. विद्यापीठातील आमच्या विभागाने अभिमान बाळगावा, असे हे व्यक्तिमत्त्व आहे.

'नाटक' हा डॉ. दासच्या आवडीचा खास विषय आहे. त्याची नेमकी रसज्ञ जाण त्याना आहे ते स्वत: बंगालीमधील प्रथितयश नाटककार असून बगाली रंगभूमीशी त्यांचा घनिष्ट सबंध आहे.

दिल्लीतल्या सुप्रसिद्ध प्रगती–मैदानातील 'मंझर थिएटर'मध्ये नुकताच एक नाट्य-महोत्सव पार पडला. हिंदी, मराठी, बंगाली, मणिपुरी आणि कन्नड भाषेतली नाटके या महोत्सवात सादर करण्यात आली. त्यामध्ये झालेल्या 'मेडिआ' या मराठी नाटकाविषयी *डॉ. दास मला विचारीत होते.*

'मंझर थिएटर'ची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रगति–मैदानाच्या प्रवेशाकरिता एक रुपयाचे तिकिट असते. त्याच खिडकीत मंझर थिएटरचे दोन रुपयाचे तिकीट मिळते. बाहेरून हे थिएटर फारसे आकर्षक नाही. आत गेल्यावर लक्षात येते की, नाट्यगृह फार मोठे नाही आणि फार लहानही नाही. अगदी सुटसुटीत आकाराचे आहे. नाट्यगृहात अगदी शेवटी खुर्च्यांच्या चारपाच रांगा फक्त असतात. बाकी नाट्यगृहात खुर्च्या नाहीत. जमिनीवर बसायला लेदरच्या चौरस कुशन्स नेटकेपणाने मांडलेल्या असतात. रंगमचाची उंची फार नसल्यामुळे खाली बसूनसुद्धा फार वर मान करून बघावे लागत नाही. रंगमच व प्रेक्षक याच्यातील दुरावा या रचनेमुळे नष्ट झाल्यासारखा वाटतो.

प्रत्यक्ष 'मेडिआ'च्या प्रयोगाच्या वेळी डॉ. दासची आणि माझी चुकामुक झाली त्यामुळे शेजारी शेजारी बसून नाटक पाहण्याचा आनद आम्हाला दोघानाही अनुभवता आला नाही; पण नाटक संपल्यावर चर्चा करताना असे जाणवले की, नाटकाविषयी दोघाच्याही प्रतिक्रिया अगदी एकसारख्या होत्या. भाषा कळत नसतानाही डॉ. दास नाटकामध्ये किती खोलपर्यंत पोचू शकले होते, ते पाहून मी चकित झालो. तेव्हाच त्याना विचारून टाकले, की महोत्सवातल्या त्यानी पाहिलेल्या नाटकाविषयीच्या त्याच्या प्रतिक्रियांविषयी त्याची 'माणूस'साठी मुलाखत घेण्याची माझी इच्छा आहे. मराठी नाटकाविषयीच नव्हे, तर एकूण सद्य:कालीन नाटकांविषयी एका रसज्ञ जाणकार समीक्षकाला काय वाटते याचा शोध या मुलाखतीच्या निमित्ताने घेता येईल, असे मला वाटले. आपल्या सौजन्यशील वृत्तीमुळे डॉ. दासही मुलाखतीस लगेच तयार झाले.

नाट्यमहोत्सव संपल्यावर विद्यापीठातच डॉ. दासच्या खोलीत आम्ही बसलो होतो.

'कसा काय वाटला एकदर नाट्यमहोत्सव?' मोघम सुरुवात करीत मी विचारले.

'हे पहा, सपूर्ण नाट्यमहोत्सवाविषयी मी काही बोलणे योग्य होणार नाही.' नेटकेपणाने विधाने करण्याच्या सवयीला अनुसरून डॉ. दास म्हणाले, 'कारण मी सगळी नाटके पाहू शकलो नाही. इच्छा तर खूप होती. *पण नाही जमले. कन्नड नाटक मी एकही* पाहिले नाही. दोन बगाली, दोन हिंदी, दोन मणिपुरी आणि एक मराठी अशी एकदर सात नाटके फक्त मी पाहिली.'

'बरं, मग तुम्ही पाहिलेल्या नाटकांविषयीच सागा. विशेषत: मणिपुरी आणि मराठी नाटकाविषयी. कारण त्या भाषा तुम्हाला येत नाहीत.'

'मराठी नाटक 'मेडिआ' याचे कथानक तर मला माहीतच होते. कारण ते नाटक मूळ ग्रीकमध्ये मी अनेक वेळा वाचलेले आहे. माझे ते फार आवडते नाटक आहे. मणिपुरी नाटक 'चक्रव्यूह' हे महाभारतातल्या अभिमन्यूच्या कथेवर आहे. ती कथाही आपल्याला सर्वांना माहीतच असते. पण तरीही ही दोन्ही नाटके पाहिल्यावर मला तीव्रतेने असे जाणवले की, तुम्हाला कथा माहीत असली, आणि अभिनयामुळे गोळाबेरीज अर्थ तुम्हाला कळत असला, तरी भाषा माहीत नसल्यामुळे नाटकाचा आपण ५०% आस्वाद घेऊ शकत नाही. मणिपुरी आणि मराठी नाटके मी आवडीने पाहिली; पण भाषा कळत नसल्यामुळे आपण नाटकाशी संपूर्ण समरस होऊ शकत नाही, याचा सल मनात सतत जागृत होता. नाटक हा मुख्यत: भाषेवर आधारित कलाप्रकार आहे. तो दृश्य आणि श्राव्य असला तरी मुळात वाङ्मय-प्रकार आहे भाषा हा त्याचा प्राण आहे.'

'मेडिआ' तुम्ही मूळ ग्रीकमध्ये वाचलंय. ग्रीकमध्ये त्याचा प्रयोगही तुम्ही पाहिलात

का ?'

' नाही, मी प्रयोग पाहिलेला नाही. वाचलंय मात्र पुन्हा पुन्हा.'

'मग ग्रीकमधल्या 'मेडिआ'च्या वाचनानं तुमच्या मनात जी नाट्यकृती तयार झाली असेल, तिच्याशी तुलना करता तुम्हाला मराठी 'मेडिआ' कसं वाटलं ?'

'तसा मला एकंदर प्रयोग आवडला. पण तुमच्या प्रश्नाचं नेमकं उत्तर द्यायचं, तर माझी किंचितशी निराशाच झाली, असं म्हटलं पाहिजे, मेडिआची भूमिका ही नाटकातली सर्वांत महत्त्वाची भूमिका आहे. तिच्यावरच संपूर्ण नाटक पेललेलं आहे. रोहिणी हट्टंगडीसारखी अभिनयकुशल अभिनेत्री ही भूमिका करीत असल्यानं तिच्याविषयी अपेक्षाही फार मोठी होती. रोहिणीने या भूमिकेत अगदी जोरदार अभिनय केला. भूमिकेत प्राण ओतण्याचा मनापासून प्रयत्न केला. पण 'मेडिआचा रानवटपणा ( barbarism ) ती नाही पकडू शकली. तिच्या मनाची त्रिविध आंदोलनं, तिची व्याकुळ तडफड तिनं फार प्रभावीपणे व्यक्त केली. पण स्वत:च्या पोटच्या निष्पाप पोरांना ठार मारण्याचा निर्णय नवऱ्यावर सूड घेण्यासाठी करताना आणि तो पार पाडताना मेडिआ कशी रानटी जनावरासारखी हिंस्त्र होते, ते तिला साकार करता आलं नाही. तिची भाषा त्या क्षणीदेखील सुसंस्कृतच राहिली. मेडिआच्या भूमिकेतली मौलिक शक्तीचं ( Elemental power ) तिच्या ठिकाणी प्रकट होऊ शकली नाही.'

'या नाटकाच्या आणखी काही मर्यादा जाणवल्या का ?'

'नाटकातला कोरस. त्याचा दर्जा थोडासा कमी वाटला. हा कोरस सदैव मेडिआला उद्देशून बोलतो ते तर खटकलेच, पण त्याचे उच्चारही उच्च दर्जाचे वाटले नाहीत.'

'नाटकाच्या दिग्दर्शनाविषयी ?'

'परकीय पुराणकथेवर आधारित असे हे नाटक असल्याने तसे दिग्दर्शकाला भरपूर स्वातंत्र्य होते. आणि त्याने ते चांगल्या प्रकारे वापरले आहे. साकल्याने पाहता एकंदर प्रयोग मला आवडला असं मी म्हटलं. ते तेवढ्याचसाठी.'

'आता मणिपुरी नाटकाविषयी सांगा.'

'भाषेचा प्रश्न तिथंही तीव्रतेनं जाणवला. मघाशी मी म्हटलं त्याप्रमाणे 'चक्रव्यूह'ची कथा भारतात सर्वांच्या ओळखीची असली, आणि संगीत, नृत्य आणि अभिनय यांच्यामुळे सर्वसाधारणपणे अर्थ समजण्यासारखा असला तरी 'पूर्वरंग' बराचसा माझ्या डोक्यावरून गेला. दुसरे नाटक 'इंफाळ इफाळ' हे तर समकालीन सामाजिक नाटक आहे. किंबहुना ते एक राजकीय उपहासनाट्य आहे. त्यात एक दृश्य आहे की एक म्हातारा आधुनिक पिढीवर टीका करीत असतो. त्यावेळी सर्व नाट्यगृहातले प्रेक्षक हसत होते. मला मात्र त्यात काहीच कळले नाही.'

## नवं तंत्र नाही !

'पण या दोन्ही मणिपुरी नाटकात तुम्हाला विशेष उल्लेखनीय काय वाटले ?'

'त्याच्या अभिनयाच्या काही कल्पना बहारीच्या होत्या. अभिमन्यूने आईच्या गर्भात असताना चक्रव्यूह भेदण्याचे कौशल्य समजून घेतले ही घटना त्यांनी अभिनयाच्याद्वारे फार प्रभावीपणे सादर केली. म्हणजे तो उल्लेख जेव्हा आला, तेव्हा अभिमन्यूचे काम करणारा नट गर्भातल्या बालकाप्रमाणे हातपाय दुमडून वाकून बसला आणि प्रकाशयोजनेच्या साहाय्याने क्षणभर असा भास निर्माण केला गेला की, खरोखरीच तो गर्भातील बालक कृष्ण–सुभद्रेचे संभाषण ऐकतो आहे ते दृश्य अगदी विलक्षण होतं. दुसऱ्या 'इंफाळ-इफाळ' नाटकात एका ऑफिसमधलं दृश्य होतं. तर प्रत्यक्षात काहीही सामानसुमान न वापरता ऑफिसमधल्या खोलीचं हुबेहूब वातावरण केवळ अभिनयाच्या जोरावर त्यांनी परिणामकारकपणे उभं केलं होतं.'

'मेडिआ'च्या मराठी आवृत्तीसंबंधीची तुमची प्रतिक्रिया तुम्ही सांगितलीत. आणखी कोणती भाषांतरित किंवा रूपांतरित नाटकं तुम्ही पाहिली ? ती कशी वाटली ?' कॉकेशिअन चॉक सर्कल'चं हिंदी रूपांतर 'सफेद कुंडली' तुम्ही पाहिलंच असेल.'

'सफेद कुंडली' मध्ये शबाना आझमी काम करणार असल्यानं त्या दिवशी प्रचंड गर्दी होईल असं मला बुकिंग क्लार्कनं आधीच सांगितल्यामुळे त्या दिवशी मी गेलोच नाही. पण मी 'मिडसमर नाईट ड्रीम'चं हिंदी रूपांतर 'बागोंरे बहार है' पाहिलं. ते मला मुळीच आवडलं नाही. त्याचा दर्जा अगदीच कमी प्रतीचा होता मुख्य म्हणजे अनुवादच बरोबर केलेला नव्हता.'

'बंगाली नाटकं तर तुम्ही एरवीही बरीच पाहिली असतील. जी बंगाली नाटकं महोत्सवात होती, त्यांचा दर्जा कसा होता ? ती बंगाली रंगभूमीची प्रातिनिधिक नाटकं होती का ?'

''मारिच संवाद' आणि 'रोशन' ही दोन बंगाली नाटकं महोत्सवात होती. त्यापैकी 'मारिच संवाद' हे १९७० च्या सुमाराचं जुनं लोकप्रिय नाटक आहे. रामायणातला मारिच आणि रावण यांचा संवाद या नाटकात प्रतिकात्मक पद्धतीने अन्योक्तीच्या स्वरूपात सादर केलेला आहे. प्रत्येक युगात निष्पाप माणूस श्रीमंताच्या फायद्यासाठी मारीचासारखा वापरला जातो, असं त्या नाटकात सूचित केलं आहे. जमीनदार आणि शेतकरी, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आणि पत्रकार अशा विविध जोड्या रावण-मारीचाच्या प्रतीकातून राबवलेल्या आहेत. बंगाली प्रेक्षकवर्गात हे नाटक फार लोकप्रिय आहे. पण मला काही ते आवडलं नाही. दुसरं नाटकही कंटाळवाणं होतं. ती एक राजकीय विडंबनकथा आहे. आजकालच्या बंगाली रंगभूमीवरचं राजकीय विडंबन–उपहास हे एक चलनी नाणं आहे पण तरी देखील ही दोन नाटकं बंगाली रंगभूमीची प्रातिनिधिक नाटकं म्हणता येणार नाहीत.'

'अभिनयाच्या किंवा दिग्दर्शनाच्या दृष्टीनं या नाटकात काही नवीन तंत्र वापरलेलं होतं का ?'

'प्रेक्षकामधून पात्राचा प्रवेश हे एक तंत्र म्हणता येईल. पण ते देखील आता नवीन तंत्र उरलेलं नाही. त्यातलं नाविन्य केव्हाच संपलंय आणि त्याबरोबरच त्याची परिणामकारकताही नष्ट झाली आहे. 'मेडिआ' मधली पात्रही प्रेक्षकातून प्रवेश करतात; तेव्हा त्याचा विशेष असा काहीच अर्थप्रभाव पडत नाही, हे तुम्हीही पाहिलंच आहे. या 'मारीच–संवाद' मध्ये तर शेवटी वाल्मिकीला प्रेक्षकातून बोलावण्यात येतं आणि तो अगदी आधुनिक पोषाखातला 'मॉडर्न वाल्मिकी' असतो ते सगळं अगदी निरर्थक आणि हास्यास्पद वाटतं.'

'या नाट्यमहोत्सवाच्या प्रेक्षकवर्गाविषयी तुम्हाला काय वाटलं ?'

'वा ! प्रेक्षकवर्ग फारच उत्साही होता. त्याचा दर्जा फार वरचा होता.'

'हो का ? परक्या भाषेतल्या नाटकांचीसुद्धा समज चांगली वाटली का ?'

'असं पहा, १९५० ते १९६० पर्यंत प्रत्येक भाषेतल्या नाट्यप्रयोगांना स्वतःचं असं काही वेगळेपण असायचं. मराठी रंगभूमी तेव्हा अगदी ताजीतवानी होती. बंगाली रंगभूमीलाही एक स्वयंभूपण होतं. आता १९८५ मध्ये असा काही फरक करणं फार अवघड आहे. आता एक भाषा सोडली तर त्यात तसं वेगळेपण काहीच नसतं. उलट मी तर म्हणेन की विविधतेचा अभावच सर्वत्र तीव्रतेनं जाणवतो. ब्रेख्तचं तंत्र आता सगळेजणच वापरतात. लोककलांची परंपरा सर्वत्रच विकसित झालेली आहे.'

'म्हणजे अमूक भाषेतली रंगभूमी असं न म्हणता आता 'भारतीय रंगभूमी' असं एक सलग चित्र दिसू लागलं आहे, असंच ना ?'

'अगदी बरोबर. याबाबतीत कवितेशी तुलना करता येईल. कुठल्याही भारतीय भाषेतली अनुवादित कविता मी वाचतो, तेव्हा ती बंगाली कवितेहून सर्वस्वी वेगळी आहे, असं मला कधीच जाणवत नाही. भारतीय कविता ही एकच वस्तू आहे. तसंच आता नाटकाचं झालं आहे. 'शांतता ! कोर्ट चालू आहे' मी जेव्हा प्रथम पाहिलं तेव्हा ते मला इतकं विलक्षण वाटलं की मी अक्षरशः भारावून गेलो. मी ते हिंदी, मराठी आणि बंगाली तिन्ही भाषांमध्ये पाहिलं. पण आता त्यातलं तंत्र जवळजवळ सर्वच भाषांमध्ये स्वीकारलं गेलं आहे. आता हिंदी किंवा बंगाली रंगभूमीचं स्वतःचं खास असं वैशिष्ट्य काहीही उरलेलं नाही. अजूनही अनुवादित नाटकांचे प्रयोग मोठ्या प्रमाणावर होण्याची जरूर आहे. पण जे होतात, त्यांचं स्वागत फार उत्साहानं होत आहे. विजय तेंडुलकर, गिरीश कर्नाड, बादल सरकार हे आता 'पॅन-इंडियन' नाटककार झाले आहेत.'

'मला तर वाटलं होतं की मणिपुरी, हिंदी किंवा मराठी नाटकांना त्या त्या भाषेचे प्रेक्षकच गर्दी करत असतील.'

'मुळीच नाही. प्रेक्षकवर्ग संमिश्र स्वरूपाचा होता. तसं पाहिलं तर या महोत्सवाचा प्रेक्षकवर्ग निवडकच असतो. बहुतेकजण रंगभूमीशी कोणत्या ना कोणत्या नात्यानं संबंधित असतात. बंगाली नाटकांना मात्र बंगाली प्रेक्षकवर्ग बहुसंख्येनं आढळला. अन्य भाषिक प्रेक्षकवर्गाच्या उपस्थितीला काही खास आकर्षणंही कारणीभूत असतात. जसं मराठी नाटकांच्या बाबतीत रोहिणी हट्टंगडीचा अभिनय आणि जयदेव हट्टंगडीचं दिग्दर्शन ही प्रमुख आकर्षणं होती. 'आधी रात के बाद' हे हिंदी नाटकही जयदेव हट्टंगडीने सादर केलं होतं. 'सफेद कुंडली'-मध्ये शबाना आझमी होती. साहजिकच या नाटकांना गर्दी होणं स्वाभाविक होतं.'

'मंझर थिएटरविषयी तुम्ही काय म्हणाल ?'

'एक तर ते अगदी स्वस्त, आवाक्यातलं आहे. दुसरं म्हणजे त्याची रचना प्रेक्षक आणि नाटक यांच्यात 'इंटिमसी' निर्माण करणारी आहे. प्रायोगिक रंगभूमीसाठी अशा तऱ्हेचं थिएटर अगदी उचित आहे.'

'शेवटी, एकंदर महोत्सवाविषयी आमच्या वाचकांसाठी तुम्हाला आणखी काही सांगावंसं वाटतं ?'

'अशा तऱ्हेचे महोत्सव वारंवार झाले पाहिजेत. विशेष म्हणजे केवळ मराठी नाटकांचा एक महोत्सव अशा तऱ्हेने झाला पाहिजे की मूळ मराठी नाटकाचा हिंदी अनुवाद प्रथम आणि नंतर लगेच दुसऱ्या दिवशी मूळ मराठी नाटक सादर केले पाहिजे. म्हणजे मूळ मराठी नाटकाचा आस्वाद जाणतेपणाने घेता येईल.' □


अब्राहम लिंकन

फाळणी टाळणारा महापुरुष

• वि. ग. कानिटकर

भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित झालेली पहिली डिलक्स आवृत्ती. मोठा क्राऊन आकार. पृष्ठे: ४००, किं. १५० रु.

राजहंस ऑगस्ट ८४ योजनेत सहभागी व्हा.

सविस्तर योजनापत्रक मागवा.

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

# अब्जावधी गावं पिण्याच्या पाण्यापासून वंचित

## येत्या १०० वर्षात सरकार हा प्रश्न सोडवेल का ?

आज भारतात लक्षावधी कुटुंबांना पिण्याचे पाणी मिळविण्याकरता काही मैल चालावे ल गते तर भारतीय खेडचात सांडपाणी वाहून नेणारी व्यवस्थाच नाही. विसाव्या शतकातली ही 'प्रगती !' एकीकडे कॉम्प्युटर आपले हातपाय पसरतो आहे तर दुसरीकडे अब्जावधी घरं पिण्याच्या पाण्यापासून आणि सांडपाणी वाहून नेण्याच्या व्यवस्थेपासून वंचित आहेत.

विनायक गोखले

पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि सांडपाण्याची व्यवस्था, भारतीयांच्यात नव्हे तर जगातील सर्व राष्ट्रांपुढे असलेली एक समस्या आहे. भारतात या समस्येची तीव्रता फारच जास्त आहे. ज्यांच्या घरात नळ आहे किंवा दारात ड्रेनेज येते त्यांना या समस्येचा अंदाज करता येणे अवघड आहे. आज भारतात लक्षावधी कुटुंबाना पिण्याचे पाणी मिळवण्याकरता काही मैल चालावे लागते, तर भारतीय खेड्यात सांडपाणी वाहून नेणारी व्यवस्था नाही असे म्हणले तरी चालू शकेल. विसाव्या शतकात झालेली प्रगती पाहता किती लांच्छनास्पद आहे हे! एकीकडे कॉम्प्युटर आपले हातपाय पसरत काही घरांच्या ओसरीत आला तर दुसरीकडे अब्जावधी घरे ही पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यापासून व सांडपाणी वाहून नेण्याच्या व्यवस्थेपासून आजही वंचित आहेत. स्वच्छ पाणी पिण्यास मिळणे ही मानवाची मूलभूत गरज आहे; परंतु या गरजेची जाणीव विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत कोणाला झाली नाही हे नवल.

दरवर्षी सुमारे १५ दशलक्ष बालके दूषित पाणी पिण्यामुळे दगावतात. जगातील इस्पितळात अर्ध्याहून अधिक खाटा ह्या दूषित पाणी पिण्यामुळे रोगग्रस्त झालेल्या माणसांनी भरतात. जर भारतीय नागरिकांना शुद्ध पाण्याचा पुरवठा पिण्यासाठी होऊ लागला तर भारतात ८०% रोग रोखले जाऊ शकतील. पाणी आणि त्याचा मानवी जीवनाशी असलेला संबंध हा असा आहे; परंतु या संबंधाची जाणीव १९७६ सालापर्यंत कोणाला झाली नाही. परंतु ७६ साली युनोच्या पुढाकाराने एका परिषदेची स्थापन झाली की, जिचे सदस्य युनोत सहभागी असलेली राष्ट्रं झाली आणि त्या परिषदेने आपले उद्दिष्ट ठरवले की '१९९० मध्ये सर्वांना स्वच्छ पाणी.' भारत या परिषदेचा सदस्य आहे. आपला देश या समस्येला तोंड कसे देत आहे हे पाहणे आवश्यक ठरेल.

पहिल्या पंचवार्षिक योजनेत या समस्येकरता ४९ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. आता त्यात वाढ होऊन सहाव्या योजनेत ३९०४ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ७६ साली स्थापन झालेल्या परिषदेने १९८१ ते १९९० हे पिण्याचे पाणी आणि स्वच्छता यांचे दशक घोषीत केले आहे. परंतु या परिषदेच्या अपेक्षेपेक्षा भारत फारच कमी म्हणजे पावपट रक्कमच खर्च करत आहे. भारतातल्या समस्येचा विचार करता फार मोठे आव्हान आपल्यासमोर आहे असे आढळते. असे दिसून आले आहे की परिषदेचे दशक सुरू होण्याअगोदर भारतातील ७१% शहरी भागालाच पाणी पुरवठा होत होता तर ग्रामीण भागातील टक्केवारी होती ३१%. तर सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था ग्रामीण भागात ०.५%, म्हणजे जवळ जवळ अस्तित्वातच नव्हती. म्हणजे ग्रामीण भागातील सांडपाण्याचा प्रश्न सोडवण्यास ( ग्रामीण भागातील लोकसंख्या ८१ च्या जनगणनेनुसार ५.२२ दशलक्ष आहे.) भारत सरकार १९८० पर्यंत पूर्णपणे असमर्थ ठरले आहे. युनोच्या संबंधित शाखेने पाहणी करता असे दिसले की २७ टक्के शहरी भागात सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था आहे तर ४०%भागात अजून 'टोपलीची' पद्धतच अस्तित्वात आहे. तर उरलेल्या ३३% भागात कोणतीच व्यवस्था नाही. वरील आकडेवारी वाचून समस्येची जाणीव होत नाही पण जेव्हा शहरातील ४० टक्के लोकांचा मैला कोणीतरी डोक्यावर उचलून नेऊन दुसरीकडे टाकतो, तिथे माणुसकीला तर काळीमा लागतोच पण त्याचबरोबर स्वच्छतेला. आणि ह्या माणसांच्या आरोग्याविषयी बोलणेच मूर्खपणाचे ठरेल—जे 'रोगराईच' डोक्यावरून वाहत असतात.

सरकारने जरी या प्रश्नावर आपले लक्ष पूर्णपणे केंद्रित केले तरी हा प्रश्न सुटण्यास



१०० वर्षे लागतील आणि त्यासाठी साड-पाणी वाहून जाण्याची व्यवस्था असलेले १ लाख सडास दरवर्षी बांधावे लागतील. शहरात सध्या १२.७८ दश लक्ष 'dry-latrines' अस्तित्वात आहेत. त्यांच्यात सुधारणा करण्याचा सध्याचा वेग आहे वर्षाला २५ हजार आणि त्या शिवाय १०.५४ दशलक्ष कुटुंब अशी आहेत की ज्यांच्याकडे कोणतीच व्यवस्था नाही. शहरातील समस्या ही एकूण देशातील समस्येच्या केवळ २०% आहे. यावरून देशातील प्रश्नाची कल्पना येऊ शकेल.

लांबून आणावे लागणारे पाणी, दूषित पाणी, साडपाण्याची न लावून दिलेली व्यवस्था यामुळे निर्माण होणारे प्रश्न फक्त भारतालाच भेडसावतात अशातला भाग नाही. जगातील अनेक राष्ट्रे की ज्यात समृद्ध राष्ट्रसुद्धा गणली जातात, त्यांच्या पुढे ही समस्या उभी आहे विकसनशील राष्ट्रांना ज्या प्रमाणात हा प्रश्न भेडसावतो त्यामानाने विकसित राष्ट्रांच्या बाबतीत या प्रश्नाची तीव्रता कमी आढळते. विकसनशील राष्ट्रांतील अर्ध्याहून अधिक लोकांना पिण्यास सुरक्षित पाणी उपलब्ध नाही. सर्व विकसनशील देशात साडपाणी—स्वच्छता, शहरात ३०% ठिकाणी, तर खेड्यात जवळ जवळ अस्तित्वातच नाही आणि अर्थातच या गोष्टींच्या अभावामुळे जगात आज ५०० दशलक्ष माणसे trachoma (ज्यामुळे अंधत्व येते) २५० दशलक्ष माणसे elephantisis, २०० दशलक्ष माणसे bilharzia तर १७० दशलक्ष माणसे मलेरियानी आजारी आहेत. या रोगाची मूळे कारणे ही वर म्हणल्या-प्रमाणेच दूषित पाणी व अस्वच्छता आहेत. विकसनशील राष्ट्रातील ही अवस्था अतिशय करुणाजनक आहे. कल्पना करा की ५०० दशलक्ष म्हणजे पश्चिम युरोप डोळ्यासमोर आणा इतके लोक थोडे अंधत्व आलेले आहेत तर अमेरिकेच्या लोकसंख्येइतके लोक bilharzia ने म्हणजेच मुत्रावाटे रक्त जाणाऱ्यातले आहेत. तर पायाना हत्तीरोग झालेल्यांची संख्या रशियाच्या लोकसंख्येएवढी आहे. वरील उदाहरणामुळे विकसनशील राष्ट्रांतील आरोग्याची स्थिती किती भयानक आहे याची कल्पना येईल.

## 'अशक्य' नाही

युनीसेफची आकडेवारीच जर बघायची झाली तर विकसनशील राष्ट्रांतील १००० दशलक्ष बालके शुद्ध पाण्याच्या पुरवठ्यापासून वंचित आहेत. Brondt समितीच्या अहवालानुसार दरवर्षी २० ते २५ दशलक्ष बालकं (पाचवर्षाच्या आत वय असलेली) दगावतात. या दगावणाऱ्या दर तीन बालकापैकी एक बालक diarrhoea या रोगामुळे दगावते आणि या रोगाचे कारण आहे दुषित पाणी. युनीसेफ ही संस्था या बाबतीत एक महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. या दशकातील कार्यक्रमाकरता त्यानी आपला निधी वाढवत मूळ पातळीच्या पाचपट म्हणजे ५३ दशलक्ष डॉलर्स केला आहे. १९७९ साली जमा केलेला ५३ दशलक्ष डॉलर्सचा निधी हा खेड्यातील पाणी पुरवठ्याकरता प्रामुख्यानी वापरला जाणार आहे. जागतिक पातळीवर हा प्रश्न सोडवायला ही रक्कम फारच अत्यल्प आहे. १९९० पर्यंत जर सर्व मानवाला या सुविधा पुरवायच्या असतील तर रोज ५ लाख लोकाना या सुविधा पुरवल्या जाणे आवश्यक आहे आणि हे एक अशक्य आव्हान आहे. १९९० पर्यंत जर सुविधा द्यायच्या झाल्या तर त्याला येणारा खर्च जागतिक बँकेने काढला आहे. त्यांच्यामते हा खर्च ६०० बिलियन (१ बिलियन =१००० दशलक्ष) डॉलर्सच्या घरात जाईल. म्हणजेच दर वर्षी सुमारे ६० बिलियन डॉलर्स येईल. या पार्श्वभूमीवर जागतिक पातळीवर होत असलेला पाणीपुरवठा आणि स्वच्छतेवरचा खर्च अगदी कमी म्हणजे ६ ते ७ बिलियन डॉलर्स म्हणजे उद्दिष्टाच्या एक दशांश आहे.

जगातील एकूण उत्पन्न आणि खर्च पाहता हा खर्च करता येणे 'अशक्य' आहे अशातला भाग नाही; परंतु या बाबीचे महत्त्व अजून अनेकांना पटलेले दिसत नाही. कारण दरवर्षी शस्त्रास्त्रे आणि संहारक अस्त्रे यांच्यावर ८०० बिलियन डॉलर्स वर्षाला किंवा १४०० दशलक्ष डॉलर्स दिवसाला खर्च केले जातात. शस्त्रास्त्रांवर होण्याऱ्या खर्चातला एक महिन्याचा खर्च जरी पाणीपुरवठा आणि स्वच्छता याकडे वळवला तरी या दशकातील कार्यक्रमाची आर्थिक गरज सहज भागेल; परंतु असे होत नाहीये आणि त्याचेच आश्चर्य वाटते आहे. एकीकडे अर्धे जग पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यापासून वंचित असून रोगराईनी पिछाडले आहे व असे असताना संहारक व पृथ्वीचा नाश करू शकणारी शस्त्रास्त्रे रोजच्या रोज भरीस पडत आहेत. कदाचित स्वसंरक्षणासाठी म्हणून जरी हा खर्च आवश्यक मानला तरी सुद्धा अनावश्यक खर्चाची यादी मोठी आहे. जगात रोज २५० दशलक्ष डॉलर्सचा धूर सिगरेटच्या रुपाने होतो. जिचे सेवन हे आरोग्यास हानीकारक आहे.

१९८५ साल हे या दशकाचा मध्य आहे आणि कामाचा वेग आणि आर्थिक गरज लक्षात घेता हा प्रश्न १९९० सालापर्यंत सुटण्याची शक्यता दिसत नाही. लोकसंख्या वाढीची समस्या हा प्रश्न अजूनच उग्र बनवत आहे. सध्या १९८५ मध्ये १९७५ च्या मानाने कितीतरी अधिक लोकांना दूषित

पाणी प्यावे लागत आहे तर १९७५ पेक्षा ४०० दशलक्ष लोकांचा साडपाणी वाहून नेण्याच्या व्यवस्थेबाबत अजून विचार सुद्धा होऊ शकत नाहीये. तिसऱ्या जगात लोकसंख्येच्या प्रश्नावर अजूनही तोडगा निघत नाहीये. त्यामुळे १९९० पर्यंत स्वच्छतेपासून व पिण्याच्या पाण्यापासून वंचित होणाऱ्यांची संख्या ही १९८५ च्या पेक्षा कितीतरी अधिक असणारे. भारत तिसऱ्या जगात वावरणारा देश आहे व ह्या समस्येची तीव्रता इथे सुद्धा याच प्रमाणात वाढणार आहे.

जागतिक परिषदेच्या अदाजानुसार भारताला ही योजना यशस्वी करण्यासाठी १४,७०० कोटी रुपयांची तरतूद करणे आवश्यक आहे. सहाव्या पचवार्षिक योजनेत ४१७७.५१ कोटी रुपयाची तरतूद नियोजन मडळाने या समस्येकरता केली आहे. सातव्या पचवार्षिक योजनेत ह्या रकमेच्या दुप्पट रकमेची तरतूद केली जाण्याची शक्यता आहे. नियोजन मडळाच्या अपेक्षेनुसार पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याच्या प्रश्नावर आठव्या पचवार्षिक योजनेच्या सुरुवातीला पडदा पडण्याची शक्यता आहे. सातव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस ९५% जनतेला पाणीपुरवठा केला जाण्याचे उद्दिष्ट आहे तर उरलेल्याना आठव्या पंचवार्षिक योजनेतील पहिल्या वर्षात पिण्याच्या पाण्यासंबधी पाचव्या पचवार्षिक योजनेत अग्रक्रम होता आणि हा अग्रक्रम सहाव्या पंचवार्षिक योजनेत सुद्धा तसाच राहिला. सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस २३०,००० खेड्यांना पाणी पुरवठ्याची योजना होती. १९८५ मध्ये सपणाऱ्या सहाव्या पचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांच्या टप्प्यात १३१,९६४ खेड्यांना पाणी पुरवले जाण्याची योजना अंमलात आणली गेली आहे

पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि स्वच्छता या दोन्ही गोष्टी प्रत्येकाला मिळण्यासाठी आणि मिळाल्यावर त्याचा योग्यरीतीनी वापर करण्यासाठी शिक्षणाची नितांत गरज आहे. भरपूर पैसे किंवा सरकारी प्रयत्न यानी या योजना अमलात येतील; पण राबवता येणार नाहीत. लोकशिक्षण हे नुसते स्वच्छतेबाबतच नव्हे तर इतर अनेक बाबीवर प्रकाश टाकणारे असण्याची आवश्यकता आहे. कारण हा प्रश्न सोडवण्यासाठी अनेक बाबींची पूर्ती होणे अपरिहार्य आहे. ही समस्या फक्त आर्थिक पायावर नसून सामाजिक, राजकीय व तांत्रिक पायावर आहे व त्यासाठी संपूर्ण समाजाने एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.

UNDP ( युनायटेड नेशनस् डेव्हलप्मेंट प्रोग्रॅम ) याच्या सौजन्यानी सुरू झालेल्या जागतिक परिषदेची की जिचे उद्दीष्ठ 'पिण्याचे पाणी व स्वच्छता' १९९० पर्यंत सर्वांना उपलब्ध करून देणे आहे. आणि भारत या समस्येचा मोठा घटक आहे. पिण्याच्या पाण्याच्या शुद्धते अभावी होणाऱ्या रोगामुळे भारतीयांचे दरवर्षी ७३ दशलक्ष कामाचे दिवस वाया जातात. हे वाया जाणारे दिवस तांत्रिक बिघाडामुळे किंवा इतर कारणामुळे वाया जाणाऱ्या दिवसापेक्षा किती तरी अधिक आहेत. अशा लोकाना द्यावी लागणारी वैद्यकीय मदत आणि अनुत्पादन यामुळे दरवर्षी सुमारे ४५०० दशलक्ष रुपयाचे उत्पन्न घटते. भारतासारख्या विकसनशील आणि गरीब राष्ट्राला हे परवडण्या सारखे आहे का ?

आरोग्याचा आणि गरीबीचा फार जवळचा सबध आहे. निरोगी माणूस हा कामाच्या बाबतीत कधीच कमी पडत नाही तर रोगी माणूस हा काम करताना बराच मागे पडतो. व त्यामुळेच बिघलेले आरोग्यच माणसाला हळूहळू उपासमारीकडे नेते. त्यामुळे मानवी आरोग्य राबवण्यासाठी वरील समस्या सोडवण्याची व सोडवून घेण्याची जबाबदारी सरकारवर व जनतेवर येते. व ती पेलण्याची ताकद त्यांनी आज दाखवली नाही तर उद्या वेळ टळलेली असेल.

जेव्हा भारतातील लाखो लोक विविध रोगांनी पछाडलेले आहेत तेव्हा त्याच्याकडून आपल्या देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाच्या बाबतीत हातभाराची अपेक्षा करायचीच कशी म्हणूनच मानवी आरोग्य टिकवण्याच्या दृष्टीनी करावी लागणारी ही गुंतवणूक म्हणजे केवळ नैतिक जबाबदारी आहे असे नव्हे, तर अर्थशास्त्राच्या दृष्टीने सुद्धा फायदेशीर गुतवणूक आहे.

□

---


'सौम्य प्रकृतीची, सभा मोर्चे याचा पिंड नसलेली ही बाई सावधगिरीनेच प्रवास करते. स्त्रिांवर किती अन्याय होतोय म्हणून छाती बडवून घेत नाही किंवा अत्याचाराच्या लाल भडक जखमा उघड्या करून मध्यमवर्गीय अलिप्तपणाला आव्हान देत नाही. हिच्या लेखनाची जातकुळी वेगळीच आहे. ती स्वतः सुशिक्षित मध्यमवर्गीय बाई आहे. आणि त्या वर्गाशी मर्यादित अनुभव विश्वाबाबतच ती चिंतन करतीय. रोजच्या आयुष्यातील एकेक पदर हलकेच उघडून ती नेमक्या मर्मस्थळी बोट ठेवतीय. दुखवण्याच्या अविर्भावाने नव्हे तर जागे करून अस्मिता फुलविण्याच्या ताकदीने. उमेद हरवून बसलेल्या मध्यमवर्गीय बाईशी संवाद साधायचा मंगलाबाईंचा प्रयत्न आहे आणि त्यांना ती व्हेन गवसली आहे. तारा निश्चित जुळाल्या आहेत.'

—छाया दातार

रविवार सकाळ—१७ मार्च ८५

# कुंपण आणि आकाश

मंगला गोडबोले

किंमत २० रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.

# एकावर एक अकरा !

फिरोझ रानडे

'तुम्ही काही म्हणा, पण आजकाल चांगल्या विनोदी वाङमयाची म्हणावी तशी निर्मिती होत नाही हेच खरे !'

एवढे जडबंबाळ वाक्यच्या वाक्य स्वातंत्र्य-सैनिक बर्वे गुरुजींशिवाय कोण बोलणार होते ? आणि ते खरेच होते. आजच्या दोन कामत, एक बर्वे, दोन कर्वे, राधा व श्यामच्या मैफलीत बर्वे हातातले कुठले तरी मासिक रागाने, दाणकन पद्धतीने टेबलावर टाकत वरचे जडबंबाळ वाक्य बोलले होते.

आज मराठीतल्या विनोदी वाङमया-सारख्या निरूपद्रवी विषयावर चर्चा होणे अगदी स्वाभाविकच होते. थोरल्या आणि धाकल्या म्हणजे दिल्लीच्या व मुंबईच्या निवडणुका होऊन गेल्या होत्या. एवढेच नव्हे तर त्याच धर्तीचे होळी व धुलवड हे सणसुद्धा होऊन गेले होते. त्यांचा रंग उतरला होता व धूळ खाली बसून गेली होती.

गल्लीच्या म्हणजे मुंबई महानगरपालि-केच्या निवडणुकीना अजुनी अवकाश होता. आता कुठे त्याचे अर्ज देणे, याद्या बनवणे वगैरे रचनात्मक काम चालू झाले होते.

तेव्हा मराठी वाङमय, त्यातल्या त्यात मराठी विनोदी वाङमयासारख्या निष्पाप विषय वर चर्चा कम् गप्पा होणे अगदी स्वाभाविकच होते.

हजर असलेल्या बहुतेक सगळ्यांनी बर्व्यांच्या 'आजकाल चांगल्या विनोदी वाङम-याची निर्मिती होत नाही' ह्या मताला मुंड्या हलवून संमती दिली होती.

अशी मुंडी संमती ह्या लोकानी बर्व्यांनी 'आजकाल चांगल्या कादंबऱ्या लिहिल्या जात नाहीत वा चांगल्या कविता लिहिल्या जात नाहीत वा चांगली आत्मचरित्रे लिहिली जात नाहीत' असे जरी म्हटले असते तरी संमतीदर्शक मुंड्या हलवल्या असत्या हे नक्की.

त्याचे एक मुख्य कारण म्हणजे हल्ली पूर्वीसारखे काहीही चांगले होत नाही म्हटले की साधारण मराठी माणूस त्याला संमती देतो. आता पूर्वीसारखे नट–नट्या राहिल्या नाहीत, वर्तमानपत्राचे संपादक राहिले नाहीत, पूर्वीसारखे चांगले शिक्षक राहिले नाहीत असे म्हटले की सगळ्यांना फार छान वाटते.

परवा तर एका गृहस्थाने कमालच केली. होळी व धुलवड पूर्वीसारखी चांगली होत नाही अशी त्याने कुरकुर केली होती ! आता ह्यावर काय बोलणार. हा ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा प्रश्न आहे म्हणावयाचे व सोडून द्यावयाचे, झाले.

बर्वे ह्यांच्या विनोदी वाङमयाच्या निर्मिती-बद्दलच्या मताला दुजोरा मिळण्याचे दुसरे तितकेच महत्त्वाचे कारण होते ते म्हणजे तेथे जमलेल्यांपैकी कोणीही लेखक वा स्त्री–लेखिका नव्हती.

नाही म्हणायला स्वातंत्र्य-सैनिक बर्वे गेले कित्येक वर्षांपासून आपल्या स्वातंत्र्य-युद्धाच्या आठवणी, आपला तुरुंगवास वगैरे-बद्दल लिहीत होते. ते काय सावरकरा-सारखे काळ्यापाण्यावर थोडेच गेले होते ? इन मिन तीन–साडेतीन महिन्याच्या साध्या तुरुंगवासावर ते लिहून लिहून काय लिहि-णार व किती लिहिणार ? तेव्हा त्यांचे साहित्य गुलदस्त्यातच पडून होते.

कर्व्यांचा असल्या छचोर वाङमयावर मुळातच विश्वास नव्हता. श्रीमती कर्व्यांचा असल्या छचोर वाङमयावरचा विश्वास हल्लीच्या स्त्री–लेखिकांच्या कादंबऱ्या वगैरे वाचून बळावत चालला होता. त्यांच्याही मनात आपणही 'असे' काहीतरी लिहावे असे येत असे; पण बाकी 'सोसायटी'तले लोक काय म्हणतील, मुख्यतः 'हे' काय म्हणतील ह्या चिंतेच्या तापामुळे त्यांचे वाङमयीन रोपटे जळून जात असे.

कामतची बायको तर काय लग्न होऊन अवघे तीन–चार वर्षं झालेली एक तरुणी होती. आत्ता आत्ता कुठे त्यांच्याकडे फ्रिज, टी. व्ही. वगैरे गोष्टी आल्या होत्या. लग्नाचा जाच, नवऱ्याचा पुरुषीपणा वगैरे जाणवण्या-इतके स्वास्थ्य व वेळ तिला मिळत नसे. त्यामुळे तिने काही लिहिण्याचा प्रश्न नव्हता.

कामत तरुण होता, रागीट होता, उत्साही होता. त्यामुळे तो वेळी–अवेळी म. टा. मध्ये अगदी जुजबी व ज्या विषयाशी आपला काही संबंध नाही त्यावर वाचकाची पत्रे लिहीत असे. म. टा. मध्ये तशा प्रकारच्या पत्राकरता रकानाच असल्यामुळे बऱ्याच वेळा त्याची पत्रं छापून पण येत असत.

राधाचे वाचन चांगले होते. म्हणजे ती चांगले–चांगले वाङमय वाचायची व पुष्कळ प्रमाणात वाचावयाची. तिला लिहिण्याची उर्मी पण येत असे; पण तिच्याच शब्दात सांगायचे म्हणजे तिला 'मेलीला' चांगल्या कल्पनाच सुचत नसत.

आता रहाता राहिला श्याम. तो चोरून–मारून त्याच्या बुद्धी व श्रद्धेप्रमाणे विनोदी साहित्य लिहीत असे; पण ते मोठ्या आणि भारी संपादकाकडून साभार परत येत असे व अगदी फुटकळ वर्तमानपत्रवाल्याकडून साभार छापले जात असे. पण ही पत्रके इतकी फाटकी, म्हणजे एखाद्या अत्यंत हड-कुळ्या माणसाला आपण 'फाटका' म्हणतो तशी फाटकी असत की त्यात काही छापून येणे हे न येण्या बरोबरीचे असे. त्यामुळे श्याम लेखक आहे व त्यातल्यात्यात विनोदी लेखक आहे हे कोणाच्या गावीही नसे.

एवंच, बर्व्यांच्या मताला सगळ्यांनी मुंडी हलवण्यामागची ही अशी कारणावळी होती; पण नुसती मुंडी हलवून तर चर्चा होणार नव्हती. त्यावर कोणीतरी ठोस प्रतिक्रिया दाखवणे भाग होते. त्यातल्यात्यात राधाचे वाचन चांगले असल्यामुळे त्या ठोस कामाची जबाबदारी तिने उचलली व म्हणाली.

'असं कसं म्हणता तुम्ही बर्वे गुरुजी' आपले पु. ल. आहेत, व पु. आहेत आणि आपले ते कोण... ते आहेत.' सर्वसामान्य मराठी माणसाप्रमाणे राधाला पु. ल. व व. पु. सोडून तिसरे नाव आठवेना. तेव्हा तिसऱ्या नावाचा नाद सोडून देत ती म्हणाली, 'ह्या लोकानी कितीतरी चांगले लिखाण केले आहे की !'

'हो, हो, हे बरीक खरं आहे हो !' आता कर्व्यांना कंठ फुटला होता. त्यांनी पूर्वी कधी तरी पु. ल. चे प्रवास–पुराण वाचले होते. त्या वेळी ते अगदी खदाखदा हसले होते; पण आपल्यासारख्या स्वयंसेव-काला असे खदाखदा हसणे शोभा देत नाही हा विचार आल्याबरोबर ते जे गंभीर झाले होते ते कायमचे !

'हां, पु लं. नी चांगले लिहिले असेल पण... ' आता ह्याच्यापुढे काय बोलावे हे स्वातंत्र्यसैनिक बर्व्यांना सुचेना. तेही एकेकाळी पु. लं. च वाचून खदाखदा हसले होते. पण ते तसे मान्य करायला त्यांचा जीव धजावत नव्हता.

का कुणास ठाऊक पण सर्वसामान्यपणे आपल्याला मराठी विनोदी वाङमय आवडते, आपण ते वाचतो व खदाखदा वा ज्याची जी पद्धत असेल त्या पद्धतीने हसतो हे मान्य करायला लोकांना लाज वाटते. फारच फार झाले तर आपण वुडहाउसचे वाचतो व ते आपल्याला फार आवडते असे ज्ञाते लोक थोडया अभिमानाने सागतात. कारण वुडहाउस चांगले लिहितोच; पण त्यातून तो साहेब पडला ना ? पण मराठीबद्दल असलं बोलायची लोकांना लाज वाटते. बर्वेगुरुजी तसेच एक लाजणाऱ्यांपैकी होते.

त्यातून ते पडले स्वातंत्र्यसैनिक ! त्याना सगळया रसांचे वाकडे, त्यातल्यात्यात विनोदी रसाचे ! भारतमातेच्या हातापायात परदास्याच्या बेडया पडलेल्या असताना, तुम्हाला विनोदीच काय पण साधे लिहिणे कसे सुचते असा त्याचा प्रश्न व तसे त्याचे विचार !

'... म्हणजे पु. ल. चांगले लिहितात असे ऐकले आहे.' बर्वे मघाशी अर्धवट सोडलेले वाक्य पुढे रेटत म्हणाले, 'खरं म्हणजे मी स्वतः काही वाचल नाही. आम्ही त्यावेळी स्वातंत्र्य युद्धात इतके गुरफटून गेलो होतो की असं काही वाचायला मनच होत नसे.'

'अरे सैनिका !' श्याम तावातावाने पण मनातल्या मनात म्हणाला, 'स्वातंत्र्य युद्ध तर बेचाळीस सालीच संपले. त्यानंतर झाल्या त्या फक्त वाटाघाटी व चर्चा आणि पु. लं. चं सगळं लिखाण भारतमातेच्या सगळया बेडया तुटून गेल्यानंतरच झालं आहे.'

पण असलं काही कडवट बोलून श्यामाला रंगाचा बेरंग करायचा नव्हता. त्यामुळे तो चूप बसला.

'नाही म्हणायला आम्ही य. गो जोश्याचे विनोदीलेख वाचले आहेत. अगदी अप्रतिम !' बर्वे मोठया आनंदाने कौतुकात्मक बोलले.

'अहो, ते य. गो. जोशी नाहीत काही, ते शेवग्याच्या शेंगावाले हे चि. वि. जोशी, चऱ्हाटवाले !' राधा आपले ज्ञान दाखवण्याचा मोका असा सहज थोडाच सोडणार होती ?

'हो, तेच ते, चि. वि. जोशी !' बर्वे मोठया खजिलतेने म्हणाले, 'ह्या जोशी लोकाचा फार गोंधळ होतो बुवा !' जोशी नावाचा घोटाळा करण्याबद्दल बर्व्यांना दोष देणे योग्य झाले नसते. खरं म्हणजे मराठी वाङमयात जोशी लोकांनी महाराष्ट्राच्या राजकारणात पाटील लोकांनी, दिल्लीच्या राजकारणात सिंग लोकांनी, जो घोळ घातला आहे त्याला जगात तोड नाही.

'आजकाल काय होतं की वयामुळे नावे लक्षात रहात नाहीत.' बर्वे पुढे म्हणाले 'पण मी चि. वि. जोशी वा पु. ल. देशपाडयाबद्दल बोलत नव्हतो, मी म्हणत होतो सध्या चागलं विनोदी वाङमय कोणी लिहीत नाही पूर्वीसारखे.'

'पण गुरुजी तुम्हीच सांगा, जीवन किती धकाधकीचं होत चालले आहे, जीवनाचा लढा प्रखर होत चालला आहे...' हे जाज्वल्य विचार अर्थातच तरुण कामतचे होते. खरं म्हणजे तो एका राष्ट्रीयकृत बँकेत कामाला होता. त्याची कचेरी सनमायकाने मढवली होती व वाताअनुकुल म्हणजे चागली थंडगार होती. तेव्हा त्याने भडकायचे काही कारण नव्हते. पण बहुधा थंडगार कचेरीत काम करणारी मंडळीच जास्त भडकतात.

कामत काय काय बोलणार हे सगळयांना माहीत होते व किती बोलणार हेही माहीत होते त्यामुळे त्याला कोणी आडवले नाही.

एवढे सगळे रण माजले होते तरी श्याम मात्र नेहमी मेरूमणी शांत रहातात तसा शात होता. आतापर्यंत श्याम काही बोललाच नाही त्या अर्थी त्याच्या मनात काहीतरी काळेबेरे आहे हे राधाने ओळखले. पण त्याला थोडे ढोसल्याशिवाय तो काही बोलणार नाही हेही तिला माहीत होते. तेव्हा ती म्हणाली, 'आज तुम्ही गप्प गप्पसे बरे ?' आता सगळयाच्या लक्षात श्याम गप्प गप्पसा आहे हे आले.

'खर म्हणजे श्यामकाका तुम्ही स्वतः विनोदी वाङमय निर्माण करता तेव्हा तुम्हीच त्याच्याविषयी बोललं पाहिजे.' कामत म्हणाला 'ह्या विषयावर तुम्ही अगदी अधिकारी-वाणीने बोलले पाहिजे.'

'हे मात्र अगदी खरे आहे !' कर्वेबाई ह्या वयात जितके मुरडता येईल तेव्हढे मुरडत म्हणाल्या.

कर्वेबाईंनी असा दुजोरा दिल्याबद्दल श्यामच्या चेहऱ्यावर उत्साह व ही बाई उगाच का मधे-मधे बोलते आहे ? असा तिरसट भाव राधाच्या चेहऱ्यावर अगदी नकळत आला.

'आम्ही काय बोलणार ?' श्याम निश्वास टाकून म्हणाला 'बर्वेगुरुजी म्हणतात तेच खरे आहे. सध्या मराठी लेखकाकडून चागले विनोदी वाङमय निर्माण होत नाही हेच खरे !'

श्यामने सगळया जनतेचा 'जनते' प्रमाणेच अवसान घात केला होता. जनतेची अपेक्षा अशी होती की श्याम बर्वेगुरुजीशी दोन हात करेल व चर्चेला चांगली रंगत येईल. 'आता राजकारणी लोक सगळयात यायला लागले आहेत ना ?' श्यामने जाता जाता बॉम्बगोळा टाकला. अपेक्षेप्रमाणे राधा भडकली.

'आलात का तुम्ही मूळ पदावर ?' राधा भल्या संतापाने म्हणाली, 'अहो, विनोदाचा आणि राजकारणी लोकांचा काही संबंध तरी आहे का ?'

'अगदी भरपूर आहे !' श्याम रोखठोकपणे म्हणाला.

'तो कसा काय बुवा ?' कोणातरी उत्सुकाने उत्सुकतेने विचारले.

'अहो राजकारणी लोकच आता विनोदी प्रसंग निर्माण करताहेत. नुसते वाङमयीन नाही तर खरे खरे !' सगळयांच्या चेहऱ्यावर प्रश्नरस ओसांडतो आहे बघून श्यामला उत्साह आला. 'आता परवाचा मंत्रि-मंडळाच्या शपथविधीचा कार्यक्रम बघा. केवढा गंभीर प्रसंग पण ह्या राधाच्या लोकानी केव्हढा विनोदी केला. पहिलं म्हणजे लग्नामुजीसारखा शामियाना घालायची गरजच काय ? सगळे आमदार, सभापती वगैरे जर सभागृहात शपथ घेतात तर मंत्र्याना तेथे शपथ घ्यायला काय हरकत आहे ? नशिब वाजंत्री व बॅन्ड लावून वरात काढत नाहीत ते.'

'बर एवढे करून मुख्यमंत्री एका महत्वाच्या माणसाचे नाव विसरतातच ! आणि वर सागतात 'मी यादी वाचली नव्हती म्हणून !' ह्यांना मंडपात जायची घाई झाली होती ना !'

'आणि एका मंत्रीमहोदयाने तर म्हणे अकरा वेळा अगदी एकावर एक अकरा वेळा शपथ घेतली म्हणे. का ? एकदा घेतलेली शपथ आयुष्यभर पुरत नाही ? आपले काही डोके चालववायाचेच नाही. लोकशाहीच्या मातृदेशात प्रत्येक वेळी शपथ घेतात ना ? मग येथेही तीच पद्धत !'

'आता सागा आमचे चि. वि , पु. ल. व व. पु अगदी एकत्र केले तरी इतक्या गभीर प्रसंगाला ते विनोदी रूप देऊ शकतील का ? शक्यच नाही !'

बहुतेकाना श्यामचे म्हणणे पटू लागल्यासारखे वाटत होते. ☐

## रयतवारी आणि जमीनदारीच्या व्यवस्थांच्या संदर्भात

# शेतकरी चळवळ

● गीता साने ●

शेतकरी संघटनेच्या एका (धुळे) अधिवेशनाला आलेल्या शिष्ठ-मंडळात, उत्तर प्रदेशाचे नाव वाचून मी थोडी बुचकळ्यात पडले. मला प्रश्न पडला, हा कुठला उत्तर प्रदेश, पश्चिमेचा की पूर्वेचा? असा प्रश्न सहज पडावा, इतकी भिन्नता त्या प्रदेशात आहेही.

वस्तुतः सिंधू–गंगेच्या खोऱ्याचे, राजकीय दृष्टया कितीही खंड झाले असले, तरी त्या सबंध खोऱ्याचे ऋतु व हवामान सारखेच आहे. सिंधू, गंगा आणि त्याच्या उपनद्यांनी गाळून सुपीक व जल-समृद्ध केलेल्या त्या खोऱ्यात वर्षाकाठी पाच ते सहा पिके घेतली जातात.

खोऱ्याचा पश्चिम भाग, म्हणजे मुख्यत्वे पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशचा पश्चिम भाग, येथील कृषीव्यवस्था, महाराष्ट्राप्रमाणेच रयतवारीची आहे. स्वतंत्र भारतातील शेतीच्या कायद्यांनी घेतलेली वळणे, घातलेले वळसे, दोन्ही प्रदेशात सारखेच होते व आहेत आणि दोन्ही प्रदेशामधल्या शेतकऱ्यांच्या समस्या बहुतांशी सारख्याच आहेत.

आपल्या समस्या सोडवण्यासाठी, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची चळवळ एका शेतकऱ्याच्या मार्गदर्शनाखाली उभी राहिली. शेतकरी आणि त्याच्या कुटुंबातील माणसाच्या काबाडकष्टांचे योग्य ते मूल्य-मापन करून, शेतीचा खर्च काढण्यात यावा, आणि शेतीच्या उत्पा-दनाचे भाव, त्या खर्चावरून ठरवावेत, ही महाराष्ट्रीय चळवळीची तर्कसंगत आणि न्याय्य मागणी होती–आहे. त्या चळवळीचे अधि-ष्ठान, भारतीय संविधानाच्या स्वाधीनता, समता, सामाजिक न्याय इत्यादी मूल्ये असून, तिची ताकद, शेतकऱ्यांच्या तिला मिळणाऱ्या पाठिंब्यात आहे आणि त्यामुळे ही लोक–चळवळ लोकशाहीचे, अहिंसेचे मार्ग स्वीकारते, हे स्वाभाविकच आहे. सिंधू–गंगेच्या खोऱ्याच्या पश्चिम भागात, अशाच प्रकारची चळवळ उभी रहावी हेही स्वाभाविकच आहे आणि त्या चळवळींनी एकजूट करून आपल्या मागण्या पुढे रेटाव्या हेही अपेक्षितच आहे.

गंगा–खोऱ्याच्या पूर्व भागात, शेतकरी आपल्या हक्कासाठी चळ-वळ उभारतील, ही शक्यता पुढच्या काही दशकात तरी संभवनीय वाटत नाही. कारण खोऱ्याच्या ह्या भागात शेती आहे; पण काही अपवाद वगळता, शेतकरी–वर्ग नाही. शेतीची मशागत करणारा, जमिनीचा मालक तर नाहीच; पण तो कसत असलेल्या जमिनीवर त्याला कुठलेही अधिकार नाहीत. जमिनीचा मालक भूस्वामी किंवा जमीनदार, शेताची मशागत करीत नाही. येथली जमीन मोठ्या प्रमाणात, ब्राह्मण, भूमिहर, राजपूत इत्यादी द्विजवर्णियांची आहे. त्यांना शेतीसारखा शूद्रांचा व्यवसाय निषिद्ध आहे आणि त्यांच्या परंपरांप्रमाणे ते नांगराला हात लावीत नाहीत आणि त्यांच्या स्त्रिया कधी शेतात जातदेखील नाहीत. त्या लहान–मोठ्या जमीनदारांचे जाळे अवध, उत्तर बिहार आणि पश्चिम बंगाल येथे पसरलेले आहे.

शेती न करता, जमिनीचे स्वामित्व अबाधित ठेवणारा हा वर्ग आपली शेती चांभार, दुसाध, नुनियार इ. अस्पृश्यांकडून आणि अहीर, कूर्मी वगैरे शूद्र जातीकडून करवतो. अशा प्रकारे पूर्व खोऱ्यातील जनतेचे दोन वर्ग स्पष्ट दिसतात. त्यापैकी एक जमीनदाराचा आणि दुसरा शेत कसणारांचा. ह्या दोन्ही वर्गांचे परस्परसंबंध आणि त्याचे बाहेरच्या जगाशी संबंध, त्यांचा विचार वेगवेगळा करावा लागतो.

शेत कसणारांपैकी शूद्र वर्णाच्या कुटुंबाजवळ स्वतःची थोडी बहुत जमीन असते आणि ती फार थोडी असल्याने, हा वर्ग जमीनदारां-कडून काही शेती बटइने (बटई–भागीदारी) घेतो. शेतीची अव-जारे, बी–बियाणे, खते–कीटकनाशके, बटईदाराची असतात. पिकाची वाटणी, परंपरागत अर्धेलीने होते. ही वाटणी २८ : ७२ ह्या प्रमाणात करण्याचा कायदा, पुराणातल्या वांग्यासारखाच आहे. कारण कबुला-यती लेखी क्वचितच असतात. कायद्याचे बोट धरणे, हे काम जिकिरीचे, वेळखाऊ आणि खर्चाचे असते. त्याचप्रमाणे, जमीनदार शेत त्या 'भांडकुदळ' बटईदाराकडून काढून घेण्याचा दाट संभव असतो. जमीनदारांच्या पदरी असणारे पहिलवान (muscle-men) लाठ्या घेऊन, धडा शिकवायला सज्ज असतात. त्यामुळे चालत्या गाड्याला, कायद्याची खीळ घालण्याचा 'वेडा' प्रयत्न कोणी सहसा करीत नाही. कुळ–कायदे ह्या वर्गाला, जमिनीवर कुठलाही अधिकार देण्यास असमर्थ असणे अपरिहार्य आहे.

### कायम कर्जदार

शेत कसणारांचा दुसरा वर्ग अस्पृश्य किंवा पंचम–वर्णाचा आहे. हा दरिद्री माणूस, जमीनदारांच्या शेतावर कधी मजूर म्हणून तर कधी सालदार म्हणू अतोनात कष्ट करतो. ह्याला भारतामधला कुठलाही कायदा संरक्षण देण्यास अपुरा आहे. त्याचे सारे कुटुंब, घरातील स्त्रिया आणि मुलेही शेतात राबतात. किमान मजुरीचा कायदा त्याला माहीत नसतो आणि कोणी सांगितला तरी तो त्याच्या



□ आपले जग आपणच येथे हरवून बसतो □

कामी येण्याचा संभव नसतो, कारण त्याला काम देणे वा नाकारणे आणि उपासमारीने वठणीवर आणणे हा राजमार्ग जमीनदाराला मोकळा असतो. हरिजन वस्तीवर मालकाचे पहिलवान केव्हा धाड घालतील आणि काय अत्याचार करतील ह्याला कुठलीही मर्यादा व्यवहारात नसते. त्याला मजुरी किती द्यावी आणि ती नकदी द्यावी का वस्तूच्या स्वरूपात द्यावी, हे मालकच ठरवतो. जेव्हा बाजारभाव चढे असतात आणि शेतमालाला मागणी असते, तेव्हा मजुरी नगदी दिली जाते आणि शेतमालाचे भाव घसरले, म्हणजे वस्तू आणि काही खरेखार त्याच्या पदरात पडतात.

हा 'नोकर' बहुतेक प्रसंगी, मालकाच्या कर्जात अडकलेला असतो; कधी लग्न किंवा मृतांची उत्तर कार्ये कधी वृद्धांची दुखणी अशा प्रसंगीच त्यांना कर्ज देण्यात येते. लेखिकेने एका खेड्यात केलेल्या चौकशीत असे दिसून आले की, प्रत्येक कुटुंबावर ५०० ते १५०० रुपयांचे कर्ज होते. आम्ही त्यांना ७५ रुपयांत एक चांगल्यापैकी बकरी–जोडा देऊ केला आणि आणखी थोडे कर्ज काढून त्यांनी तो अर्ध्या किमतीला विकत घ्यावा कसे सुचवले. त्यावर एक तरुण, कसनुसे हसून म्हणाला, 'आई, ह्या कामाला सावकार कर्ज देणार नाही. त्याला कर्ज फिटावे असे वाटतच नाही.'

कर्जात बुडलेली कुटुंबे आपल्या कर्जाने बांधलेली आणि म्हणूनच त्यांना 'बांधलेले मजूर' हे अन्वर्थक नाव दिलेले आहे. हाताला काम, पोटाला भाकर-तुकडा आणि मालकाचे कर्ज ह्या सर्वच काढण्यांनी तो बांधलेला असतो. त्याच्या क्षुल्लक किंवा काल्पनिक चुकीसाठी मालकाचे पहिलवान त्याला 'समजूत' देतात. चाबकाखाली फोडून काढणे, हातपाय मोडणे, प्रसंगी गोळ्या घालणे ह्या गोष्टी कोणालाही विशेषीच्या वाटत नाहीत. त्यामुळे हरिजन वस्तीत, दहशतीचे वातावरण नेहमीच असते. त्या वस्तीत हिंडताना, तिचा कंगालपणा, प्रत्येकाच्या तोंडावरची असहायता आणि लाचारी आपल्यालाही गुदमरून टाकणारी दहशत, ह्यामुळे आपण हादरतो क्वचित धास्तावतोही.

असा आहे गंगा खोऱ्याच्या पूर्व भागामधला शेती मशागत करणारा परिवार. हा स्वतः गुलाम आहे. गुलामाला कसल्या चळवळी? कुठली भाववाढ ? कुठली स्वाधीनता–समता ? आपले जग आपणच येथे हरवून बसतो. आपल्या डोळ्यादेखत मार खाऊन माणूस मरू लागला तरी आपण काही करू शकत नाही.

बांधलेला मजूर अज्ञान असेल, असतोच तर त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे सामर्थ्य त्याला नसते; पण आपणही येथे असमर्थ, असहाय्य का ठरतो ? त्याचा विचार करण्यापूर्वी जमीनदार वर्गाचा विचार करणे आवश्यक आहे.

## जमिनदार सहीसलामत

जमिनदारांच्या ज्या वर्गाचा विचार आपण करीत आहोत, तो आपल्या लोकसत्ताकाच्या कायद्यातूनच अस्तित्वात आलेला आहे. गंगा खोऱ्याच्या ह्या प्रदेशात लॉर्ड कॉर्नवॉलिस ह्याने १७९३ मध्ये कायमधारा पद्धती सुरू केली होती. जुने जमीनदार खऱ्या अर्थाने सारा गोळा करून सरकारी तिजोरीत भरण्यास जबाबदार असलेले ठेकेदार मात्र होते. हळूहळू त्यांचे महत्त्व वाढत गेले. त्यांच्यापैकी अनेक राजा, महाराजा ह्या पदव्यांनी विभूषित झाले आणि काही तर महाराजाधिराज ह्या पदवीलाही पोचले. आपला सारावसुलीचा प्रदेश त्यांनी हळूहळू गिळंकृत केला आणि ते मालक बनले. त्यांच्यासाठी काही कायदे ब्रिटिशांनी केले होते. उदाहरणार्थ, १८८५ चा बिहार टेनन्सी ॲक्ट. पण ह्या कायद्यातील कलमे शोभेची होती, असेच जमीनदार समजत आले आणि त्यांची निरंकुश सत्ता त्यांच्या जमिनदारी प्रदेशात अव्याहत राहिली.

स्वतंत्र भारताने आपल्या राजवटीच्या पहिल्या १०–१५ वर्षांतच ह्या जमिनदाऱ्यांचे विसर्जन करणारे कायदे केले. तथापि ह्या कायद्यांचे मसुदे तयार करणारांना रयतेपेक्षा जमिनदारांचे हितसंबंध सांभाळणे जास्त आवश्यक वाटले असावेत अशी कल्पना हे कायदे वाचताना मनात येते.

बिहारचा जमिनदारी विसर्जनाचा कायदा कलताना असे वाटते की, हा कायदा जणू म्हणतो आहे, 'घाबरू नका. मी तुमचे नुकसान होऊ देणार नाही.' 'खास पद्धतीमधील जमीन' म्हणून हवी तेवढी जमीन घ्या. खास जमिनीखेरीज तुम्हाला 'Home-Stead' ह्या सदरात जमीन देतो. म्हणजे तुम्हाला राहती वास्तू, भाड्याने दिलेल्या वास्तू, शेतीला लागणारी वास्तू मिळतील. देवालये, तळी ग्रंथालये इत्यादी अनेक स्थाने तुमचीच रहातील. खास जमिनी, तुम्ही वहीम करा. नोकरांकडून करवा, भाडोत्री माणसांकडून करवा. तुम्ही फक्त म्हणा, 'ही जमीन खास आहे' मी ते मान्य करीन हं ! सारा गोळा करण्याचे किचकट काम करायला सरकार तयार आहे; ठीक आहे !

सुंठीवाचून खोकला गेला.

जमिनीदारांकडे जमिनी किती प्रमाणात राहिल्या होत्या ह्याची कल्पना, आचार्य विनोबा भावेंना ह्या जमिनदारांनी शेकडो एकर जमिनी दान दिल्या त्यावरून येते.

असा हा जमिनदारांचे कल्याण करणारा कायदा कोर्ट, सुप्रीम कोर्ट अशा वाऱ्या करीत अखेर १९५५ मध्ये लागू झाला. जमिनदारांचे हक्क डोळ्यात तेल घालून त्या कायद्याने जपले. शिवाय त्यांनी जुन्या १८८५ च्या कायद्याचे केलेले उल्लंघनही सतत दृष्टिआड केले. त्यामुळे रयत ह्या कर भरणाऱ्या लोकांच्या याद्या सरकारच्या हाती जवळजवळ आल्याच नाहीत. 'कागदपत्रे उपलब्ध नाहीत' हाच सगळीकडे खाक्या !

जमिनदारी विसर्जन कायद्यात रयत किंवा कुळे ह्याच्याबद्दल काही व्यवस्था आहेत; पण बटाईदारांचे अस्तित्वही ह्या कायद्याला माहीत होते असे दिसत नाही. बिहार सरकारने सारा गोळा करण्याचे जे काम अंगावर घेतले, त्यात त्यांनी रयतेला जमिनी दिल्या. का होईना एवढे तर पदरात पडले खरे; पण रयत शब्दाची जुनी व्याख्या कोणी वाचलीच नव्हती की काय देव जाणे. ह्या व्याख्येप्रमाणे रयत म्हणजे १) स्वतः जमीन वहीम करणारा किंवा २) कुटुंबियांकडून अथवा नोकरांकडून वहीम करवणारा असे दोन गट पूर्वीपासून होते.

रयतेला जमीन देताच, जेथे शूद्र वर्ण शेतकरी होते तेथे ते मालक झाले. दक्षिण बिहारमध्ये शेती मुख्यत्वे कुर्मी, महतो, संताळ इत्यादी गट करीत. हे आता शेतकरी आहेत. उत्तर बिहार आणि अवध येथे मात्र शेती आपण आरंभी पाहिल्याप्रमाणे मुख्यत्वे द्विज जातींकडे होती. ह्या द्विज जाती शेकडो, हजारोंच्या संख्येने नवीन जमिनदार झाल्या. आज बिहारमध्ये त्या राज्य करतात आणि मोठ्या प्रमाणात उत्तर प्रदेशातही त्यांचेच वर्चस्व आहे.

दास प्रथेवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेत फोफावलेला हा समाज आजही १७ व्या शतकात जगतो, तुलसीदासांच्या रामचरित मानसावर त्यांची अनन्य श्रद्धा आहे. त्याची पारायणे, सप्ताह, अखंड पाठ नेहमीच होत असतात. रात्रीच्या पाठाला बांधलेले मजूर किंवा कुळही श्रद्धेने देतात. तुलसीदासांच्या—

'ढोर, गंवार शूद्र पशु नारी
ये सब ताडन के अधिकारी'

ह्या वचनावर त्यांचा विश्वास आहे. 'लातो के देव बातो से नहि मानते' ही म्हणही सतत कानावर येते. इथला वागणुकीचा आदर्श श्री. रामचंद्र आहे.

ब्राह्मण जातीत शिक्षणाचा प्रसार काही प्रमाणात आहे, पण इतर द्विजात शिक्षणाचे महत्त्व फारसे नाही. स्त्रियांच्या शिक्षणाची स्थिती त्याहूनही हलाखीची आहे.

दलितांनी चाकोरी सोडू नये म्हणून त्यांच्यावर बारीक लक्ष ठेवलेले असते. त्यांच्या मुलांनी शाळेत जाण्याची कल्पनाही जमीनदारांना मानवत नाही.

आली जमिनदारी ही कायद्याच्या हलगर्जीपणातून आपल्याला मिळाली. त्याची जाणीव जमीनदार वर्गाला असो वा नसो. आजच्या लोकसभेच्या काळात आपले वर्चस्व स्थायी नाही ह्याचे भान त्यांना गेल्या ३०-३५ वर्षात होत गेले. त्यामुळे जमीनदारांचे हितसंबंध



□ अनन्वित अत्याचार □

जपणारी संघसत्ता ( oligarchy ) इथे अस्तित्वात येऊन दृढमूल होत गेलेली आहे. ह्या प्रदेशातील निवडणुका संघसत्तेच्या पाठिंब्यानेच जिंकल्या जातात. मग सत्तेवर येणारा पक्ष कुंकू कुठल्याही पक्षाचे लावू देत. कांग्रेस, जनता, सीपीएम कोणीच त्याला अपवाद नाही. कांग्रेस राजवटीत हरिजनांच्या वस्त्या जाळून बेचिराख केल्या जातात. तर जनता राजवटीत, सावकार—जमीनदार, पोलीस—पाटर्या आणून अपरात्री खेडी घेरून अनन्वित अत्याचार करतात. CPM च्या राज्यात बटाईदारांना आपली नावेही सरकारी खात्यात चढवणे अशक्य होऊन बसते.

ही परिस्थिती आपल्या आपल्या अज्ञानामुळे उत्पन्न झाली, हे म्हणणेही वस्तुस्थितीला धरून नाही. भारताचे सर्व पंतप्रधान, मुरारजी आणि चरणसिंगचे अपवाद वगळता अवधमधले आहेत. भारताचा पहिला राष्ट्रपती उत्तर बिहारचा आणि स्वतःही जमीनदारच होता.

## कायम दहशत—हिंसा

कुठलाही अन्याय आपल्या दृष्टिसमोर घडला तरी, आपण प्रतिकार करण्यास असमर्थ का ठरतो हे समजणे आता कठीण नाही. सरकार जमिनदारांचे, नोकरशाही बहुतांशी त्यांचीच. अपवाद निघालेच तर ते खड्यासारखे बाजूला काढण्यात येतात. पोलीस त्यांचे असतात. तेथे तक्रार करायला जाणाऱ्याचा रस्ता प्रथम पहिलवान अडवतात. तरीही पोलीसठाण्यावर कोणी पोहोचलाच तर

'तू नक्सलाइट आहेस अथवा बदमाश आहेस' असे म्हणून त्याची तक्रार नोंदून घेण्याऐवजी त्यालाच पोलीस बंद करून ठेवण्याचा संभव असतो. क्वचित आपण स्वतः जाऊन तक्रार केली आणि तक्रार करणाराचे वरती वजन असावे असे पोलीसला वाटले तर, 'आम्ही करतो कारवाई. काळजी करू नका' किंवा 'दिवस बदलले आहेत एवढेही त्यांना समजत नाही.' असे काहीतरी ऐकल्यावर, आपण काहीतरी केले ह्या समाधानाने परत येतो. त्यानंतर पोलीस काय करील, अन्याय सोसणाराच तंबी देईल का पकडून जेलात पाठवील, का आपली तक्रार फाडून फेकून देईल, हे सांगणे कठीण असते.

दहशतीने भारलेल्या ह्या प्रदेशात सामाजिक अभ्यास करावयास सहसा कोणी जात नाही. केल्यास त्याचा काटा, जमिनदारांचे पहिलवान केव्हाही काढतात. मजूर वर्गात तसेच बटाईदारात अस्वस्थता आहे, असंतोष आहे तथापि त्याला काही संघटित स्वरूप देण्याचे प्रयत्न मुळातच खुडले जातात.

कोठे अनपेक्षितपणे मजुरांच्या फळया उभ्या राहिल्याच तर, त्या निर्दयपणे मोडून काढल्या जातात. भर दिवसा वस्तीत लूट होते. बलात्कार होतात, बंदुकीच्या गोळयांचा वापर होतो. 'हरिजनांच्या पन्नास झोपडया जाळल्या' किंवा 'जळणाऱ्या वस्तीत दहा–वीस बायका–पोरे जळून मेली' ह्या वार्ता कोणालाही खोटया वाटत नाहीत.

हिंसा वातावरणात ठासून भरलेली असते. स्फोट व्हायला एखादी चकमकीची ठिणगीही पुरते. यंदाच्या निवडणुकांनी ह्याचा निर्वाळा दिलाच आहे. शरीर कमावणे, शस्त्रे वापरणे ह्यांचा अभ्यास ह्या प्रदेशात पूर्वीपासून चालत आलेला आहे. पूर्वी येथले तरुण बाहेरच्या सैन्यात दाखल होत. आता त्यांचा ओघ औद्योगिक क्षेत्राकडे वळलेला आहे. १०–१५ हजारांची पागडी भरून नोकरी मिळवण्याचे तंत्र व सामर्थ्य ह्यांना आहे. हे तरुण गटाने बाहेर जातात. जुन्या चाकोऱ्या कुठे तोडाव्या लागल्या तर तो आपद्धर्म मानण्यात येतो. त्यामुळे शहरामधली सामाजिक परिवर्तने खेडयाच्या सीमा ओलांडीत नाहीत.

येथे परिवर्तनाला सर्वस्वी बंदी आहे. ह्या समाजाची बांधिलकी भारताच्या संविधानाला नाही. तर जुन्या मूल्यांना आहे. उद्योगात काम करणारे तरुण घरी पैसे पाठवीत असतात. त्यातून घरातले वृद्ध नवी जमीन खरेदी करीत असतात, तसेच नव–नवो अग्नेय-अस्त्रे परवाना किंवा विनापरवानाही विकत घेतली जातात. बंदु-कीच्या गोळया सतत उडत असतात.

ज्या माफियामुळे धनबादने दिगंत कीर्ती मिळवली तो माफिया म्हणजे अवध आणि उत्तर बिहारची फसफसून उताला गेलेली थोडीशी–कड आहे.

असा आहे गंगा-खोऱ्याचा पूर्व भाग. येथे भाववाढीची चळवळ आजवर नाही, तिची गरजही जमीनदारांना नव्हती. पण आत केंद्र सरकारने कृषी-खर्च आणि मूल्य आयोग स्थापन करण्याचा निर्णय घेतल्यावर, भाववाढीसाठी येथे पहाता पहाता चळवळ उभी राहील. पण तिची मूल्ये स्वतंत्रतेची, समतेची, सामाजिक न्यायाची नसतील. घरातल्या कणग्या धान्याने तोंडोतोंड भरलेल्या आणि पैसा बाहेरून उद्योगातून येणारा, ह्या परिस्थितीत चळवळ दीर्घ काल चालवणेही ह्या भागाला सुलभ असेल.

लोकशाही मूल्यांवर आधारलेल्या चळवळींनी ह्या विशिष्ट घट-नेचा अभ्यास करणे आवश्यक असेल ना? शिवाय जुन्या सवंच जमिनदारी क्षेत्रात काही प्रमाणात चळवळीचा घाट ह्राच असण्याचा संभव नजरेआड करता येईल का? कारण येथे आपली टक्कर यंत्रयुगाच्या अनिष्ट परिणामापुरती सीमित नसून, ती सतराव्या शतकातील जुनाट संस्कृतीशी आहे ना?

ह्या प्रश्नाकडे लोकसत्तावादी चळवळीचे लक्ष वेधण्याचा हा एक लहानसा प्रयत्न. समस्या एखाद्या हिमनगासारखी आहे. ह्या लेखात दिग्दर्शित झाला आहे तो त्या प्रचंड हिमखंडाचा केवळ वरचा शेंडा. □

---

डार्विनचे वेगळेपण हे की त्याने माणसाला 'माणूस' केले. मनुष्यात 'ईश्वरी' अंश आहे, तसेच कोणा एकाच्या पापामुळे मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, या दोन्ही धार्मिक असत्यांच्या मगरमिठीतून त्याने माणूस मुक्त केला.

पण भारतीय समाजाला ही मगरमिठी अजून पूर्ण सोडवता आलेली नाही. माणसातील जाती-पोटजाती थेट परमेश्वराने निर्माण केल्या आहेत अशी आपली श्रद्धा आहे.

म्हणूनच डार्विन चरित्राचा अभ्यास आज उपयुक्त ठरेल.

# चार्ल्स डार्विन

**व्यक्ती, क्रांती आणि उत्क्रांती**

**लेखक : भा. रा. बापट**

डेमी आकार, पृष्ठे : १८२
भरपूर आकृत्या व साधार
विवेचनासह प्रकाशित झालेली
पहिली आवृत्ती.

**किंमत : रुपये बत्तीस**

शाळा कॉलेजच्या ग्रंथपालांनी
त्वरित मागणी करावी.

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ३०.

शब्दांचं अंगण

# आत्मचरित्रे

आशा कर्दळे

गेल्या वर्षभरात काही चांगली आत्मचरित्रे बाजारात आली. त्यात 'कृष्णाकाठ'– (कै. यशवतराव चव्हाण), 'मला उध्वस्त व्हायचंय' (मल्लिका अमर शेख), 'मी एस्. एम्.' (एस्. एम्. जोशी), 'एक झाड आणि दोन पक्षी' (विश्राम बेडेकर), आणि 'आव्हान' (ह. श. देशपांडे) यांचा उल्लेख करावा लागेल.

'मला उध्वस्त व्हायचंय' हे मल्लिका अमर शेख याचे आत्मचरित्र मॅजेस्टिकने प्रकाशित केले आहे. पुरुषप्रधान समाजात स्त्री म्हणून जगताना आलेले कडवट आणि दाहक अनुभव यात कथन केले आहेत. आपली भूमिका स्पष्ट करताना श्रीमती अमर शेख म्हणतात, 'मला स्त्री म्हणून पुरुषप्रधान सस्कृतीकडे न्याय मागायचा आहे...स्त्री जोवर लज्जा, सकोच आणि त्यागाची वस्त्र उतरवत नाही, तोवर तिचं दु ख गृहीत धरल जातं. जो समाज स्त्रीचं दु ख गृहीत धरतो, तो समाज तिला कौतुक, सहानुभूती किंवा वाटोळ याशिवाय काही देत नाही.'

साऱ्या कुंठित झालेल्या स्त्रियांना हे आत्मचरित्र वाचून थोडा दिलासा, थोडी झगडण्याची प्रेरणा मिळेल.

जन्म मुसलमान कुटुंबात. आई पाठारे प्रभू आणि वडील भाई अमर शेख-मुसलमान. मल्लिका लहानपणी सतत आजारी असायच्या. वाचन मात्र भरपूर. वडिलामुळे चित्रपटसृष्टीशी जवळून सबंध आलेला. त्या कविता करीत. नामदेव ढसाळ त्या कवितांच्या आणि नंतर मल्लिकेच्याही प्रेमात पडले. मल्लिकाही दुप्पट वेगाने आकर्षिल्या गेल्या. 'उषाकिरण' या आकाशचुंबी इमारतीच्या पायथ्याशी असलेल्या झोपडपट्टीत रहाणारा, वेश्यांच्या बदनाम वस्तीत नाना व्यसनांना आयुष्यावर गोंदवून घेणारा, कवितांच्या सहाय्यानं विष ओकणारा नामदेव' असे त्या त्याचे वर्णन करतात. नामदेव ढसाळांबरोबरच्या सर्व सबंधांबद्दल त्यांनी मोकळेपणाने सांगितले आहे. ढसाळांनी 'दलित पँथर' ही सघटना स्थापन केली. लग्नानंतर त्यांची संघटना, कार्यकर्ते, सभा, यामुळे मल्लिका एकाकी पडल्या व ताण-तणाव वाढत जाऊन वरचेवर भांडणे होऊ लागली. 'हे आत्मकथन म्हणजे केवळ नवरा बायकोच्या भांडणाचे साग्रसगीत वर्णन नाही. तो लढा केवळ व्हिलन नामदेवाशी नव्हता. आजची समाजव्यवस्था त्याला जबाबदार आहे.' अशा शब्दात त्यानी आपल्या पराभूत आयुष्याचा आलेख चितारला आहे. लग्नानंतर केवळ दुःखच त्यांच्या वाट्याला आले. या दुःखाविषयीही त्यांना ओढ आहे. त्याना दुःखापासून दूर जायचे नाही, तर त्या दुःखाच्या चरम सीमेपर्यंत उध्वस्त व्हायचे आहे. सुख सहजासहजी मिळत नाही. ते हवे असेल तर झगडून, ओरबाडून बोचकारून मिळवा असे त्याचे अनुभवाती मत झाले आहे. या आत्मचरित्रामागे विशिष्ट विचार आहेत. विवाह आणि समाजातील स्त्रीचे स्थान याविषयी त्या म्हणतात,

'तुम्ही ज्या व्यक्तीवर प्रेम करता, त्याच्याशी लग्न करण्यापेक्षा, जो तुमच्यावर प्रेम करतो, त्याच्याशी लग्न करा. 'प्रत्येक यशस्वी पुरुषामागे' एक स्त्री असते हे वाक्य मला खोडायचं आहे. दोघांचा वेगळा मेंदू आणि विचार करण्याची ताकद असल्यावर पुरुषाचं वर्चस्व का स्वीकाराव ?'

आत्मचरित्रातले त्यांचे तेजस्वी विचार आणि प्रत्यक्ष कृती यात मात्र तफावत आढळते. कृतीत बंडखोर वृत्ती असायला हवी. नामदेवाच्या बूटाची लाथ आणि मारझोड त्या मुकाट्याने सहन करतात. केवळ अतीव दुःखाचे दर्शन स्त्रीला लढायला प्रेरणा देऊ शकेल का ?

'एक झाड आणि दोन पक्षी' हे विश्राम बेडेकर या प्रतिभावत साहित्यिकाचे आत्मचरित्र पॉप्युलरने प्रकाशित केले आहे. तृतीयपुरुषी निवेदनशैली हे या आत्मचरित्राचे वेगळेपण प्रथम नजरेत भरते. अर्थात हा चागलेपणाचा निकष ठरू शकत नाही. प्रथमच मुंडकोपनिषदातील झाडावरील दोन पक्षाची सुप्रसिद्ध ऋचा उद्धृत केली आहे. तोच दाखला इथे लावून जीवनवृक्षावर बसलेले दोन पक्षी म्हणजे लेखकाची दोन मने. एक मन सतत कृतीशील, विचारशील आणि सुखदुःखे भोगणारे आणि दुसरे मन पहिल्याच्या कृतीचा अर्थ लावणारे आणि पहिल्यासबधी चिंतन करणारे. दुसऱ्याचा पहिल्यावर सतत पहारा आणि अंकुश. त्यामुळे आत्मचरित्रात तटस्थता आणि परखड आत्मपरीक्षण यायला हवे होते; पण तसे इथे घडताना दिसत नाही.

विश्राम बेडेकराचा जन्म १९०६ मध्ये वऱ्हाडात झाला. बाल्य अत्यत दारिद्र्यात गेले. 'याचे आयुष्य म्हणजे स्त्री-पुरुष मित्रांच्या कृपांची बेरीज वजाबाकी' असे ते एकूण स्वरुप सागतात. त्याच्याजवळ मात्र प्रतिभेचे अनुपम लेणे होते. तिच्या सहाय्याने नाट्य-चित्रपट क्षेत्रे त्यानी गाजवली. मास्टर दिनानाथ आणि शांताराम बापू यांच्याबरोबर त्यांनी कामे केली. प्रभातमध्ये अमर-भूपाळी, ठकीचे लग्न, लक्ष्मीचे खेळ, अंधेरी दुनिया, शेजारी, पहिला पाळणा, लाखाराणी रामशास्त्री अशा अजरामर कलाकृतीचे पटकथाकार आणि दिग्दर्शक म्हणून त्यानी काम केले. 'ब्रह्मकुमारी' हे त्याचे पहिले नाटक आणि अलिकडे गाजलेले 'टिळक आणि आगरकर'. 'रणांगण' या कादंबरीने तर मराठी साहित्यात एक मानदंड निर्माण केला.

या माणसाने अफाट जग पाहिले. अमेरिका, इग्लड, स्वित्झर्लंड वगैरे ठिकाणी दीर्घकाळ वास्तव्यही होते. हा नाट्य-चित्रपट सृष्टीचा स्वच्छंद रहिवासी होता. ही आत्मकथा हा एक दीर्घपट त्यांनी तयार केला आहे. कथनाची शैली 'रणागण' प्रमाणेच अल्पाक्षरी परंतु आशयघन आणि अनेकार्थसूचक अशी. या आत्मकथेतून एक हाडाचा कलावंत, जगण्यावर अमाप प्रेम करणारा, जीवनाशी सतत संघर्ष करत घडत गेलेला माणूस प्रत्ययकारी दर्शन घडवून जातो. शब्दावर त्यांची विलक्षण हुकुमत. तेच त्याचे सामर्थ्यही होते; पण हेच शब्द आयुष्यभर शाप होऊन चिकटले. या शब्दानी त्यांना अंतस्थ बेचैनी आणि घायाळपणा दिला. हे व्यक्तिमत्व इतके गुंतागुंतीचे आणि बहुरंगी आहे की इतकी वर्षे शोध घेऊनही त्यांना स्वतःच्याच अंतराचा थांग लागला नाही. शब्दांना हताशी घेऊन त्यानी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला; पण कामूच्या शब्दात

त्यांनी ती एक स्वत: विरुद्धच केलेली हिंसक कृती वाटते. लिहिण्याच्या कृतीनेही ते घायाळ होतात कारण त्यात स्वत.ची परखड चिरफाड करावी लागते; पण हे आत्मचरित्र वाचताना उलट बेडेकर स्वत:चे समर्थनच करताहेत अशी नकळत प्रतिक्रिया होते.

' मी एस्. एम्. हे श्री. एस्. एम्. जोशी या ज्येष्ठ, वयोवृद्ध समाजवादी नेत्याचे आत्मचरित्र कॉन्टिनेन्टलने प्रसिद्ध केले आहे. हा एक दीर्घ प्रवास आहे. नजिकच्या भूतकाळातील अनेक ऐतिहासिक घटनांना साक्षीदार असे हे जीवन आहे. प्रत्यक्ष अनुभवलेले भोगलेले हे घटना–प्रसंग गेल्या ७०–८० वर्षातला इतिहास जिवंत करतात. स्वातंत्र्यासाठी राजकारणाच्या मैदानात ते उतरले आणि नंतर सामाजिक जीवनातही ओढले गेले. तो काळच भारलेला होता. स्वातंत्र्य सग्रामात स्वेच्छेने उडी घेणे हे प्रत्येकच तरुणाचे पवित्र कृत्य होते. त्यापासून कोणीही वंचित नव्हते.

आपल्या विचारसरणीची घडण कशी झाली ते सांगताना श्री. एस्. एम्. जोशी म्हणतात, ' सर्व जातीबद्दल प्रेम आणि कळवळा हा प्रथमपासून मनात नव्हता. ब्रिटिशांना घालवण्यासाठी एकजूट झाली पाहिजे एवढीच जाणीव मनात होती. हिंदुराष्ट्रवादाचा पगडा मनावर होता; पण युसुफ मेहेर अलीशी भेट झाली आणि हिंदुराष्ट्रवादाचे मळभ दूर झाले.' 'टिळक, आगरकर, भगतसिंग, सुभाषचन्द्र बोस यांच्यामुळे सार्वजनिक जीवनात ते ओढले गेले. महात्मा गांधींचे नेतृत्व त्यांनी टिळकांच्यानंतर मानले पण महात्मा गांधींची तत्त्वे आणि कार्यक्रम त्यांना अपुरा वाटायला लागला. मात्र जीवनाला नैतिक अधिष्ठान गांधींनी मिळवून दिले आणि जयप्रकाश नारायण यांनी ते मजबूत केले अशी ग्वाही ते देतात आचार्य जावडेकर त्यांना गुरुस्थानी होते.

त्यांच्या वेळची तरुण पिढी समोरच्या घटनांना सामोरी कशी गेली त्याचे निवेदन करताना ते भूतकाळात हरवून जातात. आताच्या तरुण पिढीला आणि समाजाला जीवनमूल्ये नाहीत याची त्यांना खंत वाटते. त्यांची जीवनमूल्ये टिळक–सावरकरांनी घडवली. अंतरात ध्येयाची ठिणगी होती. *आजच्या तरुणांना एक मोलाचा मार्ग ते* दाखवतात. ते म्हणतात, आजच्या तरुणांनाही चांगले ध्येय बाळगायला वाव आहे. गोरगरिबांपर्यंत मिळालेले स्वातंत्र्य नेऊन पोचवण्याचे कार्य तरूणानी हाती घ्यावे. त्याकाळी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी जो भारलेपणा आला होता, तसाच तो स्वातंत्र्य वाहून नेतानाही येईल, तरुणांना चांगली प्रेरणा मिळेल असा त्याना विश्वास वाटतो. श्री. एस्. एम्. यांनी भोगलेले अनेक तुरुंगवास, भारत छोडो आंदोलन, त्यानंतरचे भूमिगत जीवन, राष्ट्रसेवादल, सयुक्त महाराष्ट्र चळवळ, कॉंग्रेस*मधून समाजवादी पक्षाची वेगळी स्थापना*, आणीबाणी, जनता सरकार अशा भरगच्च घटनामय जीवनाची कहाणी सागणारे हे आत्मकथन प्राजळपणे केलेले आहे.

## आव्हान, अनुभव, कृष्णाकाठ

काही वेळा सामान्य माणसांची आत्मचरित्रे देखील वाचनीय ठरतात, चटका लावून जातात आणि सामान्यत्वात असामान्यत्व दाखवून जातात. श्री. ह्. शं. देशपांडे याचे ' आव्हान ' हे आत्मचरित्र ( श्री. रा. ज. देशमुख प्रकाशन ) वाचून या गोष्टीची प्रचीती येते. ही एक जगावेगळी आणि प्रामाणिक आत्मकहाणी आहे. आपले सगळे दोष श्री. देशपांडे यांनी मोकळेपणाने मान्य केले आहेत. कल्पनाही करता येणार नाही असे दारुण जीवन त्यांच्या वाटघाला आले. देशपांडे यांचा जन्म परभणीत श्रीमंत कुटुंबात झाला. सुदर मुलीशी त्याचे लग्नही झाले. लग्नानतर थोड्याच दिवसानी ते एका देवळात कीर्तन ऐकत बसले असता मदिर कोसळले. ढिगाऱ्याखाली ते गाडले गेले आणि कमरेखालचा भाग कायमचा अधू झाला. सगळे उपचार झाले. शेवटी आपले नशीब म्हणून त्यांनी आपले अपंगत्व स्वीकारले. अत्यत दारुण जीवन वाटघाला आले. नियतीने जीवनाशी क्रूर खेळ केलेला. या आत्मचरित्रात एक अद्भुत, दाहक आणि हृदय पिळवटून टाकणाऱ्या सत्याचे दर्शन घडते. आत्मचरित्राला शैलीचे अवडबर नाही. दु:खाचा जो डोगर श्री. देशपाडे याच्यावर कोसळला, त्या दुःखाचा ध्यासच कथारूप बनला. सत्याला सुखापेक्षा दु.खाचे कोंदण मिळाले तर ते जास्त सुदर दिसते तसे इथे झाले आहे. ही जशी श्री. देशपाडे यांच्या दु:खाची कथा आहे, तशीच ती त्याच्या *पत्नीच्या तपस्येची कहाणी आहे.* ' तरुण वयातच तिच्यावर जे कोसळले, ते तिने शातपणे सोसले. पती–पत्नी हे जीवन कसे जगले असतील याचे कुतूहल वाटते; पण तिने एक व्रत अंगिकारले होते. पतीची सेवा हेच तिचे जीवन बनले होते. आजच्या युगात तिचे पातिव्रत्य आणि सस्कृती मूल्याना जपणारी ही आदर्श पत्नीच ठरावी. तिचा मूक त्यागच बोलका आहे.

डॉ. सुलोचना सोमण यांचे आत्मचरित्र ' अनुभव ' या नावाने त्यानी प्रकाशित केले आहे. आपले आयुष्य चारचौघीसारखे गेलेले नाही, *या जाणिवेतून* सुलोचनाबाईंनी हा वृत्तांत लिहायला घेतला. वैयक्तिक जीवनातले आणि वैद्यकीय जीवनातले अनुभव त्यांनी पुरेशी अलिप्तता ठेवून रेखाटले आहेत. पुण्यातल्या हुजूरपागा शाळेने स्त्रियांच्या किती तरी पिढ्या घडवल्या. त्यापैकी एका पिढीचे प्रतिनिधित्व करणारे हे आत्मचरित्र. डॉ. सोमण यांचे शालेय शिक्षण इथेच झाले. हे आत्मकथन वाचल्यावर एक गोष्ट लक्षात येचे की, कर्तबगारीची स्वतंत्र वाट चोखाळणाऱ्या स्त्रियांचे ससार विस्कटलेले असावेत या कटु सत्याचे दर्शन घडवणारा तो एक जिवंत अनुभव आहे.

सुलोचनाबाई अमेरिकेतून डॉक्टर होऊन आल्या स्वत: डॉक्टर असूनही त्यांच्याशी अनेक व्याधींनी मैत्री केली होती. शारीरिक दु:खे सहन करत त्यांनी जी मजल मारली ती, कौतुक करण्यासारखी आहे. स्त्रियाच्या आत्मपर लिखाणात या आत्मचरित्राने चागली भर घातली आहे. त्याना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असल्याने, स्त्रियांच्या इतर आत्मपर लिखाणाप्रमाणे ते पतीचे चरित्र या स्वरूपाचे झाले नाही हे विशेष.

एक अतिशय महत्त्वाचे आत्मचरित्र कै. श्री. यशवंतराव चव्हाण याचे ' कृष्णाकाठ'– खड पहिला. पुण्याच्या प्रेस्टिज प्रकाशनने ते प्रसिद्ध केले. या आत्मचरित्राबद्दल जास्त *लिहिण्यापेक्षा ते मुळातून वाचणे* हा एक आल्हाददायक आनद आहे. कारण ते एका रसिक, कसदार आणि समृद्ध व्यक्तिमत्त्वाचे आत्मकथन आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपपंतप्रधान, परराष्ट्र मत्री, विरोधी पक्षनेते आणि आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष अशी अनेक राजकीय पदे त्यानी भूषविली. ही त्यांची अगदी उघड ओळख; पण यशवंतराव

म्हणजे केवळ एवढेच नव्हे. ते उत्तम वक्ता होते, आदर्श वाचक होते, गुणी साहित्यरसिक होते, सहकार आणि उद्योगांना उत्तेजन देऊन महाराष्ट्राचा कायापालट घडवून आणणारे आणि घरोघरी हवेसे वाटणारे लोकनेता होते आणि सर्वात महत्त्वाचे, खरे माणूस होते. या सर्वांचे भावोत्कट रम्य दर्शन या आत्मचरित्रातून घडते. राजकीय व्यक्तिमत्त्व ठसठशीत असल्याने त्यांच्या राजकीय विचारांचा मागोवा, स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील भारताच्या राजकीय इतिहासाचा सूक्ष्म परामर्ष, राष्ट्रीय नेत्यांच्या विचारसरणींचा परिचय या सर्वांचे मनोहारी दर्शन 'कृष्णाकाठ'च्या पहिल्या खंडातून घडते.

□

**विशेष साहित्य प्रकारातील काही पुस्तकांचा आढावा घेणारं हे सदर अधूनमधून प्रसिद्ध होईल.**




## श्रेष्ठ कलेच्या ओढीतून....

बाबूराव जोशी हे शास्त्रीय संगीतातले जाणकार, रसिक आणि संगीतविषयक अनेक उपक्रम तळमळीने केलेली व्यक्ती म्हणून सर्वांना परिचित होते. दुर्दैवाने नुकतंच त्यांचं निधन झालं. कोल्हापूरच्या देवल क्लबचे ते वर्षानुवर्षे अध्यक्ष ! त्यांनी संगीतविषयक खूप कार्य तिथे केलं, गावोगावी प्रात्यक्षिकांसह व्याख्यानं दिली. संगीतविषयक ग्रंथ लिहिले. पाश्चात्यांना भारतीय संगीताचा परिचय करून देण्यासाठी इंग्रजीतही ग्रंथ लिहिले. बालसंगीताच्या ध्वनिमुद्रिका काढल्या. व्यवसायाने वकील व संगीतसृष्टीत रमलेला हा माणूस आपली या क्षेत्रातली मुशाफरी वर्णन करतोय. बाबूरावांनी असंख्य बुजुर्गांच्या मैफिली ऐकल्या, अनेक थोर कलावंतांना जवळून पाहिलं, आनंददायी सोहळे घडवून आणले, या सगळ्याचा उतारवयात पुनः प्रत्यय घेण्यासाठीच जणू हे पुस्तक लिहिलंय् !

या पुस्तकात चार विभाग आहेत आणि 'इतस्ततः'मध्ये काही संस्मरणीय प्रसंग, रोमांचकारी अनुभव सांगितले आहेत. सुरुवातीच्या भागात स्वतःच्या संगीत शिक्षणाबद्दल लिहिलं आहे. पद्धतशीर, बरीच वर्षे एकाच गुरूकडे असं शिक्षण बाबूरावांनी घेतलेलं नाही. गायनात आपली गती नाही हे काही काळाने लक्षात आलं; पण संगीताची ओढ मात्र होती. ऐकून ऐकून समज आली. ज्ञान वाढलं आणि मग संगीताचं रसग्रहण करणं, प्रौढसंगीत, बालसंगीत यात प्रयोग, प्रात्याक्षिकं करणं, साहित्य आणि संगीत यांच्या परस्पर संबंधांचा परामर्ष घेणं, लावणी संगीताचा विचार करणं या साऱ्याच विषयांना त्यांनी आत्मविश्वासाने स्पर्श केला. तमाशापरिषदेचं आमंत्रण आलं असताना ते नाकारायचं असं ठरवलं पण आचार्य भागवतांनी प्रोत्साहन दिलं, ग्रंथांची नावंही सुचवली. हे आव्हान स्वीकारा असं सांगितलं आणि मग मनोभूमिका अनुकूल झाली असं वर्णन लेखकाने केलं आहे. हा तपशील पुस्तकात दोन वेळा आला आहे ही पुनरुक्ती सहज टाळता आली असती. गोविंदराव टेंबे, बालगंधर्व इ. संगीत क्षेत्रातली श्रेष्ठ व्यक्तींवर छोटे लेख या पुस्तकात आहेत त्याचप्रमाणे आचार्य भागवत, जे. पी. नाईक, पु. ल. देशपांडे यांसारख्या कर्तृत्ववान व्यक्तींवरही आहेत. शास्त्रीय संगीताच्या मैफिलीत बालगंधर्व प्रभाव पाडू शकले नाहीत पण केशवराव भोसले मात्र प्रभाव पाडू शकले अशी स्पष्ट आणि धीट नोंद लेखकाने केली आहे. आचार्य भागवतांच्या बोलण्यात करुणावृत्तीचा गौरव असे पण स्वतःच्या वागण्यात मात्र करूणा नव्हती उलट भावनिक प्रश्नही ते बौद्धिक पातळीवरून सोडवू पहात असे सूक्ष्म विश्लेषण लेखकांनी केले आहे. अर्थात या सगळ्याच व्यक्तींच्या कर्तृत्वाचा मोकळ्या मनाने गौरव केला आहे त्यांच्या सहवासाचा त्यांना जो लाभ मिळाला. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. यात लेखकाच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो. पु. ल. देशपांडे आणि ग. दि. माडगूळकर यांच्यासंबंधीची एक गमतीदार आठवण यात सांगितलेली आहे. हे उभयता एकदा लेखकाच्या घरी आलेले असताना लेखकानी त्यांच्या वडिलांशी ओळख करून दिली. तेव्हा त्यांनी प्रश्न केला, 'काय करतात हे दोघे ?' स्वतःच्या प्रसिद्धीबाबत कुणीही कधी भ्रमात राहू नये हे दर्शवणारा हा एक किस्सा ! कुमारगंधर्वांच्या नावीन्याचा सोस आणि किशोरी आमोणकरांचा लहरीपणा यावर लेखकानी नेमके बोट ठेवले आहे. अर्थात या कलाकारांचे अनन्यसाधारणत्व मान्य करूनच !

संगीताच्या क्षेत्रात लेखकाने केलेले उपक्रम, संस्मरणीय मैफली, व्यक्ती संगीतकेन्द्रे यासंबंधीची माहिती या पुस्तकात मिळते, पण एकूण या पुस्तकाचे स्वरूप फुटकळ, त्रोटक, संकीर्ण असे आहे. सरळसोट निवेदन आणि माहिती यामुळे, ज्यांनी तो काळ पाहिला आहे त्या व्यक्तींच्या आठवणींना उजळा मिळेल पण त्यांना किंवा नवीन पिढीला लोकोत्तर कलाकारांच्या गायनाची धुंदी अनुभवता येईल, मैफिली दृष्टिगोचर होतील असे रसीलेपण या लिखाणात नाही. अर्थात हे काही एखाद्या साहित्यिकाचे लेखन नाही; पण थोड्याफार प्रमाणात जरी उत्कटता, भाषेतला गोडवा समरसलेपणा यात आला असता तर लेखकाचे या क्षेत्रातील संचित प्रभावीपणे वाचकांपर्यंत पोचले असते. अशा प्रकारच्या लेखनात 'मी'ला केन्द्रस्थान समजू शकते पण 'मीपणा' थोडा बाजूला गेला तरच लिखाणाची उंची वाढते. एक निश्चित की, लेखकाने 'एक हौशी' या नात्याने केलेले संगीत क्षेत्रातले कार्य महत्त्वाचे आहे. त्यांनी प्रांजळपणे कबूल केले आहे की मी जे काही करू शकलो ते ज्ञान, हौस, तळमळ यावरोबरच गाठीशी पैसा होता म्हणून करू शकलो. हा प्रामाणिकपणा खरोखरच दुर्मिळ आहे. पण नुसती पैशांची श्रीमंती काही करू शकत नाही हे तितकंच खरं. ही मुशाफिरी घडली ती संगीतासारख्या श्रेष्ठ कलेची ओढ होती, त्या कलेची श्रीमंती ज्ञात होती म्हणूनच ! वाचकांना जुन्या काळच्या संगीत सृष्टीतील वातावरणात घेऊन जाणारं हे लिखाण वाचनीय ठरतं ते या श्रीमंतीच्या दर्शनामुळे !

—मेधा सिधये

माझी मुशाफरी
बाबूराव जोशी
अजब पुस्तकालय, कोल्हापूर
पृष्ठसंख्या : १३९, मूल्य : २५ रु.

## माहिती–मनोरंजन

प्रवासवर्णनपर अशा २१ लेखाचा संग्रह असलेलं 'पृथ्वीच्या पाठीवर' हे एक वाचनीय पुस्तक आहे.

लेखकाने प्रस्तावनेत लिहिल्याप्रमाणे हे प्रवासवर्णनपर व माहितीपर पुस्तक लिहिण्यामागे त्याचे 'वाचकांचे शिक्षण व ज्ञानार्जन, मनोरंजन, तरुणांत साहस आणि प्रवासाची आवड यांची निर्मीती आणि विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त, असे जे उद्देश आहेत ते बहुताशी सफल झालेले आहेत. यातील बहुतेक लेख पूर्वी प्रसिद्ध झालेले असले तरी ते वाचलेल्या वाचकांना सुद्धा एक उपयुक्त आणि माहितीपर पुस्तक म्हणून सग्रही ठेवण्याजोगे हे पुस्तक आहे.

वाचकांना हसवणारी वाक्ये वा प्रसग यात फारसे आढळत नाहीत. तरीही सोप्या भाषेतील हे लेख, लेखांचे संकलन करण्यातला थोडा विस्कळीतपणा सोडला तर वाचकांना सहज रुचतील व त्याचे औत्सुक्य टिकवतील असे वाटते.

पुस्तक वाचत असताना अनेकदा मनात भारतीयाची आणि पाश्चिमात्यांची तुलना होते.

लेखकाला 'न्यूयॉर्क स्टेटमध्ये' मोटार हाकण्यासाठी परवाना हवा होता. लेखकाचा कुठेही वेळ वाया न जाता तो त्याना मिळाल्यामुळे लेखक म्हणतात, 'सर्व काही फॉर्मवर भरलेले असतानाही मला उगीचच कोणी माझे व माझ्या बापाचे नाव विचारले नाही की दुसऱ्यांदा ऑफिसचे खेटे घालायला सांगितले नाही. (पृष्ठ ३) वरील वाक्य वाचल्यानंतर, दुसऱ्याच्या वेळेच्या किमतीबाबत इतकी जागरुक असणारी तिथली माणसं आणि दुसऱ्याच्या सोडाच पण स्वतःच्याही वेळेचं भान नसणारी आम्ही माणसं.' अशी साहजिकच मनात तुलना होते.

पश्चिम कॅनडाच्या अल्बर्टा राज्यातील कॅलगरी या शहराची अगदी थोड्या अवधीत झपाट्याने झालेली प्रगती पाहून लेखकाने या शहराला, 'एका रात्रीतून निर्माण झालेली नगरी' असे संबोधले आहे. एवढ्या संपन्न शहराचे वर्णन करताना लेखकाने तिथल्या नैतिक अधोगतीचेही भेदक वर्णन केले आहे.

इथे १५ ते १९ वर्षांच्या ३ मुलींपैकी १ लग्नाआगोदरच गरोदर असल्याचे आकडे मिळाले आहेत, वेश्याव्यवसायालाही गती मिळाली आहे. ह्याचा प्रत्यय 'एस्कोर्ट सर्व्हिस' (सोबत) ह्यात येतो. 'तुम्ही एकटेपणाला कंटाळला असल्यास अगर कॅलगरीत तुम्ही नवीन असल्यास सुदर तरुण वा तरुणी 'एस्कोर्ट' (सोबत) म्हणून मिळेल.' व त्यासंबधीच्या साप्ताहिक, मासिकातून हमखास आढळणाऱ्या जाहिराती, त्याचे फोन क्र. वगैरे (पृष्ठ : ४८)

असं काही वाचल्यानतर संपन्नता कशावर मोजायची याला च का विकास म्हणायचं, कोणाला संपन्न म्हणायच? असे प्रश्न लेखकासारखेच आपल्याही मनात येतात.

पाश्चात्यांच्या नैतिक जीवनाबद्दलचे अत्यत विरळपणाने आणि सयमितपणे आलेले उल्लेख वगळता, विद्यार्थ्यांना अवांतर वाचनासाठीही अत्यंत उद्‌बोधक असे हे पुस्तक आहे. विशेषत: 'इग्लिश विद्यार्थी सुट्टी कशी घालवतात?' हा लेख (पृष्ठ ५६ ते ६१) विद्यार्थ्यांना उपयुक्त तर आहेच; पण पालक व समाजालाही मार्गदर्शक ठरावा.

इथे, सुट्टयामध्ये काही सस्था लोकोपयोगी कामे, म्हणजे पुराने पडलेल्या इमारती बांधणे, निर्वासिताची व्यवस्था लावणे, अशी कामे काढतात आणि ती ऐच्छिक ठेवतात. समाजसेवेची आवड असणारे विद्यार्थी ही कामे आवडीने करतात व कामेही होतात. 'आपल्याकडे ग्रामसुधारणेसाठी अशाप्रकारच्या संस्थांचा खात्रीने चागला उपयोग होईल.

दर मे महिन्यात आपल्याकडे श्री. बाबा आमटे ह्यांच्या नेतृत्वाखाली आनंदवनात भरणाऱ्या 'श्रमसंस्कार छावणी' या मेळाव्यांसारखे मेळावे तेथे सर्रास भरतात. भारतातही अनेक ठिकाणी अशा मेळाव्यांची संख्या वाढवावी व ती कल्पना राबवावी.

या पुस्तकाची भाषा सोपी असली तरी भाषेचे जे सौंदर्य म्हणतात ते काही ठिकाणी संधी असूनसुद्धा लेखकाला साधलेलं नाही. न्यूयॉर्कमधल्या फॉलचे (पानझडीचे) पृष्ठ १२१ वर्णन करताना एका वाक्यात लेखकाने, 'हिरव्या, पिवळ्या व ताम्ररंगाच्या वेगवेगळ्या प्रमाणात मिश्रणाच्या छटा निर्माण झालेल्या असतात असे वर्णन केले आहे.' यात प्रमाण, मिश्रण हे रसायनशास्त्रातले शब्द वापरण्याऐवजी दुसरे भाषेचे सौंदर्य वाढवणारे शब्द वापरले असते तर फॉलचे सौंदर्य अधिकच खुलले असते.

काही ठिकाणी मुद्रणाचे दोषही आढळतात.

अपरिचित शब्दांचे अर्थ कसात दिलेले असल्यामुळे काही समजले नाही असे होत नाही. चिचेचे 'टॅमरिंड' हे इंग्रजी नाव कसे पडले याची कहाणी तर 'थँक्यू' व 'गुडबाय' याअर्थी 'ग्रेस्तियास' व 'एडियोस' हे स्पॅनिश भाषेतील शब्द व यासारखाच आणखीही काही शब्दामुळे भाषेच्या नाविन्यामुळे थोडीशी गंमत वाटते.

न्यूयॉर्कमधील जगप्रसिद्ध 'ब्राँक्स' या प्राणीसंग्रहालयाची माहिती देताना जगातल्या हरतऱ्हेच्या पशुपक्ष्यासाठी त्याना अनुकूल असं नैसर्गिक वातावरण निर्माण करताना कलावंतानी दाखवलेल्या चातुर्याचे व प्राणिशास्त्रज्ञाच्या निरीक्षण शक्तीचे खरोखरच आश्चर्य व कौतुक वाटते. या साऱ्याचे हुबेहूब वर्णन करण्यात लेखकाला यश आले आहे.

लेखाच्या सग्रहाचे हे पुस्तक असल्यामुळे क्वचित प्रसंगी वर्णनात तोचतोचपणा, पुनरुक्ती आली आहे.

पुस्तक वाचत असताना लेखकाची सूक्ष्म निरीक्षणशक्ती, चिकाटी, अभ्यासू वृत्ती, धाडस, उत्साह अशा लेखकाच्या स्वभावाच्या अनेक पैलुचा प्रत्यय येतो.

फॉरिनचे आकर्षण वाटणाऱ्या भारतीयांना आपण दुसऱ्याच्या नको त्या गोष्टी उचलून चांगल्याकडे कशा सायस्करपणे पाठ फिरवतो याचा विचार करावयास सहाय्य करणारे हे पुस्तक आहे.

—छाया कुलकर्णी

पृथ्वीच्या पाठीवर
लेखक : शकरराव पोतदार
श्रीविद्या प्रकाशन
पृष्ठे : १२२
मूल्य : वीस रुपये

## ऐलमा पैलमा, शिक्षण देवा

लीला पाटील

# घाणेरड्या गाण्याची गोष्ट

नाफडे सर रजेवर होते. वर्गाच्या मॉनिटरने मुख्याध्यापकांना जाऊन सांगितले की, आमच्या वर्गावर नाफडे सरांचा तास आहे. मुख्याध्यापकांनी मुलांना गाण्याच्या भेंड्या लावायला सांगितले. मॉनिटर पळत पळत आला आणि त्याने मोठ्या आनंदाने ही बातमी वर्गाला सांगितली. श्लोक, कविता, चित्रपटातील गाणी, भावगीते यांच्या फैरी झडू लागल्या. वर्गाचे चार गट होते. प्रत्येक गटातील मुले आपल्यावर भेंडी लागू नये म्हणून अहमहमिकेने गाणे सुचवत होती, म्हणत होती, एकमेकांना मदत करीत होती. एका गटाला 'श' अक्षर आले आणि काही केल्या त्या गटातील कोणाला 'श'ने सुरू होणारे गाणे आठवेना. इतक्यात गटातला एक मुलगा अनुपला म्हणाला, 'ए, अनुप, म्हण ना ते 'मंदतारा', सूचना ऐकताच अनुपला गाणे आठवले. त्याने गाणे सुरू केले.


'शुक्र तारा, मंद वारा
चांदणे पाण्यातुनि
चंद्र आहे, स्वप्न वाटे
धुंद या गाण्यातुनि
आज तू डोळ्यात माझ्या
मिसळुनी डोळे पहा
तू अशी जवळी रहा!'

गाणे अगदी रंगात आले होते. इतक्यात पलीकडच्या वर्गातून गवाळे सर तरातरा वर्गात शिरले आणि ओरडले, 'कोण म्हणतंय ते घाणेरडं गाणं, बंद करा ते! असली घाणेरडी, चहाटळ गाणी शाळेत नाही म्हणायचो.' विजेचा लोळ खाली येत असता पाहिल्यावर माणूस जसा स्तंभित होतो तसा सारा वर्ग गवाळे सरांचा तो क्रोधाविष्कार, ते हातवारे तो तारस्वर पाहून स्तंभित झाला होता. रागारागाने वर्गात आलेले गवाळे सर रागारागानेच बाहेर गेले. वर्गातल्या मुलांचा 'मूड' ही गेला. सारी मुले खाली माना घालून काहीबाही वाचत बसली. यथावकाश घंटा झाली आणि शाळेचे नेहमीचे कामकाज सुरू झाले....

अनुप हा माझा छोटा दोस्त. त्याच्या माझ्या गप्पा नेहमी चालतात. म्हातारपण म्हणजे काय? झाडाचे फूल तोडल्यावर झाडाला काय वाटते? कलिंगड लाल का असते? काही पेरू लाल व काही पांढरे का असतात? अशी अनेक प्रश्नांची सरबत्ती माझ्यावर चालू असते. या सरबत्ती बरोबरच त्याचे बाबा त्याच्या भावाला व बहिणीला सारे काही देतात व त्याला काही देत नाहीत याबद्दलची तक्रार बिनदिक्कतपणे मांडली जाते. 'तुमचे केस मला फार आवडतात पण तुमचे नाक फारच छोटे आहे' अशीही शेरेबाजी होते. अनुपचा माझ्यावर फार विश्वास. कुठलीही तक्रार माझ्यापुढे मांडायला त्याला इतराज वाटत नाही. शाळेत घडलेला प्रसंगही त्यामुळेच माझ्यापर्यंत पोचला. घरात आल्या आल्या त्याने मला विचारले, 'घाणेरडे गाणे म्हणजे काय हो?' घडलेला प्रसंग मला काहीच माहीत नसल्याने मी चटकन काही उत्तरच दिले नाही. 'हे शब्द तू कोठे ऐकलेस? कोण असे म्हणाले?' असे प्रश्न मी त्याला विचारले. हळूहळू सारे काही मला समजले.

एका शाळेत घडलेला क्षुल्लक प्रसंग तो काय आणि त्याबद्दल एवढे सारे लिहायचे ते काय? मला स्वतःला मात्र हा प्रसंग क्षुल्लक वाटत नाही. शिक्षणसंस्थांमार्फत मूल्यशोधन व मूल्यसंवर्धनाची प्रक्रिया विकसित होते असे मानावयाचे असेल तर हा प्रसंग फार महत्त्वाचा मानावा लागेल. 'घाणेरडे' हे एक नकारात्मक मूल्य आहे. गाण्यासारख्या सुंदर बाबीला ते लावल्यामुळे गाणेही घाणेरडे झाले. मी अनुपला विचारले, 'तू काय काय घाणेरडे पाहिले आहेस?' अनुपबाबा तत्काळ उत्तरला, 'घाणेरडे औषध, घाणेरडे अस्वच्छ कपडे–साचलेला कचरा' इतक्या लहान वयाच्या मुलांशी मूल्यासंबंधी तात्त्विक चर्चा करून काही उपयोगच नव्हता. घरातली बाजाची पेटी पुढे ओढून मी ते गाणे त्याला वाजवून दाखविले. योग्य स्वरांची गुंफण केल्याने गाणे सुंदर होते आणि म्हणताना स्वर चुकला किंवा विसंगत सूर त्यात मिसळले किंवा लय चुकली की गाणे घाणेरडे वाटते हे त्यानेच मला सांगितले. अनुपला मी म्हटले, 'गाणे म्हणताना असाच सूर तू सोडला असशील म्हणूनच गवाळे सर म्हणाले असतील की तू घाणेरडे गाणे म्हणू नकोस.' एखाद्या मर्मबिंदूला धक्का लागावा त्याप्रमाणे अनुप तावातावाने म्हणाला, 'आमच्या ताईचं हे फार आवडतं आहे आणि आमच्या घरी त्याची रेकॉर्डसुद्धा आहे. रेकॉर्ड ऐकून ऐकूनच मी ते शिकलो आहे. मी म्हणून दाखवू का वर्गात कसे म्हणालो तो?' अनुपचा एकूण आवेश पाहून मला समजले की, अनुप बेसूर झाला नसणार.

गवाळे सर एका विशिष्ट संस्कारात वाढलेले आहेत. रामदास स्वामी, तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर यांची काव्यरचना विद्यार्थ्यांनी म्हणावी म्हणजे त्यांच्यावर 'चांगले' संस्कार होतात असे त्यांना वाटते. पण अभंग लिहिणाऱ्या एकनाथानीच 'वारियाने कुंडल हाले। डोळे मोडीत राधा चाले।' ही काव्यरचना केली हे नको का त्यांच्या लक्षात घ्यायला? प्रेमभावना इतकी वाईट असती तर राधाकृष्णावर इतकी गाणी वर्षानुवर्षे लोकांनी इतक्या आवडीने कशाला म्हटली असती? बरेचदा शाळेतल्या मुलामुलींच्या मनात त्यांना अभिप्रेत नसणाऱ्या गोष्टी आपण कोंबीत असतो. 'तू असा जवळी रहा', 'तू माझ्या डोळ्यात पहा'– असल्या ओळी शाळेतून हद्दपार केल्या पाहिजेत असा आटापिटा का? तू माझ्याजवळ रहा असे मित्र–मैत्रीण एकमेकाला म्हणणार नाहीत का? त्यात पाप कसले? आणि समजा त्यात काही हीन आहेच असे मानले तर, 'कोपऱ्याकोपऱ्यावर' 'ढगाला लागलेली कळ' आणि 'चालणारी सखू' तुम्ही कोठवर थोपवणार? त्यापेक्षा घाणेरडे गाणे म्हणजे बेसूर गाणे, बेताल गाणे हे



मूल्य आपण शिक्षणसंस्थांमार्फत मुलांपर्यंत नेण्याचा प्रयत्न करणे इष्ट नव्हे काय ? प्रौढ आणि मुले यांच्यात एका पिढीचे अंतर असल्याने प्रौढांना ज्या प्रकारचे संगीत आवडते, जी गाणी आवडतात ती वाढत्या वयाच्या मुलांना आवडतीलच असे नाही; परंतु संगीतातील मूलभूत बाबी म्हणजे स्वर आणि लय. संगीतात लय आणि स्वर यांच्याशी इमान राखले तर ते घाणेरडे ठरणार नाही. गाण्यातील घाणेरडेपणा त्यातील शब्दांपेक्षा स्वर आणि लय यांच्यामध्ये मुख्यत: सामावलेला असतो.

शाळेत घडणाऱ्या कितीतरी लहान-सहान बाबी मूल्यसंवर्धनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असतात. नुकतीच घडलेली एक घटना माझ्या मनावर अगदी कोरल्यासारखी आहे. आमच्या महाविद्यालयामार्फत एका प्रशालेतील इ. ६ वी च्या मुला-मुलीचे तीन दिवसांचे एक शिबीर नुकतेच पार पडले. शिबिराच्या ठिकाणी मुले–मुली संध्याकाळी पोचली. ‘ मुलींनी रात्री कोठे झोपावयाचे ?’ एक पृच्छा आली. ‘मुले-मुली आपापल्या गटात झोपतील.’ काहीतरी विपरीत आपण ऐकतो आहोत असे काही मंडळींना वाटले; पण मला आता तुम्हीच सांगा की, दिवसभर एकत्र काम करणाऱ्या, गाणे म्हणणाऱ्या मुला-मुलींना फक्त रात्रीपुरते वेगवेगळ्या ठिकाणी झोपायला लावायचे हे किती चमत्कारीक ! मूल्यसंवर्धनाच्या दृष्टीने किती हानीकारक ! गेली दोन वर्षं या मुला-मुलींबरोबर काम करताना लिंगभेदाच्या भिंतीनी ती एकमेकांपासून दुरावणार नाहीत याची कटाक्षाने काळजी घेतली गेली होती. ‘रात्री मुलींनी कोठे झोपायचे ?’ हा प्रश्न जरी अचानक विचारला गेला असला तरी त्याबद्दलचे उत्तर देणाऱ्यांच्या मनात ते आधीच तयार झालेले होते. अंधार, मुलगा, मुलगी या तीन बाबी निगडीत करणे म्हणजे काहीतरी घाणेरडे, चहाटळ, अशुभ, अश्लील आहे या कल्पनेचे पहिले बीजारोपण कदाचित आम्ही त्यांना वेगळे झोपायला लावले असते तर झाले असते. आपल्या मुली आपल्याला पडद्याआड ठेवायच्या असल्या, त्यांना सूर्याचा किरण स्पर्शू द्यावयाचा नसला, पुरुषांचा वारा लागू द्यावयाचा नसला व त्यांनी खाल मानेने सारे काही सोसावे अशी आपली अपेक्षा असली तर मुला-मुलींनी एकत्र काम करावे असे ज्याप्रमाणे म्हटले जाणार नाही त्याप्रमाणे मुला-मुलींनी गटागटाने झोपावे असेही म्हटले जाणार नाही; परंतु एका नव्या जगाशी आणाभाका झालेल्या या उमलत्या मुला-मुलींना जुन्या मूल्यांच्या तटबंदीनी जखडून टाकावयाचे हे तर्कदुष्ट वाटले आणि म्हणूनच प्रश्न विचारताच मुले–मुली आपापल्या गटातच झोपतील असे सांगितले गेले. एका मूल्याच्या दिशेने मुला–मुलींची वाटचाल त्या प्रसंगाने झाली.

घाणेरड्या गाण्याप्रमाणेच माझ्या लहानपणातील आणखी एक प्रसंग मला आठवतो. सहावी-सातवीत असेन मी. एक दिवस शाळेतील मैत्रिणींच्याबरोबर क्रीडांगणावर फिरता फिरता तिचा पाय कचकन माझ्या पायावर पडला, ‘ रांडेची दुखले की मला !’ माझ्या तोंडून उद्‌गार बाहेर पडले. माझे उद्‌गार ऐकताच ती मुलगी म्हणाली, ‘ ए, शिव्या देतेस होय मला ?’ मी तिला कोणती शिवी दिली हेच मला समजले नाही. कारण ‘ रांडेची ’ हा शब्द माझ्या म्हाताऱ्या आजीने माझ्या संदर्भात कितीदा तरी वापरला होता! मुले शिव्या देतात, अलिकडील मुले बिघडली असे आपण म्हणतो. चांगल्या सुसंस्कृत घरातील अनेक मुले ‘आयला’ म्हणतात. त्यांच्या लेखी ती शिवी नसून तो एक सहजोद्‌गार आहे. मला तर वाटते की, मुलांना आपण वापरातल्या शिव्यांचा अर्थ स्पष्ट करून सांगितला तर ती मुले कदाचित शिव्या वापरणारही नाहीत !

चांगले आणि घाणेरडे, श्लील आणि अश्लील, सभ्य आणि असभ्य, उचित आणि अनुचित, योग्य आणि अयोग्य यासंबंधीच्या मुला–मुलींच्या सुयोग्य कल्पना विकसित होण्यास मदत करणे म्हणजेच संस्कार–म्हणजेच मूल्यविषयक शिक्षण. पण बरेचदा हे शिक्षण देणाऱ्यांचे शब्द व त्यांचे वर्तन यांच्यामध्ये जे अंतर असते ते वाढत्या वयाची मुले फार पटकन हेरतात. बुडणाऱ्या मुलाला वाचवले म्हणून बक्षीस मिळवलेल्या मुलाचे कौतुक करणाऱ्या वडिलांना त्याचा स्वत:चा मुलगा विचारतो, ‘बाबा, त्या दिवशी आपल्या घरासमोर आग लागली त्यावेळी आगीत अडकलेल्या छोट्या बाळाला आणायला मी धावलो तर तुम्ही मला पाठीमागे का ओढले ? गधड्या का म्हणालात ?’ मुलाचा प्रश्न अचूक वर्मावर बोट ठेवणारा आहे आणि त्यामुळेच तो वडिलांना नको आहे. ‘फार शहाणा झाला, जास्त बडबडू

नकोस.' असे फाडकन बोलून वडील मुलाला तोडून टाकतात. प्रश्न तोडून टाकता आला तरी मुलाच्या मनात निर्माण झालेली विचारांची साखळी तोडून टाकता येत नाही. 'सारे भारतीय माझे बांधव आहेत' हा प्रतिज्ञेतील भाग दररोज म्हणवून घेणाऱ्या बाई वर्गातील कुलकर्णी, भोसले, फडके, आपटे यांच्याशी मऊसूत बोलतात; पण कांबळे, म्हेतर यांना हिडीस–फिडीस का करतात हा प्रश्न आपण प्रौढ माणसे आपापल्या कृतीने मुलांच्या मनात निर्माण करतो. बरेचदा प्रौढांचे वर्तन 'Virtues by precept and vices by examples' असे असते. परंतु शब्दांचे डोंगरच्या डोंगर उभारून मुला–मुलींना त्या डोंगरात न दडलेल्या संस्काराचा उंदीर पोखरता येत नाही. वास्तव व संभव यातील अंतर तोडण्याचे सामर्थ्य संस्कारातून मिळते. हे सामर्थ्य मिळविण्यासाठी संस्कारानुकूल कृती प्रौढांकडून सातत्याने घडतात. असे झाल्यास विकासाभिमुख मुलामुलींत योग्य परिवर्तन घडण्याची शक्यता वाटते. तसेच सत्य, सौंदर्य, नीती इत्यादी विषयांचा प्रौढांचा विचार वरवरचा असला तरीही नवी पिढी आणि जुनी पिढी यांच्या मूल्यविषयक दृष्टिकोनातील तफावत वाढतच जाईल.

भावगीते म्हणण्याने मुली बिघडतात. शिव्या देणारी मुले वाईट असतात. वर्गात लक्ष नसणे म्हणजे उनाडपणा. अभ्यास सोडून 'इतर भानगडी' करणारी मुले व्रात्य असतात. मुलींशी बोलत उभे राहणे म्हणजे असभ्यपणा. वडिलधाऱ्या मंडळींना प्रश्न विचारणे म्हणजे बेमुर्वतपणा. धोपटमार्ग सोडून वागणे बरे नव्हे. असली साचेबंद समीकरणे मनाशी बाळगून नव्या पिढीला तथाकथितरीत्या सुसंस्कारीत करण्याची आशा बाळगणारे प्रौढ मुलामुलींच्या विकासाच्या मार्गात अडसरच निर्माण करतात. या संदर्भात कवी रॉबर्ट फ्रॉस्ट यांचे एक फार सुंदर वाक्य लक्षात ठेवण्यासारखे आहे– 'Most of the change we see in life is due to truths being in and out of favour.'

□

# गारांचा पाऊस

शोभा भागवत

## संस्कार

'आई, मी तुला काही तरी छोटासा प्रश्न विचारतो त्याचं तू नेहमी इतकं मोठं उत्तर का देतेस?' एका लहान मुलानं कुतुहलानं एकदा आईला विचारलं होतं.

दुसरी एक मुलगी मैत्रिणीला म्हणत होती, 'मी माझ्या आईशी कधी बोलण्याच्या फंदात पडतच नाही. ती काय बोलते ते फक्त ऐकते मी. तिच्याशी बोलायला लागलं तर खेळायला वेळच मिळायचा नाही.'

आमच्या मुलानंही एकदा बोलताना सांगितलं होतं की तुम्ही खूप भरभर बोलता आणि प्रश्न विचारता पण त्या प्रश्नाचा विचार करून उत्तर द्यायला आम्हाला जेवढा वेळ लागतो तेवढा तुम्ही देत नाही त्यामुळे आम्हाला काही बोलता येत नाही आणि मग तुम्हाला वाटतं आम्ही बोलत नाही.

मुलांशी बोलण्याची भाषा वेगळी असते तसा तिचा वेगही वेगळा असायला हवा आणि मुलांशी संवाद साधताना त्यांनाही वेळ जास्त द्यायला हवा हे आपण पालक बऱ्याचदा लक्षात घेत नाही.

निरक्षर मंडळींना शिकवण्याचं काम करताना, संवाद साधताना अनेक प्रसंग घडायचे. एखादी घटना कशी घडली हे सांगताना न शिकलेल्या बाया सांगतात– मी अशी रस्त्यानं चालले व्हते. रस्त्यानं चालते व्हते तर रस्ता काय घावंना. आता रस्ता घावंना म्हणतानं मग घाबरूनच गेले. मग म्या वाटायला लागलं. तसं म्हनलं आता इच्चारावं कुनाला तरी. कुनाला तरी इच्चारावं म्हनलं तर एक बाबा भेटला. आता भेटतोय की कुनी आपल्या भावासारका. खरं का खोटं? तर म्या म्हनलं हा आपल्या भावासारकाच म्हनायचा आन् त्याला पुशीलं. त्याला पुशीलं तर आमचा नवरा आला की मागून. नवरा आला मागून आन् त्यानं बघितलं बाबासंगं बोलतीया. बघितलं आन् मंग काय...

हे जेव्हा एखाद्या राधाबाय् नाही तर ठकूबाय् सांगतात तेव्हा असं लक्षात येतं की ही नुसती बोलण्याची शैली नाही हा आकलनाचा वेग आहे. तो वेग बोलण्यात येतो. त्यामुळेच बसमध्ये चढल्या चढल्या कंडक्टर जेव्हा चिमटा कट कट वाजवत ठकूबायला विचारतो, 'बोला, कुठं जायचं बोला लवकर' तेव्हा बसस्टॉपचं नाव पटकन् न घेता ठकूबाय् 'ह्या आपल्या तिथं म्होरं ते नाय् का– असं पुढे हात दाखवून बोलतात आणि कंडक्टर खेकसतो 'स्टॉपचं नाव सांग की मावशीबाय. ह्या आपल्या तिथं म्हंजे मी काय समजायचं?'

आपण नवीनच इंग्रजी बोलायला शिकतो तेव्हा असंच होतं. थोडं वेगळ्या कारणांनी. उत्तर काय द्यायचं ते मनात असतं पण ते आपल्या मातृभाषेत. त्याचं इंग्रजी भाषांतर करून बोलायचं तर वेळ लागतो. पटपट बोलता येत नाही.

मुलंही शब्द शोधत असतात. त्यांच्या मनातल्या विचारांना पण तेवढी सवड आपण त्यांना देत नाही आणि बोल पटपट, झटकन् उत्तर दे असा धोशा लावतो.

काही तज्ज्ञ माणसं असंही सांगतात की, मोठ्या माणसांनी उभं राहून खाली बघून छोट्या मुलाशी बोलणं हे फार अन्यायकारक आहे. त्या मुलाला बिचाऱ्याला मान मोडेपर्यंत वर मान करून पहात बोलावं लागतं. आपण असं कुणाशी बोलून पहावं गुडघे टेकून खाली बसून. किती मान दुखते ते समजतं आणि बोलूच नये असं वाटतं.

त्यामुळे लहान मुलाशी बोलताना नेहमी अक्षरशः त्याच्या पातळीवर जाऊन बोलायला हवं.

आपण मुलांशी काय बोलतो ते थोडं तपासून पहायचं ठरवलं तर बऱ्याचदा आपण निरर्थक बोलतो. शाळेत केलेलं भरतकाम मुलगी कौतुकानं दाखवायला आली तर 'कसं ग माझं शहाणं आहे ते' म्हणून तिचं कौतुक

करून तिला काय शिकवतो आपण ? ठीक आहे. तिनं केलेलं भरतकाम पाहून आपल्याला तिचं कौतुक वाटलं आहे हे कळतं; पण त्याऐवजी हे भरतकाम छान दिसतं आहे. रंगसंगती छान जमलीय् किंवा टाके अगदी सारखे आलेत असं काही म्हटलं तर भरतकामात कशाला महत्त्व असतं ते तिला समजेल. समजुतीत भर पडेल.

एखाद्या दिवशी घरकामात लक्ष घालून मुलानी केर काढला तर 'चला आता रखमावाईंना काढून टाकायला हरकत नाही. आमचा मुलगा चांगला केर काढायला लागला' असं बोलून नकळत आपण मुलाच्या उत्साहावर विरजण घालत असतो. मनात कौतुक असतं. पण तोंडानी भलतंच बोललं जातं. त्याऐवजी वा ! स्वत: काम केलं की कसं बरं वाटतं ना ? घर जास्त छान वाटतं असं म्हणून स्वत: काम करण्यातल्या आनंदाचा संस्कार आपण करू शकतो मुलावर. केर काढताना नुसता जमिनीचाच नाही तर कपाटांखालचा, दारामागचा, दाराच्या बिजागऱ्यांजवळ वरपर्यंतचा केरपण काढायचा असतो हेही समजावून देऊ शकू या निमित्तानं.

याचा अर्थ दर संधीला मुलाला भाषण द्यायचं, शिकवण्याचा चंग बांधून बोलून घ्यायचं असा नव्हे. पण 'संस्कार' हा जो काही मोठा शब्द आहे तो फक्त संध्याकाळी देवाजवळ दिवा लावून हात जोडून बसण्यानीच करता येतो असं नव्हे. ह्या छोट्या छोट्या प्रसंगांच्या निमित्तानं आपण जे बोलतो, जे करतो, जसं वागतो, त्यातून मुलांवर संस्कारच करत असतो. ते आपल्या नकळत घडत असतं. अशा संधी अनेकदा आपण फुकट घालवत असतो.

अर्थात स्वत:च्या बोलण्याच्या पद्धतीच्या सवयी बदलणं ही सहज सोपी गोष्ट नाही; पण निदान आपण जे बोलतो आहोत त्याचा काही वेगळा परिणाम मुलांच्या मनावर होतो आहे ह्या दुसऱ्या बाजूची जाण मनात जागी असली की बोलल्यानंतर तरी जाणवेल आपण बोलून, न बोलून खरं बोलून, चुकीचं बोलून काम साधलं आणि काय साधता आलं असतं ! निदान बोलण्याचा वेग कमी करणं, मुलांना बोलायला जास्त वेळ देणं, आपण त्यांचं जास्त मन:पूर्वक ऐकणं हे तरी लगेच करता येईल ! □

# रंगभूमी

## पोलीसनामा

वि. भा. देशपांडे

सारंग मंडळींच्या 'कलारंग' संस्थेने 'पोलीसनामा' हे नवे नाटक नुकतेच पेश केले आहे. लेखक आणि दिग्दर्शक आहेत शफाअतखान. आपल्या विविध एकांकिका लेखनाने आणि काही मोठ्या नाट्यलेखनाने शफाअतखान रंगभूमीच्या परिसरात परिचित आहे. अलिकडच्या काळात 'मुंबईचे कावळे' नाटकाने विशेष! पण तो या नाटकाच्या निमित्ताने व्यावसायिक रंगभूमीवर आलेला आहे. आपल्या लेखनात काहीना काही वेगळेपण ठेवणाऱ्या शफाअतने 'पोलीसनामा' नाटकाच्या संदर्भातही नावापासूनच वेगळेपण ठेवलेले आहे.

पण ते वेगळेपण केवळ नावातच नाही तर विषय आणि मांडणी यामध्ये आहे. सामान्यत: मराठी नाटकात येणारा पोलीस एकतर रहस्यमय स्तरावर येतो किंवा विनोदाच्या स्तरावर टवाळीच्या हिशेबात येतो. पण संपूर्ण पोलीसखात्याच्या कारभारावर प्रकाश टाकणारे नाटक सहसा पाहण्यात येत नाही. या नाटकात पोलिसांच्या कार्यालयीन 'कर्तृत्वावर' प्रकाशझोत टाकण्याचा यत्न आहे. एखादा गुन्हा घडल्यावर कोणीना कोणी गुन्हेगार पकडला जातो, त्यावर आरोप ठेवले जातात, चौकशी आरंभित होते, त्याचा यथास्थित छळही होतो. अशा काळातच त्या आरोपीने किंवा तथाकथित गुन्हेगाराने पोलीस चौकीच्या खिडकीतून उडी टाकली तर काय गहजब होईल ? तो या नाटकाचा आधारप्रसंग आहे. पण तो फक्त आधारच आहे. नाटककाराला अभिप्रेत आहे ते पोलिसीखात्याचे सम्यक दर्शन. पोलिसांची चौकशी यंत्रणा किंवा एकूणच 'व्यवस्था' (सिस्टिम) कशी पोकळ आहे, विशविशीत, पोखरलेली आहे यावर लेखकाचा भर आहे.

त्यासाठी लेखकाने सरळ पद्धतीने प्रसंगांची मांडणी न करता नाटकातले नाटक करून दाखवण्याची पद्धती वापरली आहे. वर्तमानात जी प्रसंग चर्चा चालली आहे त्याचा पूर्वप्रसंग काय होता तो कधी वर्णनात तर कधी दर्शनात आलेला आहे. या संदर्भात आठवण येते ती ब्रेख्तच्या नाट्यशैलीची. नाट्यप्रसंगात भावनिक पातळीवर गुंतवून न ठेवता किंवा त्या अंगाने नाट्यपरिणाम न घडवता, प्रेक्षकाला त्या प्रसंगातून विचार करायला लावण्याची पद्धत वापरली आहे. हा परिणाम साधण्यासाठी संगीताचा आणि विडंबन–विनोद यांचा वापर लेखकाने केलेला आहे. अर्थातच हे नाटक पाहताना 'तीन पैशाचा तमाशा' किंवा तत्सम नाटकांची याद अपरिहार्यपणाने येत होती. हे नाटकदेखील परकीय नाटकावरून बेतले असावे अशी शंका पहिल्या काही मिनिटातच येते !

नाटककाराने निवडलेला नाट्यविषय, स्वीकारलेली नाट्यशैली स्वागतार्ह असली तरी लेखनातला बंदिस्तपणा मात्र जाणवत नाही. त्याचा परिणाम प्रयोगावर निश्चितच होतो. शब्द, वाक्य, दृश्यभाग यांची पुनरावृत्ती किंवा पाल्हाळ त्रासाचे ठरले. त्यामुळे नाटक तिथल्या तिथेच फिरते आहे असे वाटत राहिले. परिणामी पहिला भाग (अंक) कोणत्याच अर्थाने पकड घेऊ शकत नाही. तुलनेने दुसरा भाग पकड घेऊ शकला.

त्यातही शेवटचा भाग तर विशेषच. जेव्हा पोलीस व्यवस्थेवर सारे भाष्य केंद्रित होते, तेव्हा आलेला प्रेक्षकही वर्तमान स्थितीशी त्याची तुलना करून काहीसा अंतर्मुख होऊ शकतो. नाटककाराने आणखी एक गोष्ट केली, ती म्हणजे नाटकाचे दोन शेवट प्रेक्षकासमोर मांडले. त्यामध्ये प्रेक्षकाच्या अभिरुची संबंधीचा खोचक अभिप्राय होता, तसाच सत्य आणि कल्पित यावर विदारक भाष्य होते. हे केवळ जनसामान्य प्रेक्षकाबाबतच होते असे नाही तर पोलीसखात्यात मूळचे सत्य आणि कल्पित सत्य यामध्ये किती भयाण अंतर आहे यावरही ओरखडे होते !

हा पोलीसनामा कधी विनोदाच्या अंगाने तर कधी विडंबन–फार्स याच्या अंगाने मिश्रित होऊन आपल्यासमोर येतो. संपूर्ण प्रयोगभर ती गुणवत्ता एकाच प्रकारची राहात नाही. कारण यामध्ये जे कलावंत आहेत त्यांच्या अभिनयाचा मूळचा बाज वेगवेगळा आहे. विजय कदम हा लोकनाट्य किंवा मुक्तनाट्याशी जवळीक साधणारा आणि त्यातल्या अभिनयशैलीत मुरलेला गुणी कलावंत आहे. त्यामुळे तो रंगमंचावर मुक्तपणे वावरत होता, आवश्यक तो विनोदी भाव व्यक्त करू शकत होता. तुलनेने गजानन बगेरा, विनय पांडे यांच्या रंगमचीय हालचालीमध्ये एक प्रकारचा जडपणा जाणवत होता की जो फार्सिकल पद्धतीच्या प्रसंगांना त्रासदायक ठरत होता, कृत्रिम वाटत होता. लालन सारंगने या नाटकात एका पत्रकाराची भूमिका वठवली; पण ती निष्प्रभ वाटली एकतर ती भूमिका लेखनाच्या हिशेबात छोटी आणि काहीशी नगण्यच. भूमिका छोटीही असायला हरकत नाही पण त्यामध्ये अभिनयाला फारसा अवसर नव्हता. त्यातही एक–दोन वेळेला समूहात गाण्याचा तिचा प्रयत्न झाला. तोही स्पृहणीय नव्हता. संस्थेच्या सोयीसाठी काही वेळेला छोटी भूमिकाही महत्त्वाच्या कलाकाराला करावी लागते, तसे काही असेल तर ठीकच ! शाम पोंक्षेने विविध भूमिका करून आपल्या अभिनय गुणाचे उत्तम दर्शन घडवले. या पूर्वी त्याच्या ज्या गंभीर भूमिका आपण पाहिल्या आहेत त्या तुलनेत या नाटकात तो सर्वस्वी भिन्न आहे. त्याची भूमिका लक्षात राहावी इतकी चांगली झाली आहे.

या प्रयोगात जमेच्या ज्या काही आणखी गोष्टी आहेत त्यामध्ये शफाअतचे दिग्दर्शन. पात्रांच्या रंगमचीय हालचाली, त्यांच्या येण्याजाण्याची गती यावर त्याने खूपच मेहनत घेतली होती. बाबा पार्सेकरांनी पोलीसचौकीचे नेपथ्य यथायोग्य केलेले होते. राजीव नाईकने लिहिलेली गाणी आणि पुरुषोत्तम बेर्डेने दिलेले पोलिसी वळणाचे संगीत प्रयोगाची रंगत वाढवण्यास कारणी झाले. मात्र गाण्यातले शब्द अनेकदा स्पष्टपणे कळत नव्हते त्यामुळे त्यातला तपशील प्रेक्षकापर्यंत येत नव्हता. तसेच त्यातला विडंबनाचा, विनोदाचा भागही हरवून जात होता. ही काळजी नटाने आणि दिग्दर्शकाने घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर प्रयोग पाहिल्यावर असेही जाणवले की, थोडे सांगण्यासाठी खूप वेळ नाटकाचा विस्तार प्रयोगरूपाने चालू आहे. त्याचे संपादनही आवश्यक आहे. लेखक आणि दिग्दर्शक एकच असल्याने मतभेदाला वाव नाही. हा पोलीसनामा अधिक 'जनते' पर्यंत पोहोचवायचा असेल तर पुस्ती-दुरुस्तीसह यायला हवा. □

# प्रतिभेचा खडतर प्रवास – पोलॅन्स्की

रघुपती भट्ट

पोलंडमध्ये जन्माला आलेल्या रोमन पोलॅन्स्कीला आयुष्यात बरंच भोगावं लागलं. जर्मन्स आणि त्याचा ज्यू द्वेष त्यानं अगदी लहान वयातच अनुभवला त्याची आई गॅस चेंबरमध्ये मरण पावली. त्याच्या वडिलांना कॉन्सट्रेशन कॅंपमध्ये जावं लागलं आणि तो अनोळखी कुटुंबात आणि काही वेळा रस्त्यावर असा मोठा झाला. अशा परिस्थितीत कुठली शाळा आणि कसचं काय ? पण त्यातून धडपडत रोमननं सिनेमात कामं मिळवली. त्यामध्ये 'जनरेशन' नावाचा एक चित्रपट होता. 'दि एन्चान्टेड बायसिकल' म्हणून एक छोटी फिल्म होती. 'थ्री स्टोरीज'मध्ये त्याच्या एका मित्राने त्याला काम मिळवून दिलं होतं आणि या अनुभवाच्या जोरावर त्याने पोलंडमधील 'लोझ फिल्म स्कूल'मध्ये प्रवेश मिळवला. कम्युनिस्ट पोलंडमध्ये त्या काळी 'सिनेमा' म्हणजे एक दिव्यच होते. शाळेमध्ये असणारे कम्युनिस्ट, अधिकारी कम्युनिस्ट या सगळ्यांच्या मर्जीत राहाणे आवश्यक असे. ख्रुश्चेवच्या कारकिर्दीत बंधने थोडी ढिली झाली तेव्हा रोमन सांस्कृतिक देवाण-घेवाणीत पॅरिसला गेला. त्या वेळेपर्यंत लघुचित्रपट काढण्यापर्यंत त्याची तयारी झाली होती. पॅरीसहून येताना वाटेत कॅनिस चित्रपटमहोत्सव पाहायला तो चुकला नाही.

'लोझ'मध्ये असताना त्याने 'टू मेन अँड अ वार्डरोब' नावाचा एक छोटा चित्रपट काढला. या चित्रपटात ब्रुसेल्सला झालेल्या लघुचित्रपटमहोत्सवात रौप्य पदक मिळाले. या रौप्य पदकामुळे रोमनचे नाव झाले. त्याचा हा चित्रपट धंदेवाईक चित्रपटगृहातून प्रदर्शित केला. 'लोझ' फिल्म स्कूलच्या इतिहासात ही एक क्रांती होती.

या चित्रपटाचे पदक घेऊन आल्यावर बार्बेराची आणि त्याची भेट झाली.

त्यानंतर रोमनने 'व्हेन एंजेल्स फॉल' नावाचा एक चित्रपट काढला. वर्तमानपत्रात वाचलेल्या एका स्वच्छता कामगारावर हा चित्रपट होता. या स्वच्छता कामगाराला गूढ अनुभव येत असत. या चित्रपटातील म्हातारीचे काम करण्यासाठी रोमनने वृद्धाश्रमातील एक म्हातारीच घेतली. या म्हातारीला कँडीचे व्यसन होते. ती नसली की तिचा जबडा सारखा हलायचा. रोमनने तिला सतत कँडी चारून चित्रपट पूर्ण केला. 'लोझ' स्कूलने रोमनच्या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून हा चित्रपट स्वीकारला; पण त्याला प्रमाणपत्र मिळाले नाही.

'लोझ' चे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी एखादा प्रबंध लिहावा लागे. रोमनकडे अभिनय होता. निर्मिती आणि दिग्दर्शनाचे तंत्र होते; पण त्याला प्रबंधाचा आळस अस-

रोमन पोलॅस्की.
त्याच्या आत्मचरित्रावरून अनुवादित केलेली ही कहाणी.
हिटलर सत्तेवर आला त्यावर्षी म्हणजे १९३३ ला पोलंडमध्ये जन्म.
'लोझ' फिल्म स्कूलमध्ये दिग्दर्शनाचे शिक्षण.
'टू मेन अँड अ वार्डरोब' हा पहिला चित्रपट.
'नाईफ इन द वॉटर' (Knife in the Water).
'द फियरलेस व्हॅम्पायर किलर्स' (The Fearless Vampire Killers).
'रोझमेरीज् बेबी' (Rosemary's baby),
'चायनाटाऊन' (China town).
'टेस' (Tess) इत्यादी चित्रपट गाजले.
अनेक वेळा ऑस्करसाठी शिफारस.
अनेक चित्रपटमहोत्सवात पारितोषिके मिळाली.
दुर्दैवाचे अनेक आघात त्याने झेलले.
– आईचा गॅस चेंबरमध्ये मृत्यू.
– पहिली बायको बार्बरा हिने फसवणूक केली.
– दुसरी शारोन हिचा भयानक खून झाला.
– बलात्काराच्या आरोपावरून अमेरिका सोडावी लागली.
एवढे आघात सोसूनही अनेक देशात–फ्रान्स, अमेरिका, इंग्लंड, वेल्स, इटाली, जर्मनी, पोलंड इ. चित्रनिर्मिती करून सन्मान मिळवले.
– सध्या फ्रेंच नागरिकत्व घेऊन फ्रान्समध्ये वास्तव्य.

त्याने त्याला पदवी मिळू शकली नाही.

त्यानतर 'कॅमेरा' नावाच्या कंपनीने 'क्रॉस आईड लक' नावाच्या चित्रपटासाठी त्याला साहाय्यक म्हणून घेतले. पोलिश लोकांची युद्धपूर्व, युद्धकालीन आणि युद्धोत्तर कम्युनिस्ट राजवटीतील स्थिती त्यात चित्रित करण्यात आली होती. हा उपहासगर्भ चित्रपट बदललेल्या शिथिल वातावरणामुळे बाहेर येऊ शकला होता. या चित्रपटात 'बार्बरा'-ला रोमनने घ्यायला लावले. या चित्रपटातील तिचे काम चांगले व्हावे म्हणून रोमनने खूप मेहनत घेतली. यातूनच ते जवळ आले. बार्बराचे त्या वेळी दुसऱ्या एकाबरोबर घनिष्ट संबंध होते; पण त्यामध्ये दुरावा निर्माण झाला आणि तिने रोमनशी लग्न केले.

एका फ्रेंच वृत्तपत्रात 'बार्बरा'चा फोटो प्रसिद्ध झाला होता आणि तिला आपल्या चित्रपटात घेण्याची इच्छा एका निर्मात्याने व्यक्त केली होती. या संधीचा फायदा घेऊन रोमन बार्बरासह पॅरीसमध्ये दाखल झाला. ज्या निर्मात्याने ती इच्छा व्यक्त केली होती त्याला तो भेटला. बार्बराच्या सौंदर्याने तो दिपून गेला. रोमनलाही त्याने त्या चित्रपटासाठी काही लिहिण्याचे काम दिले. 'द थाउजन्डथ् विंडो' हा तो चित्रपट. या चित्रपटासाठी बार्बरा फ्रेंच शिकली

पॅरीसमध्ये रोमनने बरेच मित्रमंडळ गोळा केले. त्यांच्यामार्फत आपल्याला कोठे संधी मिळतेय का ते तो पहात होता. बार्बराचा चित्रपट संपेपर्यंत त्याने खटपट केली, पण काही जमले नाही. तेवढ्यात एका प्रसिद्ध फ्रेंच दिग्दर्शकाने बार्बराला आपल्या चित्रपटात घेतले. त्यामुळे त्याचा पैशाचा प्रश्न मिटला. एका फ्रेंच निर्मात्याने रोमनला एक लघु चित्रपट काढण्यासाठी मदत केली. त्यामुळे 'द फॅट अँड द लीन' नावाचा एक चित्रपट, ज्यामध्ये रोमनने स्वतः एक भूमिका केली होती, तो तयार झाला. रोमनचा मित्र पोलिश संगीतकार कोमेडा काही कार्यक्रमानिमित्त पॅरीसला आला होता. त्याने रोमनच्या याही चित्रपटाला संगीत दिले. हा चित्रपट चांगला चालला. त्याने रोमनला काही सन्मानही मिळवून दिले.

रोमन आणि बार्बरा पोलंडला परत आले. 'मॅमल्स' नावाचा एक चित्रपट रोमनने पोलंडमध्ये पुरा केला. दोन माणसाच्या झगडण्याची ही हकिकत होती. रोमनचा हा शेवटचा लघु चित्रपट आणि पोलडमधील पहिला खाजगी चित्रपट ठरला. हा चित्रपट कम्युनिस्ट पोलंडच्या कायद्यानुसार बेकायदेशीर होता. त्याचे प्रोसेसिंग खाजगीरित्या होणे शक्य नव्हते. एकच मार्ग होता. कोणत्यातरी अधिकृत चित्रपटाच्या डब्यातूनच त्याला प्रोसेस करून घेणे.

आपल्या मित्रावर ती जबाबदारी टाकून रोमन आणि बार्बरा पॅरीसला निघून आले.

## भरपूर टीका

बार्बराला रोमला जाणे भाग पडले. कारण तिच्या चित्रपटाचे शूटिंग तेथे होते. तेवढ्यात रोमनला समजले की, बदललेल्या वातावरणात 'नाइफ इन द वॉटर' ला परवानगी मिळण्याची शक्यता आहे. मूळ कथानकात थोडी 'सामाजिक बांधिलकी' वगैरे घालून रोमनने कथा पोलंडच्या सांस्कृतिक खात्यापुढे ठेवली. त्यांनी ती मजूर केली. याही चित्रपटासाठी रोमनने हौशी कलावती घ्यायचे ठरवले. एरव्ही सामान्य दिसणारी पण बिकिनीमध्ये जोशिली दिसणारी हिरॉईन त्याला स्विमिंग पूलवर भेटली. तिच नाव जोलँटा उमेका होतं.

पण शूटिंग सुरू झाल्यावर त्याला या जोलँटाने प्रचंड डोकेदुखी दिली. एकतर तिचा चेहरा मख्ख असे आणि पुन्हा पुन्हा ती सुटायला लागली. हे शूटिंग पाण्यातलं असल्याने बराच काळ चाललं आणि त्यासाठी पैसाही खर्च होऊ लागला आणि मग पोलिश वर्तमानपत्रात मथळे येऊ लागले. 'कोणासाठी हा खर्च ? कशासाठी पोलिश माणसावर हे ओझे ?'

'नाइफ इन द वॉटर' पूर्ण होत असतानाच बार्बरा त्याच्यापासून दुरावली. रोममध्ये तिची दुसऱ्या कोणाबरोबर तरी गट्टी जमली होती. या धक्क्यातून सावरणे रोमनला अवघड होते. पण तशातुनही त्याने चित्रपट पूर्ण केला आणि सांस्कृतिक खात्यापुढे ठेवला. त्यांनी एक दोन शॉट कट करायला लावून तो संमत केला.


शूटिंगच्या वेळी वृत्तपत्रात आलेल्या खर्चाच्या बातमीमुळे सर्व समीक्षकांनी 'नाइफ इन द वॉटर' वर भरपूर टीका केली. कम्युनिस्ट पक्षाचा जनरल सेक्रेटरी गोमुल्का यानेसुद्धा 'पोलिश समाजाशी ना संबंधित

ना वैशिष्ठ्यपूर्ण' अशी मखलाशी केली. त्याच्यावर कोणी बोलणे शक्यच नव्हते, पण रोमनचा जोडीदार बोसॅक हा विक्षिप्त होता. पत्रकारांना तो म्हणाला, 'मला दोन प्रकारच्या लोकांचं मत हवं असतं. चित्रपट तयार करणारे कलाकार आणि प्रेक्षक आणि कॉम्रेड गोमुल्का यातील कोणत्याच प्रकारात बसत नाहीत. तेव्हा मला त्यांच्या मतामध्ये फारसा रस नाही.'

एकंदरीत या चित्रपटाने रोमनला केवळ मनस्तापच दिला. तो चित्रपट आर्थिकदृष्टचा यशस्वी झाला नाही तरी त्याने १९६२ च्या व्हेनिस चित्रपटमहोत्सवात क्रिकिस प्राईझ मिळवले आणि त्याचवर्षी टूर्स चित्रपट महोत्सवात रोमनच्या 'मॅमल्स'ला पहिले बक्षिस मिळाले; पण एवढे सन्मान मिळूनही रोमनची कोणी निर्माता दखल घेईना. रोमन आणि त्याचा मित्र गेराल्ड ब्रॅच अनेकांना आपल्या कथा पटकथा दाखवत फिरत होते. त्यांना फक्त राडस्टॅग, ज्याने बार्बरला पहिल्यांदा काम दिले होते, त्याचाच आधार होता. त्याच्या कृपेने रोमनने 'ॲमस्टरडॅम' मध्ये जाऊन 'रिव्हर ऑफ डायमंडस्' नावाचा एक चित्रपट पुरा केला. समीक्षकांना हा चित्रपट चांगला वाटला पण रोमनच्या दुर्दैवाने बॉक्स ऑफीसला तो अपयशी ठरला.

याचवेळी न्युयॉर्कच्या चित्रपटमहोत्सवासाठी 'नाईफ इन द वॉटर'ची निवड झाली आणि रोमनला अधिकृत आमंत्रण मिळाले. कम्युनिस्ट पोलंडमध्ये वाढलेल्या रोमनला अमेरिकन लोकांची आतिथ्यशिलता अतिशय आवडली. श्रीमंती आणि गरीबी ही दोन्ही चित्रे त्याला अमेरिकेत आढळली. रोमनचं इंग्लिश खराब होतं. महोत्सवात त्याच्या चित्रपटाचा परिचय करून देण्याचा प्रसंग आला, तेव्हा रोमन म्हणाला, 'मला बोलणं जमत नाही. म्हणूनच मी चित्रपट बनवतो. आता आपण चित्रपट सुरू करूया.' प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. रोमनच्या प्रत्येक सीनला त्यांनी दाद दिली. अमेरिकेतील, विशेषतः न्युयार्कमधील प्रेक्षकवृंद सर्वात जास्त संवेदनक्षम आहे असं रोमनचं मत बनलं.

२० सप्टेंबर १९६३ च्या टाईमच्या मुखपृष्ठावर 'नाइफ इन द वॉटर'मधील एक



रोमन पोलॅन्स्की
आणि
भयानक खून झालेली
त्याची दुसरी पत्नी

स्थिरचित्र प्रसिद्ध झाले. यावरून रोमन पोलॅन्स्कीबद्दल एकंदरीत मत काय होते याचा अंदाज त्याला आला.

अमेरिकेबद्दल संमिश्र मत बनवत रोमन पॅरीसला परत आला तेव्हा त्याची आर्थिक स्थिती खालावत चालली होती. 'कल–डी–सॅक' नावाच्या त्याच्या प्रोजेक्टचा कोणी विचार करेना झाले होते. त्याच्या एका मित्राने त्याला लंडनमधील युनायटेड आर्टिस्ट, ट्वेंथीएथ् सेंच्युरी फॉक्झ, कोलंबिया आदी कंपन्यांकडे नेले; पण रोमनची कोठेच डाळ शिजेना. १९६३ च्या ऑस्कर पारितोषिकासाठी 'नाईफ इन दी वाटर'ची शिफारस झाली होती; पण रोमन आहे तेथेच होता.

## रिपल्शनचं यश

'ऑस्कर' समारोहासाठी त्याला आमंत्रण आले. त्याची फर्स्ट क्लासने प्रवास करण्याची सोय करण्यात आली होती. यावेळी रोमनला अमेरिकेचे आणखीन् कौतुक वाटले. ओळख झाल्याबरोबर अमेरिकन पहिल्या नावाने हाक मारतात याचे त्याला अप्रुप होतेच. या खेपेला ऑस्करसाठी शिफारस झालेल्यांना डिस्नेलॅंडची सफर होती. त्यावेळी सुप्रसिद्ध इटालियन दिग्दर्शक फेडरिको फेलिनी रोमनला भेटला. फेलिनी समारंभाच्या वेळी रोमनजवळ बसला होता. 'नाइफ इन द वॉटर'ला ऑस्कर मिळणार असे गृहीत होते; पण ते मिळाले फेलीनीच्या ८½ ला. फेलिनीच्या डोळ्यात आसवे तरळली. रोमनने टाळ्या वाजवल्या. त्याच्या शब्दात.

'मी अंतरंगी नाराज झालो होतो पण तरी सुद्धा एक आनंद होता. अशा जेत्या पुढे हरणे म्हणजे काही अपमान नव्हे.'

रोमनला फेलिनीबद्दल किती आदर होता ते यात दिसते.

रोमनच्या मित्राने लंडनमधील कॉम्पटन ग्रूप नावाची चित्रसंस्था रोमनसाठी तयार केली होती. त्यांना मात्र रोमनच्या आर्ट फिल्म्स नको होत्या, त्यांना एखादा भयानक चित्रपट हवा होता. खूप पैसा मिळवणारे

घदेवाले लोक होते ते.

पॅरीसला येऊन रोमन आणि शेराल्डने केवळ सतरा दिवसात 'रिपल्शन'ची कथा लिहून काढली. एका मोकळ्या फ्लॅटमध्ये मोकाट सुटलेली, व्यक्तिमत्त्व दुभंगलेली तरुणी हा त्याचा विषय होता. रोमनने एका सुंदर मुलीला पाहिले होते. एकाच वेळी तिला सेक्सबद्दल घृणा आणि आकर्षण होते. अतिशय सुंदर असणारी ही मुलगी आत्यंतिक हिंसक बनू शके. या हकिकतीवर रोमनने कथा लिहिली. 'कॉम्पटन'ने या कथेला हिरवा सिग्नल दिला. रोमनने चित्रपटासाठी माणसे निवडली. कथेची नायिका म्हणून 'कॅथराईन डेन्यू'ची त्याने निवड केली. या चित्रपटात भयानकता यावी म्हणून तऱ्हेतऱ्हेचे सेटस् त्याने वापरले. 'विकृत प्रतिमां' चा त्याने मनमुराद वापर केला. कॅथराईन अत्यंत समजूतदार नटी होती. 'रोमन'चे वैशिष्ठ्य म्हणजे त्याला पाहिजेत तसे परिणाम येण्यासाठी तो कितीही रिटेक्स घेई. खर्चाची तमा तो करीत नसे. त्यामुळे निर्मात्यांबरोबर त्याचे खटके उडत; पण रोमन माघार घेत नसे.

सेन्सॉर बोर्डाच्या सदस्यानी एक मानसशास्त्रज्ञ घेऊन हा चित्रपट पाहिला. तो मानसशास्त्रज्ञ रोमनच्या अभ्यासाने थक्क झाला. सिझोफ्रेनियाचे एवढे तंतोतंत वर्णन कसे जमले असे त्याने रोमनला विचारले. या चित्रपटाने भरपूर पैसा मिळवला. रोमनला कीर्ती मिळवून दिली. कोलंबियाने 'रिपल्शन्' विकत घेतला. या चित्रपटाला बर्लिनच्या चित्रपट महोत्सवात सिल्व्हर बेअर पारितोषिक मिळाले. रोमच्या खर्चाबद्दल सतत कुरकुर करणाऱ्या क्लिजर या कॉम्प्टनच्या निर्मात्याने ते घेतले. ते रोमनला मिळाले होते; पण त्याने ते स्वत.जवळ ठेवले.

या यशानंतर रोमनकडे पडून असलेल्या 'कल-डी-सॅक' या कथेला पैसा पुरवण्याचे काम क्लिजरने मंजूर करून टाकले.

'कल-डी-सॅक'ची कथा एका बेटावर घडते. रॉयल जिऑग्राफिककडून 'होली आयलंड' नावाचे एक बेट तशा प्रकारचे असल्याचे रोमनला समजले. ते त्याने ठरवले. तेथे त्याना हवा तसा एका किल्लाही होता. अभिनेते निवडताना कथेप्रमाणे प्रत्यक्षात असणारे असेच त्याने निवडले. या चित्रपटात जॅकेलिन बिसेटला एक छोटा रोल त्याने दिला. नायिकेच्या कामासाठी कॅथरिनची बहीण फ्रँकॉइज डॉर्लिक हिची त्याने निवड केली. आक्रस्ताळी गुंडाच्या भूमिकेसाठी लॉयनेल स्टॅन्डरची निवड झाली. कारण तो प्रत्यक्षातही आक्रस्ताळीच होता. प्रत्यक्ष शूटींगच्या वेळी त्यामुळे खूप गोंधळ झाला. फ्रँकाईसच्या आणि त्याच्या झगड्यावेळी त्याने खरोखरीच मारण्याचा पवित्रा घेतल्यावर फ्रँकाईसनेही त्याला ठोक दिला. पुन्हा त्याला हृदयाचा त्रास होता. त्यामुळे शूटींग लांबले.

हा चित्रपट पूर्ण झाला आणि रोमनने 'द फियरलेस व्हॅंपायर किलर्स' नावाचा चित्रपट हाती घेतला. 'कल डी सॅक' फिल्मवेल्या हाती वितरणासाठी गेला होता. त्याचवेळी फिल्मवेल्या करारात असलेल्या 'शारोन टेट' या नटीशी रोमनची ओळख झाली. शारोन अमेरिकन होती आणि रोमनला तिच्यात बऱ्याच जुळणाऱ्या गोष्टी आढळल्या. आणि समसमा सयोगाच्या तत्त्वाने रोमन आणि शारोन जवळ आले.

## 'रोझमेरीज बेबी'-तुफानहीट

द फियरलेस व्हॅंपायर किलर्समध्ये रोमनने स्वत कडे एक भूमिका घेतली. शारोनलाही त्यात एक रोल देण्यात आला. याचं शूटींग इटलीमध्ये घेण्याचे ठरले. या शूटींगच्या वेळी रोमन आणि शारोन एकमेकाच्या अगदी निकट आले. अगदी कष्ट घेऊन रोमनने हा चित्रपट ठरलेल्या वेळेपेक्षा जास्त कालावधी घेऊन पुरा केला. एखादा सीन मनासारखा यावा यासाठी रोमन किती वेळा रिटेक घेई? एक सीन त्याने ७० वेळा रिटेक केला. आपले पूर्ण समाधान झाल्याशिवाय तो थांबत नसे.

व्हॅम्पायर किलर्संच्या वेळी ब्रिटिश फिल्म युनियनच्या असहकाराचा रोमनला अनुभव आला. किरकोळ अडचणीसाठी ते सगळं शूटिंग थांबवत. रोमनच्या मते त्यांच्या या कार्यपद्धतीमुळे ब्रिटिश चित्रपट व्यवसाय धोक्यात आला. या चित्रपटाचे वितरण एम. जी. एम. कडे होते. त्यानी मेमोज् पाठवून रोमनला वात आणला.

त्यानतर रोमनपुढे 'रोझमेरीज् बेबी' ही इरा लेव्हिनची कादबरी पॅरामाउटकडून आली. एम. जी. एम. च्या सटरफटर सूचनांनी रोमन वैतागला होता. त्यामुळे तो पॅरामाउटकडे आशेने वळला. बॉब इव्हान्स या नव्या अध्यक्षाचे मन त्याने जिंकले होते.

बॉब इव्हान्सने रोझमेरीच्या भूमिकेसाठी मिया फॅरोचं नाव सुचवल. गायच्या भूमिकेसाठी वॅरन बिट्टी, रॉबर्ट रेडफोर्ड, जॅक निकोलसन वगैरे नावं होती; पण रेडफोर्डचं त्या वेळी पॅरामाउटबरोबर भांडण होतं. त्यामुळे जॉन कॅसाव्हेटस्चं नाव नक्की झालं.

मिया फॅरोनं रोमनला जबरदस्त साथ दिली. विशेष म्हणजे तिचा नवरा फ्रॅंक सिनात्रा याला आपल्या बायकोनं स्वतंत्ररीत्या काम करणं आवडत नव्हतं. पण तिला ती भूमिका इतकी आवडली होती की हा विरोध पत्करूनही तिने ते काम स्वीकारलं होतं.

रोमनच्या कार्यपद्धतीत गडबड चालत नसे आणि खर्चाचाही काटेकोरपणा चालत नसे त्यामुळे पॅरामाउटचे लोकही त्याच्यावर वैतागले. पण अध्यक्ष बॉब इव्हान्स रोमनच्या मागे असल्याने त्यांचे काही चालेना.

रोमनने इरा लेव्हिनच्या कादबरीला एक नवा अर्थ दिला. रोझमेरी सैतानाकडून झपाटली जाते आणि शेवटी तिच्या पोटी सैतानपुत्र जन्माला येतो. कम्युनिस्ट देशात वाढलेल्या रोमनचा यावर विश्वास नव्हता. त्याने आपल्या पद्धतीने ती कादबरी बुद्धिनिष्ठ करण्याचा प्रयत्न केला. आपल्या मेथडस्नी त्याने रोझमेरीला हे सगळे भास होतात असं दाखवून त्याच स्पष्टीकरण दाखवण्याचा प्रयत्न केला. पण हे करताना मूळ कादंबरीवर अन्याय होऊ नये किंवा चित्रपटाची भयानकता कमी होऊ नये यासाठी तो दक्ष राहिला.

या चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळीच फ्रॅंक सिनात्राने मिया फॅरोला घटस्फोट दिला. एवढं होऊनही मियाने त्याचा चित्रपटावर परिणाम होऊ दिला नाही.

रोझमेरीज बेबी पूर्ण होत असतानाच 'व्हॅम्पायर किलर्स' प्रदर्शनासाठी सज्ज झाल्याचे एम. जी. एम. ने त्याला कळवले. फिल्मवेल्या रॅन्शान्फने त्याला सपादित केले होते. व्हॅम्पायरची संपादित आवृत्ती जेव्हा त्याने बघितली तेव्हा त्याला अक्षरश: धक्का बसला रॅन्शान्फने एखाद्या कसाबासारखी कात्री चालवून त्याचा सुंदर चित्रपट पूर्णपणे बिघडवून टाकला होता. आता कशाचा

कशाला संदर्भ लागत नव्हता. 'विकृत मूल जन्माला आल्यावर आईला जे वाटतं तेच मला वाटलं' असं रोमन त्यावर म्हणाला. आपलं नाव त्यातून काढून टाकावं असही तो उद्वेगाने म्हणाला. एम. जी. एम. ने आपल्या चित्रपटाचे कसे मात्र केले ते त्याने एम. जी. एम. च्या धमक्यांना न घाबरता अनेक मुलाखतीत सांगितले. त्याच्या म्हणण्यानुसार हा चित्रपट आपटला आणि एम. जी. एम. चे नुकसान झाले. पुन्हा जेव्हा रोमनची मूळ आवृत्ती प्रदर्शित झाली तेव्हाच तो चालला.

अमेरिकेत रोमनला बरेच मित्र गोळा झाले होते. यानच स्टीव्ह मॅक्वीनचा समावेश होता. एकदा स्टीव्ह मॅक्वीनने रोमन आणि शारोनला आपल्या गाडीतून सफारीला नेले. स्टीव्ह रेस ड्रायव्हर होता. त्याने गाडी अशी तुफान चालवली की रोमनचं त्याच्याबद्दलच मत पूर्ण बदललं. पुन्हा कधी स्टीव्ह मॅक्वीनच्या गाडीत बसायचे नाही असा त्याने निश्चय केला. त्या भयानक सफारीतून आपण जिवंत परत आलो याचेच त्याला कौतुक वाटले.

रोमनचा नेहमीचा संगीतकार कोमेडा याने रोझमेरीज् बेबीला संगीत दिले. रोमनने आपली यामा मोटरसायकल या कोमेडाला फिरवायला दिली होती. पोलंडमध्ये आयुष्य गेलेल्या त्या महान संगीतकाराला पोलिसानी वाहन हळू चालवण्याबद्दल पकडले. आपण एखादा अपघात करू अशी त्याला भीती वाटत होती. पोलिसानी त्याला आदराने घरी पोहोचवले. कम्युनिस्ट देशात वाढलेला तो संगीतकार अमेरिकन पोलिसाच्या त्या आदरयुक्त भावनेने अक्षरशः थक्क झाला.

'रोझमेरीज् बेबी' प्रसिद्ध झाला आणि अक्षरशः हिट ठरला. रोमन, बॉब इव्हान्स, पॅरामाउंट सगळयांनाच त्याने कीर्ती दिली. जगभर गाजलेल्या या भयानक चित्रपटाचे भारतात प्रदर्शन होऊ शकले नाही भारत सरकारने त्याला बंदी घातली आहे. रोमन पोलॅन्स्कीचे नाव ज्याच्या त्याच्या तोंडी झाले आणि त्याला प्रचंड ऑफर्स येऊ लागल्या. संगीतकार कोमेडासुद्धा अनेक चित्रपटाचा करार करून बसला होता.

पीटर सेलर्सची आणि रोमनची या काळातच ओळख झाली. पहिल्यादा पीटर अगदी दुःखी आणि बुजरा असावा असे रोमनला वाटले. पण हळूहळू त्याचा विनोदी स्वभाव त्याच्या लक्षात आला. रोमनच्या कपूतील 'मिया फॅरो' शी त्याचे झटकन जमले. पीटर थोडासा अंधश्रद्धाळू होता. एखाद्या ठिकाणी अनलकी रंग दिसला की तो लगेच उठून जात असे.

## शारोनचा मृत्यू

हॉलीवूडमध्ये स्वातंत्र्याचा आनंद घेत असताना पीटरचा जिगरी दोस्त कोमेडा आजारी पडला. त्या आजारातच त्याचे निधन झाले. मृत्यूसमयी रोमनचा हात त्याच्या हातात होता. हॉलीवूडमध्ये तो रमला होता. तो आता जगणार नाही म्हटल्यावर त्याला खास विमानाने पोलंडला परत नेण्यात आले. रोमनचा हा आवडीचा संगीतकार होता; त्याच्या बऱ्याच चित्रपटांना त्याचे संगीत होते.

शारोनने 'द व्हॅली ऑफ द डॉल्स आणि 'रेकिंग क्रु' नावाचे दोन चित्रपट पूर्ण केले. 'रेकिंग क्रु' मध्ये तिला 'कुंग फू' तज्ञाची भूमिका होती. या भूमिकेसाठी एक खास तज्ज्ञ शिक्षक नेमण्यात आला होता. शारोनने रोमनची आणि त्याची गाठ घालून दिली.

या तज्ज्ञ शिक्षकाचे नाव होते ब्रूस ली. अजून त्याने अभिनय आणि सिनेमाचा गंभीर विचार केला नव्हता. ज्युडो, कराटेसारख्या कलाचा तज्ज्ञ एवढाच हॉलीवूडने त्याचा विचार केला होता. 'जितकुंडो' या कलेचा तो चाहता होता 'शास्त्रीय द्वंद्वपद्धती' या शब्दात तो जितकुंडोचे वर्णन करी. कराटेचा तो उपहास करी. त्यामध्ये वेळ फुकट जातो असं त्याचं म्हणणं होतं. रोमनला तो आत्यंतिक सभ्य आणि नम्र गृहस्थ वाटला, पण प्रत्येक आत्मसंरक्षण कलेला काही तरी उद्दिष्ट हवंच असा त्याचा आग्रहही त्याला जाणवला.

ब्रूस हा अतिशय तंत्रशुद्ध मनुष्य होता. त्याच्या कलेमागे अत्यंत कठोर परिश्रम होते आणि यातून प्रत्येक विद्यार्थ्याने गेलेच पाहिजे असं त्याचं मत होते. रोमनला त्याने धडे द्यायला सुरुवात केली. आपली प्रसिद्ध 'ब्रूस ली' साईडकिक त्याने रोमनला शिकवली.

इतकी उत्तम शरीरसंपदा असणारा ब्रूस दूरचं पाहू शकत नव्हता. त्याची दृष्टी अधू असल्याने त्याला चष्मा किंवा काँटॅक्ट लेन्सिस वापराव्या लागत. एकदा चष्मा घसरलेला असा ब्रूस वाकून बुटाची लेस बांधत असताना रोमनने त्याला साईड किक मारण्याचा प्रयत्न केला, पण मागे वळूनही न पाहता ब्रूसने त्याचा पाय वरच्या वर पकडला. रोमन अचंबित झाला. ब्रूसची चपळता ही कोणत्याही प्राण्यापेक्षा अचूक आणि अधिक होती.

शारोन आणि रोमन १९६८ मध्ये विवाहबद्ध झाले. रोमनचे वडील आणि सावत्र आई पोलंडहून त्यासाठी आले. 'प्लेबॉय क्लब' मध्ये रोमनने एक शानदार पार्टी दिली आणि हॉलीवूडच्या अनेक प्रसिद्ध नटयांनी त्या पार्टीत उपस्थिती दिली.

याच वर्षी रोमनला कॅनिस चित्रपटमहोत्सवात ज्युरी म्हणून बोलवण्यात आलं. त्यावर्षी त्या महोत्सवात थोडी गडबड झाली. रोमनला हा महोत्सव महत्त्वाचा वाटत होता म्हणून तो रद्द करण्याच्या तो विरुद्ध होता; पण इतर अनेक तो बंद करण्याच्या मताचे होते. कम्युनिस्ट आणि भांडवलशाही विचाराचे लोक तेथे आले होते. रोमनला कोणाची बाजू घ्यावी हे कळेना; पण एकूण भांडणं, मोर्चे, सभा वगैरेत कॅनिस महोत्सवाचा फज्जा उडाला.

त्यानंतर रोमनला पाहिजे तशी कथा मिळू शकली नाही. 'द डे ऑफ दी डॉल्फिन' वगैरे कथांवर तो काम करत होता. शारोन हॉलीवूडच्या घरी निघून गेली होती आणि रोमन लंडनमध्ये द डे ऑफ दी डॉल्फिनवर मेहनत करत होता. त्याचे लक्ष शारोनचे पत्र किंवा तार याकडे होते, कारण शारोन गरोदर होती.

आणि अचानक रोमनला फोन आला. शारोन आणि तिचे काही मित्र याचा त्यांच्या घरात भीषण खून झाला होता. रोमन तातडीने अमेरिकेत आला. शारोनवर त्याचे नितांत प्रेम होते. खून कोणी केला हे त्यावेळी गूढच होते; पण रोमनवर त्याचा मोठा आघात झाला. शारोनच्या ज्या मित्राची त्यामध्ये हत्या झाली होती तीसुद्धा रोमनची घनिष्ट मित्रमंडळी होती. सतत हसतमुख असणाऱ्या, अत्यंत प्रेमळ स्वभावाच्या शारोनने किंवा तिच्या त्या सभ्य, मवाळ मित्रानी कोणाचे काय वाईट केले होते ते त्याला समजेना. आपण शारोनजवळ नव्हतो

म्हणून तो स्वतःला दोषी ठरवू लागला. 'मॅन्सन फॅमिली' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एका हिप्पी गँगने हे कृत्य केले होते.

शारोनच्या त्या भीषण खूनानंतर वृत्तपत्रातून विलक्षण हकिकती प्रसिद्ध झाल्या. त्यात रोमन आणि शारोन याचा आफ्रिकन जादूगारांशी सबंध होता, ते दोघे मादक द्रव्याचे सेवन करीत होते, त्याचा त्या टोळधाशी सबध होता, रोमनच्या बगल्यात नको ते विधी चालत वगैरे वगैरे छापण्यात आलं होत. रोमन आणि शारोनची दुरून ओळख असणाऱ्यांनीसुद्धा 'शारोनच्या सहवासातील काही क्षण' 'रोमन आणि शारोनच्या सहवासात' किंवा 'शारोन'ची आणि माझी शेवटची भेट' वगैरे थापा मारल्या होत्या. आणि वृत्तपत्रातून केले जाणारे आरोप केले होते. रोमनला त्याचा फार मनस्ताप झाला. शारोनच्या मृत्यूचे दुःख आणि तिच्या मृत्यूनंतर होणाऱ्या चरित्रहननाचे दुःख यानी रोमन अक्षरशः पिचून गेला. खुनी शोधण्यासाठी त्याने पोलिसांना पूर्ण सहकार्य केले. शेवटी खऱ्या गोष्टी बाहेर आल्या; पण लोकांच्या ध्यानात राहाणार त्या वाईट गोष्टीच हे त्याला माहिती होते. विशेष म्हणजे अशा प्रकारच्या कंड्या उठवण्यात न्यूजवीक, 'टाइम' अशा जगप्रसिद्ध साप्ताहिकांनी भाग घेतला होता याचं त्याला दुःख झालं.

मित्राच्या सहकार्याने आणि आत्मविश्वासाने रोमन पुन्हा कामाला लागला. हेन्री शॅरीयरच 'पॅपिलॉन' त्यानं वाचलं आणि पॅपिलॉनची मर्दानी वृत्ती, पुन्हा उठून उभं राहाण्याची जिद्द, जगण्याचा उत्साह यांनी तो भारावून गेला. याच्यावर एक सुदर चित्रपट काढता येईल असं त्याच्या लक्षात आलं. हेन्री शॅरीयरला त्याने फोन केला. शॅरीयरनं त्याला सागितलं की चित्रपट काढण्याचे हक्क त्याच्या प्रकाशकाकडे आहेत. रोमननं मग वॉरेन बिट्टीला पॅपिलॉनची भूमिका स्वीकारण्याची विनंती केली. वॉरन रोमनचा मित्र होता आणि 'पॅपिलॉन'च्या स्वभावचित्राशी जुळणारा असा त्याचा स्वभाव होता; पण हे घडू शकले नाही. कारण रोमनला हवा तसा फायनान्सर मिळू शकला नाही.

आता काही तरी सुरू करणे भाग होते, कारण रोमनचे पैसे संपत आले होते. मॅन्सननी केलेल्या हत्याकांडाचा रोमनवर इतका परिणाम झाला होता की, 'भयानक' असं कव्हरवर दिसलं की तो ती कथा बाजूला सारत असे.

शेक्सपियरच्या मॅकबेथवर चित्रपट काढण्याचे रोमनने मनात घेतले. सुप्रसिद्ध ब्रिटिश नाटयसमीक्षक कनेथ टायनॅन याची मदत त्याने घेतली. रोमनच्या एका मित्राने (व्हिक्टर लोवनिस) थोडे कर्ज दिले आणि रोमन आपल्या घरी बसून मॅकबेथची पटकथा टायनॅनच्या मदतीने लिहू लागला. रोमनच्या समजुतीने त्याने प्रसग रगवले. नाटकात ३ चेटकिणी दाखवल्या आहेत. पटकथेत त्याने त्याचा ताफा रगवला. लेडी मॅकबेथ झोपेत चालते त्यात तिला विवस्त्र दाखवायचे ठरवले कारण शेक्सपियरच्या काळात तसे झोपत असत. मॅकबेथचे मारेकरी लेडी मॅकबेथ आणि तिच्या मुलावर चाल करून जातात या प्रसंगाला चितारताना रोमनला लहानपणी त्याच्या घरी आलेले जर्मन सैनिक आठवले आणि त्याने त्यात जान आणली.

मग शेवटी व्हिक्टरला त्याने पटकथा दाखवली. व्हिक्टरच्या प्लेबॉय मासिकाच्या सिनेविभागाने आर्थिक मदत कबूल केली. कोलबियाने वितरण घेतले. जॉन फिन्च आणि व्हिकी टेनाट याना घेऊन वेल्शमध्ये शूटीग करण्यासाठी रोमन पोर्टमिरीयन येथे आला. तेथे त्यानी शेक्सपियरच्या नाटकाच्या वेळचे सेटस् उभे केले. त्यासाठी त्यांना अनंत यातायात करावी लागली.

रोमनला प्रत्येक सीन परफेक्ट जमावा लागे. त्यामुळे शूटीग लाबले. प्लेबॉय प्रॉडक्शन आणि फिल्म फायनान्सेस (फायनान्सर्स अस्वस्थ झाले. त्याचे पैसे त्यात अडकले होते. रोमन विनाकारण वेळ घालवतो आहे अस मत बनून ते त्याला अक्षरशः कमी करायला निघाले होते. रोमनने फिल्म फायनान्सेसच्या प्रतिनिधीला उशीर का लागतो आहे ते समजावून सागितले. जास्तीत जास्त लवकर चित्रपट पूर्ण करण्यासाठी प्रत्येकजण धडपडतो आहे हे त्याना रोमनने पटवले. शेवटी आपली ½ फी अमानत म्हणून त्यांनी ठेवून घ्यावी असं त्यानं सुचवले. तेव्हा कोठे ते शांत झाले.

'मॅकबेथ' पूर्ण होऊन कोलंबियाने न्यूयार्कमध्ये त्याचा प्रिमियर शो ठेवला. रोमनची इच्छा इग्लंडमध्ये ठेवावा अशी होती. प्रिमियरला आलेल्या सगळ्या अमेरिकन समीक्षकानी त्याच्यावर वाईट मत व्यक्त केले. आणि त्यामुळे पहिल्या काही आठवड्यामध्ये त्याने धंदा केला नाही

पण जेव्हा इग्लंडमध्ये तो प्रदर्शित झाला तेव्हा मात्र रोमनचे मत बरोबर होते, ते वरच्या सर्व मठ्ठाना कळले. इंग्लिश मथळे होते. 'मॅक ब्रिलियंट !' 'मॅकबेथ हा विजेता आहे !' पण इंग्लंडमध्ये जरी त्याने धदा केला तरी प्लेबॉय मासिकाचे पैसे काही भरून निघाले नाहीत व्हिक्टर लोबनिस या रोमनच्या मित्राला मात्र निष्कारण मनस्ताप झाला. त्यात कोणत्या तरी मुलाखतीत रोमन प्लेबॉय मासिकाबद्दल कारी तरी बोलून गेला ते शब्द जेव्हा व्हिक्टरने वाचले तेव्हा रोमनशी असणारी मैत्री त्याने तोडली. रोमनचा तो कित्येक वर्षाचा मित्र होता. रोमनने काही वर्षापूर्वी दिलेली सोन्याची भेटसुद्धा त्याने परत पाठवली.

म्हणून मॅकबेथबद्दल लिहिताना रोमन लिहितो. 'मॅकबेथने मी एक उधळ्या दिग्दर्शक आहे हा चुकीचा निष्कर्षच बळकट केला नाही, त्याच्याबरोबर माझी जिवाभावाची मैत्रीही तोडण्याचे काम केले.'

त्यानंतर इटालियन निर्माता कार्लो पाँटी यांच्या सहकार्याने रोमनने 'व्हॉट ?' हा चित्रपट तयार केला एका निरागस मुलीच्या खोड्याची ही कहाणी होती इटालियन्स कामाच्या बाबतीत अगदी चोख आहेत अस रोमनला आढळलं. मार्सिलो मॅस्ट्रीओनी आणि सिडने रोम या दोघांनी त्याला उत्तम सहकार्य दिलं इटलीमध्ये या चित्रपटाने भरपूर गल्ला मिळवला.

'व्हॉट ?' नतर रोमनने 'चायनाटाऊन' हाती घेतला. फेड नावे आणि जॅक निकोलसन याना घेऊन त्याने हा चित्रपट पूर्ण केला. फे ही बाई शीघ्रकोपी होती आणि जॅक हा मनुष्य जॉली होता. फेच्या स्वभावामुळे काहीवेळा अडचणी येत. जॅकमध्ये अभिनयाची समज चांगली असल्याने तो रोमनला मार्गदर्शक ठरला. यातील एक स्टंट सीन त्याने स्टंटमन न घेता स्वतः पार पाडला. चायनाटाऊन अतिशय सुदर चित्रपट ठरला.

अकरा पारितोषिकाची शिफारस त्याला मिळाली. बॉब टाऊने याला पटकथेचे ऑस्कर मिळाले. हा पॅरामाउंटचा चित्रपट होता. त्याच्या यशाने सगळे दिपले; पण पॅरामाउटचा बॉब इव्हान्स एका मुलाखतीत म्हणाला 'रोमन प्रतिभावंत दिग्दर्शक आहे; पण त्याला हाताळणे महत्वाचे आहे. सभोवतालचे चमचे त्याला फुगवून चित्रपट बिघडवतात.' चायनाटाऊनच्या यशाचे श्रेय त्याने स्वत:कडे घेतले. यापेक्षा त्याने जे शेरे मारले त्यामुळे रोमनला बरे वाटले नाही. निर्माता यापेक्षा बॉब त्याला मित्र म्हणून जवळचा वाटत होता. त्यामुळे भविष्यात पुन्हा बॉबबरोबर काम करायचे नाही असा त्याने निर्णय घेतला.

त्यानंतर रोमनने 'पायरेटस्' नावाचा चित्रपट घेतला पण आर्थिक अडचणीमुळे तो लाबणीवर पडला त्यामुळे रोमनने 'टेनाट' नावाचा दुसरा एक चित्रपट घेतला.

टेनांटची प्रमुख भूमिका रोमनने स्वत: केली. इझबिल अॅडजानी हिने नायिकेची भूमिका केली. हेही पिक्चर पॅरामाउंटने फायनान्स केले. शेली विन्टर्स, मेलव्हिन डग्लस आदीनाही यात भूमिका मिळाल्या. टेनांटच्या शूटिंगवेळी रोमनचा फ्रेंच तंत्रज्ञांशी संबंध आला. हे फ्रेंच तंत्रज्ञ अतिशय तळमळीने काम करणारे होते. दिग्दर्शक रोमनला अभिनेता म्हणून टेनांटमध्ये काम करावे लागल्यामुळे त्याच्या कार्यकौशल्याचा रोमनला फार फायदा झाला. टेनाटची प्रसिद्धी खूप झाल्यामुळे शूटीग पूर्ण होण्यापूर्वीच त्याला कॅनिस चित्रपट महोत्सवाचे निमत्रण मिळाले रोमनची यातली भूमिका मनोरुणाची होती; पण टेनाटला नतर म्हणावे तसे यश मिळाले नाही.

१९७६ मध्ये रोमनला आणखी एक मान मिळाला. फ्रान्सच्या सुप्रसिद्ध 'व्होग' या फॅशन नियतकालिकाने १९७६ चा अक काढण्यासाठी अतिथी सपादक म्हणून त्याला आमंत्रित केले. हा मान आतापर्यंत फेलिनी, हिचकॉक, मार्लिन डिएट्रिच आणि साल्वादोर दाली याना मिळाला होता.

आणि यातूनच रोमन एका सापळयात आडकला, ज्यामुळे त्याने आयुष्यभर मिळवलेले गमावण्याची पाळी आली.

'व्होग'च्या ख्रिसमस अंकात काही निरागस मुलीची छायाचित्रे छापण्याची कल्पना त्याच्या डोक्यात आली. रोमन स्वत: एक उत्तम फोटोग्राफर असल्याने त्याने स्वतः हे काम करण्याचे ठरवले. निरागस आणि निसर्गसानिध्यात रमलेली एखादी अनोळखी मुलगी त्याने छायाचित्राकित करायचे ठरवले तिच्या मुग्ध सौंदर्याच्या आणि उमलत्या तारुण्याच्या सर्व छटा टिपणे आपल्याशिवाय कोणाला जमणार नाही असे त्याला वाटले आणि त्या दृष्टीने त्याने तशा एखाद्या मुलीचा शोध चालू केला.

### खचलेला भग्न रोमन

त्याला 'सांद्रा'चा पत्ता कोणीतरी सागितला. सांद्रा खरोखरीच सुंदर मुलगी होती. तिने मॉडेल म्हणून काम केले होते. फिल्म करियर स्वीकारण्याची तिची इच्छा होती. रोमनने वेगवेगळया पोशाखात आणि पोझेस्मध्ये तिचे फोटो काढले. या फोटोच्या माध्यमातून सांद्राचा आणि पीटरचा शारीरिक सबध आला.

पुन्हा काय झाले हे एक गूढच. अचानक सांद्रा आणि तिची आई रोमनची भेट टाळू लागली तरी रोमनला अंदाज आला नाही.

पण काही दिवसानी लॉस एजलसच्या पोलिसानी बलात्काराचा आरोप ठेवून रोमनला अटक केली.

रोमनवर लॉस एंजलस कोर्टात खटला उभा राहिला. निरागस मुलीची फसवणूक केल्याचा त्याच्यावर आरोप होता. हॉलीवूडमध्ये त्याची चर्चा चालू झाली बालिकेवर अत्याचार करणारा अशी त्याची प्रतिमा रूढ करणाऱ्या कडया, लेख प्रसिद्ध होऊ लागले. रोमनची कॉन्ट्रॅक्टस् भरभरा रद्द होऊ लागली. रोमनला सुटकेची आशाही नव्हती. सगळ त्याच्या विरुद्ध होतं रोमन पोलॅन्स्कीची करीयर संपली होती.

जज्ज रिटेनबाडसुद्धा रोमनच्या विरुद्ध होता. काय वाटेल ते करून पोलॅन्स्कीला तुरुंगात पाठवणारच असे तो खाजगीमध्ये बोलत होता. (त्याच्या पूर्वग्रहदुषित्वामुळे नंतर त्याला राजीनामा द्यावा लागला.) रोमनला प्रोबेशनवर पाठवण्यात आले. रोमनच्या मित्रानी त्याला वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न केला प्रोबेशनच्या अहवालावरून त्याला शिक्षा देण्यात येणार होती.

प्रोबेशनहून आल्यावर त्याच्या मित्रांनी त्याला गुन्हा कबूल करण्याचा सल्ला दिला. तेवढयात रोमनच्या कानावर आलं की, तो जर अमेरिका सोडणार असेल तर त्याला सोडून देईन असे जज्ज म्हटल्याचे त्याला समजले.

रोमनने त्यावर विचार केला. अमेरिका त्याला राहू द्यायला तयार नव्हती, त्याने तडक लडन व लडनहून पॅरीस गाठले. त्याच्या अनुपस्थितीत दुसऱ्या जज्जसमोर खटला उभा राहिला, पण त्या जज्जनी रोमनच्या अनुपस्थितीत निकाल देण्याचे नामंजूर केले.

भग्न, खचलेला रोमन पॅरीसमध्ये राहू लागला. फ्रान्समध्ये त्याला सहानुभूती मिळाली. त्याच्या जोरावर रोमन पुन्हा उठला आणि थॉमस हार्डीच्या 'टेस ऑफ दि डर्बरव्हिल' वर त्याने काम सुरू केले. दुसऱ्या कोणाला एवढया धक्क्यानंतर, बदनामीनंतर उठून उभे राहता आले नसते. पण रोमन पोलॅन्स्कीच्या मनात पोलाद होते. त्याला घाव झेलूनही पुन्हा उठण्याचे सामर्थ्य होते.

'टेस' ची कथा साकार करण्यासाठी १९ व्या शतकाचे सेटस् उभे करणे आवश्यक होते. मानवी जीवनात आकस्मिक घडणारे प्रसंग, वर्गभेद आणि समाजाची त्याबद्दलची वृत्ती याने रोमन भारावून गेला होता. या कथेचे हक्क सेल्झनिककडून पॅरीसचा मित्र क्लाउड बेरी याने विकत घेतले. एक वर्ष थांबले असते तर त्याना पैसे वाचवता आले असते. पण रोमनला पुन्हा उठवणे महत्त्वाचे होते.

रोमनला अचानकपणे भेटलेली नस्ताशिया हिला रोमनने टेसची भूमिका दिली. तिला त्याने इंग्लडमध्ये सवादाचे प्रशिक्षण घेण्यासाठी पाठवले होते. 'सुपरमॅन' चा फोटोग्राफर 'जिऑफ्रे अनस्वर्थ' याला रोमनने कॅमेरामन म्हणून घेतले. त्याला विश्रांतीची आवश्यकता होती पण आयुष्यभरचे आवडीचे पुस्तक आणि त्याच्या मुलीला नुकतेच परीक्षेसाठी लावलेले पुस्तक म्हणून तो या चित्रपटासाठी तयार झाला.

रोमनने हार्डीने वर्णन केलेल्या खेडयासारखी खेडी शोधून काढली. एका खेडयातील टी. व्ही. अँटीना आणि विजेच्या तारा काढाव्या लागल्या आणि त्याबद्दल तेथील लोकाना भरपाई द्यावी लागली. कारण शूटिंग ८ ते ९ महिने चालले. एका खेडया-

तील चर्च त्याचा कळस सोडल्यास अगदी इंग्लिश होते. त्याच्यासमोर मोठा आरसा लावून रोमनने त्याला इंग्लिश करून टाकले. रोमनच्या स्वभावातील हा एक अत्यंत महत्त्वाचा गुण होता. प्रत्येक सीनमध्ये त्याला अजूनही परफेक्शन लागतेच.

एक वाईट गोष्ट या शूटिंगवेळी घडली. ती म्हणजे रोमनचा कॅमेरामन, जिऑफ्रे अनस्वर्थ याला हृदयविकाराचा झटका आला आणि उपचाराचा उपयोग न होता त्याचं निधन झालं. रोमनच्या सगळ्या सहकाऱ्यांना त्याचं अतिशय दुःख झालं. विश्रांतीचा सल्ला न ऐकता केवळ पुस्तकावरील प्रेमाने काम स्वीकारलेल्या जिऑफ्रेची समज अतिशय चांगली होती. पण शेवटी द शो मस्ट गो ऑन या न्यायाने धीर न सोडता सगळे कामाला लागले.

टेसला एकूण १२ मिलियन डॉलर्स खर्च आला. या हिशोबाने फ्रान्समध्ये तयार झालेल्यात ती सर्वात खर्चिक फिल्म होती. फायनान्सर क्लाउड बेरी हा चित्रपट पूर्ण होईपर्यंत अखंड कर्जात बुडला होता. रात्रंदिवस राबून रोमन आणि त्याच्या सहकाऱ्यांनी 'टेस'च्या जर्मन, फ्रेंच आणि इंग्लिश आवृत्त्या तयार केल्या.

जर्मनीत 'टेस' चे स्वागत चांगले झाले नाही. एका समीक्षकाने म्हटले की, या चित्रपटातील कथानकामुळे आणि ती हाताळण्याच्या पद्धतीने स्पष्ट होते की, रोमनपोलॅन्स्कीने फक्त भयानक चित्रपट काढावेत. एकाच्या मते चित्रपट १९ व्या शतकातील डेअरी फॉर्मवरील डॉक्युमेंटरी म्हणता येईल.

फ्रान्सची प्रतिक्रियाही बरोबर नव्हती. मग 'टेस' संपादित करण्यात आला. रोमनला ती संपादित आवृत्ती चांगली वाटली नाही. पण त्या आवृत्तीने युरोपात सर्वत्र यश मिळवले. फक्त इंग्लंडमध्ये ती आवृत्ती गेली नाही. कारण तेथील प्रमुख वितरक जॉर्ज पिंचेस 'टेस' माझ्या मृत देहावरूनच इंग्लंडमध्ये येईल.' असं जाहीर करत होता.

लॉस एंजल्स टाइम्सच्या वार्ताहराला रोमनने 'टेस'चे काही शॉटस् दाखवले होते. त्याने लिहिले की, सर्वात सुंदर अशा टेसला अमेरिकेत वितरक मिळू शकत नाही हे आपले दुर्दैव आहे. कोलंबियाने त्याचे वितरण घेतले आणि १ वर्षानंतर 'टेस' अमेरिकेत प्रदर्शित झाला.

अमेरिकन लोकांनी 'टेस' पहायला प्रचंड गर्दी केली. अकरा अकादमी पारितोषिकांसाठी त्याची शिफारस झाली. टेसच्या नेपथ्याबद्दल पिएट गफॉय, फोटोग्राफीबद्दल जिऑफ्रे अनस्वर्थ, अँथोनी पॉवेल याला वेशभूषा, जिऑफ्रे अनस्वर्थनंतर फोटोग्राफी पूर्ण केलेला क्लॉक्वेट, या सगळ्यांना ऑस्कर मिळाले. रोमनला समीक्षकांनी वर्षातील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून गौरवले. लंडनमध्ये 'टेस' ने गर्दी खेचली आणि समीक्षकांची वाहवा मिळवली.




'टेस'ला उशीरा मिळालेल्या यशाने रोमनचे पुन्हा एकदा समर्थ दिग्दर्शक म्हणून नाव केले असले तरी रोमन मात्र त्या उशीराने अतिशय वैतागून गेला.

आतापर्यंत पोलंडची आमंत्रणे तो नाकारत आला होता. पण लेक वालेसाच्या संपाने पोलंडमधील वातावरण बदलले असल्याचे त्याने ऐकले आणि पुन्हा एकदा पोलंडला भेट द्यावी असं त्याच्या मनानं घेतलं.

१९८१ मध्ये टेसच्या प्रिमियरच्या निमित्ताने तो पोलंडला गेला. प्रिमियरला दोघे मंत्री आले होते. त्यांच्या वागण्यात त्याला पूर्वीची ती हुकुमशाही छटा आढळली नाही. टीव्ही आणि वर्तमानपत्रात पूर्वीची कम्युनिस्ट पत्रके आणि प्रचार नसून निर्भेळ बातम्या, त्याही पोलंडबद्दल आणि इतर जगाबद्दल असतात, हे पाहून त्याला बरे वाटले. सगळं वातावरण बदललं होतं. रशियन दडपणाखाली ज्या पुस्तकांना आणि गोष्टींना बंदी होती त्या आता उफाळून वर आल्या होत्या. सॉलिडॅरिटीने लोकांची नाडी ओळखली होती. धर्म आणि दारू या दोन पूर्वीच्या अत्यंत निषिद्ध गोष्टी पण त्यांनाही आता पूर्ण मोकळीक मिळाली होती. या बदलत्या वातावरणात रोमनने अतिशय आनंदाने 'अमॅड्यूस' नावाचं संगीतकार मोझार्टच्या जीवनावरचं नाट्य पूर्ण केलं. त्यात त्याने स्वतः मोझार्टची भूमिका केली. रोमनच्या या कलाविष्काराचं भरपूर कौतुक झालं.

रोमन फ्रान्सला अमॅड्यूसची फ्रेंच आवृत्ती काढण्यासाठी आला आणि त्याला बातमी मिळाली. पुन्हा एकदा पोलंडमध्ये लष्करी कायदा जारी करण्यात आला होता.

पोलंडची आणखी एक शोकांतिका पाहून रोमनचा जीव तडफडला. लहानपणीचे दिवस तारुण्यातले दिवस त्याला आठवले. सॉलिडॅरिटीने पोलंडला जे सुखाचे दिवस दिले ते त्याने अनुभवले होते.

आणि आता पुन्हा एकदा...

□

आधार
Roman
by : Polanski
Publishers : Heineman : London

विज्ञान

# कृत्रिम स्वादुपिंड ?


शरीराच्या हालचाली करायला ऊर्जा लागते. ती आपल्याला अन्नातून मिळत असते. अन्नातील पिष्टमय पदार्थांचे रूपांतर शर्करेमध्ये होते व ही साखर रक्तात मिसळते. रक्त शरीरातील प्रत्येक भागात, अवयवात, स्नायूत व पेशीत जात असते. त्यामुळे शरीराच्या प्रत्येक भागाला शर्करेचा पुरवठा होतो. रक्तातील शर्करेचे प्रमाण ठराविक असावे लागते. या प्रमाणाचे नियंत्रण इन्सुलिन नावाचे द्रव्य करीत असते. आपल्या पचनसंस्थेत स्वादुपिंड नावाची ग्रंथी असते. तिच्यावरच 'लँगरहँनची द्वीपे' असतात. त्यात इन्सुलिन तयार होऊन ते रक्तात पाझरत असते. निरोगी व्यक्तीत निसर्गतः योग्य तितके इन्सुलिन निर्माण होते व रक्तात मिसळते. इन्सुलिन कमी झाले की रक्तातील शर्करेचे प्रमाण वाढते. ते शरीराला अपायकारक असते. या अवस्थेलाच 'मधुमेह' म्हणतात. हा विकार अत्यत पुरातन असून जगाच्या सर्व भागातील लोकात – व प्राण्यातही–आढळतो.

मधुमेह बरा होईल असा काही उपाय नाही. अनेक प्रकारचे पथ्यपाणी, काही औषधे याच्या सहाय्याने रक्तशर्करेवर नियंत्रण ठेवणे हाच मार्ग असतो. दररोज इंजेक्शन घेऊन शरीरात इन्सुलिन घेणे हा एक हमखास उपाय आहे. पण त्याचीही काही पथ्ये, बंधने आहेतच. मुख्य म्हणजे शरीराला इन्सुलिन सतत हवे असते. एकदा इंजेक्शनने घेतलेले इन्सुलिन दिवसभर हळूहळू वापरले जायला हवे. पण तसे होत नाही. निदान तसे होणे फार कठीण असते. एकदाच इंजेक्शन घेऊन सर्व इन्सुलिन शरीरात घेण्यापेक्षा दिवसातून दोनदा, तीनदा... दहादा इंजेक्शन घेणे कदाचित जास्त चांगले ठरेल! पण हे किती अडचणीचे होईल याची कल्पना सहज करता येते.

इंग्लंडमधील 'नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ

स्वादुपिंड





कृत्रिम स्वादुपिंड?

मेडिकल रिसर्च' च्या संशोधकानी एका डेन्मार्कमधील कंपनीच्या सहाय्याने मधुमेही लोकांसाठी बॅटरीवर चालणारा इलेक्ट्रॉनिक पंप तयार केला आहे. सिगारेट लायटरच्या आकाराचा हा पंप वजनाला फक्त १८० ग्रॅम आहे. डबीच्या एका बाजूकडून एक बारीक प्लॅस्टिकची नळी निघालेली असून तिच्या टोकाला इंजेक्शनच्या सुईसारखी सुई आहे. ही सुई शरीरात टोचून ठेवायची व पंप एका पट्ट्याने पोटाशी बांधून ठेवता येतो. पपामध्ये रोग्याला पंधरा दिवस पुरेल एवढे इन्सुलिन असलेली कॅप्सूल बसवण्याची सोय केलेली असते. पंपाला अनेक सूचक व नियंत्रक बसवलेले असतात. दिवसाला किती इन्सुलिन लागते हे पाहून त्याप्रमाणे इन्सुलिनचा डोस निश्चित केला जातो. दिवसातून १० किंवा १२ वेळा मिळून तेवढे इन्सुलिन आपोआप शरीरात सोडले जाईल अशी पंपात सोय केलेली आहे. एक बटण दाबून एखादा डोस चुकवता येतो. किंवा दुसरे एक बटण दाबून एखादा डोस मोठा करता येतो. बॅटरी संपली, इन्सुलिन संपलं किंवा पंपात बिघाड झाला तर तशी सूचना मिळते. जवळ जवळ नैसर्गिक स्वादुपिंडाचेच कार्य हा पंप करतो असे म्हणता येईल.


या इन्सुलिन पंपाचा वापर आणखीही एका अगदी अनपेक्षित प्रकारे अत्यंत उपयुक्त ठरला आहे. रक्तातील साखरेचे प्रमाण कमीजास्त होण्याचे, विशेषतः वाढण्याचे शरीराच्या निरनिराळ्या अवयवांवर, संस्थावर बरेवाईट परिणाम होत असतात. अशा आनुषंगिक परिणामात डोळ्यांवर व मूत्रपिंडातील सूक्ष्म वाहिकांवर होणारे परिणाम विशेष अपायकारक आहेत. दररोज इन्सुलिन घेणाऱ्या मधुमेहींनासुद्धा हे विकार होतातच. वरील पंपाचा प्रायोगिक वापर करून पाहिला तेव्हा असे आढळून आले की, एका महिन्यानंतर डोळे बिघडणे थांबले व आश्चर्य म्हणजे आणखी काही दिवसानी डोळ्यात सुधारणा होऊ लागली मूत्रपिंडाबाबतही हाच अनुभव आला आहे. यावरून हा पप स्वाभाविक स्वादुपिंडाला योग्य पर्याय ठरेल असे वाटते.

## पिकांचे रक्षण

ज्वारी, बाजरी असल्या पिकाच्या कणसात दाणे भरू लागले की, त्याचे पाखरांपासून संरक्षण करावे लागते. तसे मक्याला कणसे भरू लागली की पाखराप्रमाणेच भेकर, डुकरे, हरणे यापासून जपावे लागते. यासाठी इस्राएली शेतकऱ्यांनी अत्यंत अभिनव मार्ग काढला आहे. ऐझॅक एरिक्सन या शेतकऱ्याच्या असे लक्षात आले की त्याच्या शेतातील विशिष्ट भागातील कणसे जशीच्या तशी राहिली आहेत. तिकडे हरणे, भेकरे बिलकुल फिरकलेली नाहीत. त्या भागातील जमिनीची बारकाईने पहाणी केल्यावर त्याला तेथे एका ठिकाणी उग्रट वास येणारा एक घाणीचा ढीग आढळला. तो सिंहाच्या विष्ठेचा ढीग होता! आधी ८–१० दिवसात सिंहाने त्याच्या शेताला भेट दिली असावी. एरिक्सनने ती लीद घेऊन शेताच्या कुपणाच्या कडेकडेने थोडी थोडी टाकून दिली. त्यामुळे त्याच्या शेताकडे हरणे फिरकेनाशी झाली व पिके सुरक्षित राहिली. ही गोष्ट एरिक्सनच्या गावातच नव्हे तर इस्राएलभर पसरली. त्यामुळे तेल अवीव, हैफा अशा शहरातील प्राणीसंग्रहालयातील वाया जाणाऱ्या सिंहांच्या लीदीला मागणी येऊ लागली व संग्रहालयांचे उत्पन्न वाढले.

–भा. रा. बापट

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW-28



" ३१ ऑक्टोबर १९८४. इंदिराजींवर त्यांच्याच सुरक्षा रक्षकांनी गोळ्यांचा वर्षाव केला व साऱ्या सुसंस्कृत जगालाच प्रचंड धक्का बसला. भारतीय जनता या धक्क्यातून सावरते न सावरते तोच महत्त्वाची सरकारी गुपिते परदेशांना राजरोसपणे विकणारी देशद्रोही टोळी खुद्द पंतप्रधानांच्या सचिवालयातच ठाण मांडून बसल्याचे उघडकीस आले.

उद्वेगजनक संताप आणणाऱ्या या धक्कादायक घटनांचे संपूर्ण व माहितीपूर्ण चित्र कमीत कमी वेळात मराठी वाचकांपुढे आणण्याचे श्रेय राजहंस प्रकाशनाच्या ' वाट चुकलेली माणसं ' या पुस्तकाला दिले पाहिजे.

ताज्या घटना उलगडून दाखविणारे ओघवत्या शैलीतील एक ताजे व वाचनीय पुस्तक असेच ' वाट चुकलेली माणसं ' या पुस्तकाचे वर्णन करता येईल. "

**–किरण गोखले**

**महाराष्ट्र टाइम्स**

७ एप्रील ८५

**भरपूर छायाचित्रांसह**

**प्रकाशित झाले.**

**पहा व सवलतीत घ्या.**

# वाट चुकलेली माणसं

**शिरीष सहस्रबुद्धे**

**मूळ किंमत : ४० रुपये**

**सवलत किंमत : २८ रुपये**

**सवलत १५ मेपर्यंत.**

**नजिकच्या पुस्तक दुकानात खरेदी करा.**

राजहंस प्रकाशन पुणे

**राजहंस प्रकाशन**

**१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.**

मुंबई ऑफिस–

**श्री. वा. र. गोडे**

८१, भवानीशंकर रोड, जोशी वाडी,

चिनळे पथ कॉर्नर, दादर–मुंबई २८.